# महाराष्ट्र विधानसभा

## पत्रक भाग दोन

## सोमवार, दिनांक १२ जून, २०२३ / ज्येष्ठ २२, १९४५ (शके)

## लक्षवेधी सूचनांवरील प्रलंबित निवेदनांच्या प्रतींचे वितरण

**६८.** सर्व सन्माननीय विधानसभा सदस्यांना कळविण्यात येते की, विधानसभेचे सन २०२३ चे प्रथम (अर्थसंकल्पीय) अधिवेशन सोमवार, दिनांक २७ फेब्रुवारी, २०२३ रोजी विधान भवन, मुंबई येथे सुरु होऊन शनिवार, दिनांक २५ मार्च, २०२३ रोजी संस्थगित झाले.

संस्थगित झालेल्या प्रथम सत्रातील एकूण ३८८ स्वीकृत लक्षवेधी सूचनांचे जोडपत्र दिनांक २५ मार्च, २०२३ रोजी सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले. त्यापैकी २८ निवेदने मा.सदस्यांना टपालखणाव्दारे त्याचदिवशी वितरीत करण्यात आली होती एकूण प्रलंबित ३६० निवेदनांपैकी १६२ निवेदने मा. सदस्यांना पत्रक भाग - २ व्दवारे दिनांक सोमवार, दिनांक १५ मे, २०२३ रोजी वितरीत करण्यात आली. एकूण १९८ प्रलंबित लक्षवेधी सूचनांच्या निवेदनांपैकी १८ निवेदने सोमवार, दिनांक २९ मे, २०२३ रोजीच्या पत्रक भाग-२ क्रमांक ६४ व्दवारे मा.सदस्यांना वितरीत करण्यात आले होते. एकूण १८० प्रलंबित लक्षवेधी सूचनांच्या निवेदनांपैकी ३५ निवेदने शाखेत प्राप्त झाली असून ती यासोबत वितरीत करण्यात येत आहेत.

विधान भवन,
मुंबई,
दिनांक : **१२ जून, २०२३**

**जितेंद्र भोळे**
सचिव-१ (कार्यभार),
महाराष्ट्र विधानसभा.

**याची प्रत :**

१. महाराष्ट्र विधानसभेचे सर्व सन्माननीय सदस्य.
२. महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयातील सर्व पक्ष कार्यालये.
३. संगणक कक्ष (website.)
४. अनुवाद कक्ष
५. प्रतिवेदन शाखा

# महाराष्ट्र विधानसभा

**नगर विकास विभाग** **लक्षवेधी सूचना**

**सन २०२३ चे पहिले (अर्थसंकल्पीय) अधिवेशन**

**श्री.छगन भुजबळ, मा.विधानसभा सदस्य यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अन्वये दिलेली लक्षवेधी सूचना क्र.८५२ पुढीलप्रमाणे आहे :-**

"नाशिक शहरातील नवीन नाशिक सिडको डीएनएच माघ सेक्टर येथील भूखंड क्र.२४ मध्ये अनधिकृतपणे इमारतीचे बांधकाम केले जात असणे, या इमारतीच्या बांधकामासाठी नाशिक महानगरपालिकेने दि.१४ सप्टेंबर, २०२२ रोजी पार्किंग अधिक चार मजल्यांसाठी मंजुरी दिलेली असणे, मात्र या ठिकाणी महानगरपालिकेची परवानगी न घेता पार्किंग अधिक सहा मजल्यांचे अनधिकृत व बेकायदेशीरपणे बांधकाम सुरु असलयाचे दि.२० फेब्रुवारी, २०२३ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास येणे, हे बांधकाम करतांना नियम व निकष पायदळी तुडवल्यामुळे रस्त्यामध्ये वाहतुकीला अडथळा निर्माण होत असणे, सदर इमारतीचे बेकायदेशीरपणे केलेले पाचव्या आणि सहाव्या मजल्याचे बांधकाम तातडीने काढून घेणेबाबत महानगरपालिकेने कारवाई करण्याची आवश्यकता असणे, मात्र याबाबत महानगरपालिकेकडून दिरंगाई केली जात असल्याने परिसरातील नागरिकांमध्ये निर्माण झालेले संभ्रमाचे वातावरण, यावर शासनाने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

**मा.मुख्यमंत्री महोदयांचे निवेदन**

नाशिक महानगरपालिका क्षेत्रातील सिडको योजनेमधील डिएनएच माघ सेक्टर भूखंड क्र.२४ येथे नाशिक महानगरपालिकेने पार्किंग + चार मजल्याकरीता बांधकाम प्रारंभ प्रमाणपत्र दि.१४/०९/२०२२ अन्वये इमारत बांधकामास परवानगी दिलेली आहे. त्याचप्रमाणे सदर इमारतीच्या पाचवा व सहाव्या मजल्याकरीता आवश्यक विकास शुल्क भरणे, दुरुस्त नकाशा व इतर कागदपत्रे सादर करण्याच्या अटीवर सुधारित बांधकाम परवानगीस दि.०३/०४/२०२३ अन्वये तत्वत: मान्यता दिलेली असून, अद्याप प्रारंभ प्रमाणपत्र निर्गमित केलेले नाही. परंतू, विकासकाने तत्वत: मंजुरीनुसार परवानगीपोटी आवश्यक विकास शुल्काचा भरणा महानगरपालिकेकडे केलेला आहे. तथापि, विकासकाने पाचंव्या व सहाव्या मजल्याकरीता सुधारित बांधकाम परवानगीचे प्रारंभ प्रमाणपत्र प्राप्त करुन घेणे अपेक्षित असतांना विनापरवानगी/प्रारंभ प्रमाणपत्र न घेताच पाचव्या व सहाव्या मजल्याचे काम करीत असल्याचे निदर्शनास आल्यानंतर महानगरपालिकेमार्फत विकासकास दि.२०/०२/२०२३ रोजी महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम २६० व ४७८ अन्वये पाचव्या व सहाव्या मजल्याचे बांधकाम थांबविण्याबाबत प्रथम नोटीस देण्यात आलेली आहे. परंतु विकासकाने काम थांबविले नसल्यामुळे पुनश्च दि.१४/०३/२०२३ रोजी अंतिम नोटीस दिलेली आहे.

दरम्यान विकासकाने नाशिक महानगरपालिकेविरुध्द मा. दिवाणी न्यायालयात दि.२२/०२/२०२३ रोजी दावा क्र.१००/२०२३ दाखल करुन, दावा मिळकतीमधील बांधकामाच्या अनुषंगाने महानगरपालिकेने कोणतीही कारवाई करु नये आणि पाचव्या व सहाव्या मजल्याचे बांधकाम कायदेशीर प्रक्रियेचा अवलंब केल्याशिवाय काढून टाकू नये, याबाबत मा.न्यायालयास विनंती केली आहे. सदर दावा अद्याप न्यायप्रविष्ठ असून, मा.न्यायालयाने अद्याप कुठलाही मनाई हुकूम अथवा आदेश दिलेले नाहीत.

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४७९ अन्वये, अतिक्रमण निर्मुलन कारवाई करण्यास्तव विकासक यांचेकडून आवश्यक खर्च वसूल करणेकरीता खर्चाची नोटीस देण्यासाठी विनापरवाना बांधकाम निष्काषणाचा खर्च परिगणित करणे व सदर निष्कासनाची कारवाई करण्यापुर्वी महानगरपालिकेचे विधी सल्लागार यांचा अभिप्राय घेऊन, सदर कार्यवाहीची विधी ग्राह्यता तपासणेबाबत पुढील कायदेशीर प्रक्रिया महानगरपालिकेमार्फत सुरु आहे.

***************

# महाराष्ट्र विधानसभा

**नगर विकास विभाग** **लक्षवेधी सूचना**

## सन २०२३ चे पहिले (अर्थसंकल्पीय) अधिवेशन

**श्री.सुरेश भोळे, मा.विधानसभा सदस्य यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अन्वये दिलेली लक्षवेधी सूचना पुढीलप्रमाणे आहे :-**

"मा.उच्च न्यायालयाने भूसंपादनाचे आदेश देणे, आरक्षण क्र.११२ अन्वये बगीच्यासाठी आरक्षित जमिनीबाबत भूसंपादन प्रस्ताव क्र.६०/०७ मध्ये जळगाव शहर महानगरपालिकेने आगाऊ मोबदला रक्कम जमा करणे, त्यानंतर उपविभागीय अधिकारी जळगाव भाग जळगाव यांनी अंतिम निवाडा घोषित करणे, जमिनीचे सहमालक सौ.विद्या शैलेंद्र बियाणी यांना कर्करोग होणे, पिडीत महिलेच्या मुलाने भूसंपादन प्रस्तावात जमा असलेल्या आगाऊ मोबदला रकमेची शस्त्रक्रियेसाठी मागणी करणे, उपविभागीय अधिकारी जळगाव भाग जळगाव यांनी आयुक्त जळगाव शहर महानगरपालिका यांचेकडून आगाऊ मोबदला रक्कम देण्यासाठी ना-हरकत मागविणे, आयुक्त जळगाव शहर महानगरपालिका यांनी ना-हरकत न देणे, उपचारा अभावी शेतकरी महिलेचा अकाली मृत्यू होणे, मयत शेतकरी महिलेच्या मुलाने पोलिसांकडे सदोष मनुष्यवधाचा गुन्हा दाखल करण्याबाबत तक्रार देणे, जळगाव शहर पोलीस स्टेशनकडून जळगाव महानगरपालिका आयुक्त यांना दि.१६/१२/२०१९ रोजी पत्र क्र.४००९/२०१९ देण्यात येणे, पोलिसांनी मनपा आयुक्तांना गंभीर स्वरूपाच्या प्रकरणाची चौकशी करून तक्रार देण्याचे कळविणे, परंतु मनपा आयुक्तांनी कोणतीही दखल न घेणे, या बाबत शासनाने सखोल चौकशी करून कार्यवाही करण्याची आवश्यकता व याबाबत शासनाची प्रतिक्रिया."

### मा.मुख्यमंत्री महोदयांचे निवेदन

जळगाव शहराच्या वाढीव हद्दीची विकास योजना दि.११/०२/२००२ च्या शासन अधिसूचनेन्वये मंजुर करण्यात आली असून, उक्त विकास योजना दि.०७/०३/२००२ पासून अंमलात आलेली आहे. सदर विकास योजनेमधील मौजे पिंप्राळा शिवारातील गट नं.९६, ९७(भाग), १००(भाग), ११०(भाग), ११५(भाग) मधील एकूण ०२.५६ हेक्टर जमीनीवर आरक्षण क्र.११२ "बगीचा" या वापराकरिता प्रस्तावित केलेले आहे.

वरील जमीनीपैकी गट नं.११४/४ एकूण क्षेत्र ०.५३ हेक्टर या क्षेत्राकरीता संबंधित जमीन मालक यांच्या तर्फे श्री.अतुल अशोक मुंदडा यांनी महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ४९ अन्वये खरेदी सुचना बजावलेली होती. उक्त खरेदी सुचना शासनाने दि.०३/०९/२००७ अन्वये कायम केलेली होती. त्याअनुषंगाने जळगाव महानगरपालिकेने सदर जागेचा भुसंपादन प्रस्ताव जिल्हाधिकारी, जळगाव यांच्याकडे दि.२३/१०/२००७ अन्वये विहित नमुन्यात सादर केला होता. याबाबत विशेष भुसंपादन अधिकारी यांनी दि.२१/०७/२००८ अन्वये, सदर प्रस्तावात कलम ६ ची अधिसूचना निर्गमित करावयाची असल्याने संपादन संस्थेने म्हणजेच महानगरपालिकेने ५० टक्के आगाऊ मोबदला रक्कम म्हणून रु.२१.८९,०००/- इतकी रक्कम जमा करणेबाबत जळगाव महानगरपालिकेस कळविले होते. त्यानुसार महानगरपालिकेने उक्त रक्कमेचा धनादेश दि.०७/११/२०१२ अन्वये विशेष भुसंपादन अधिकारी यांच्याकडे पाठविला होता.

दरम्यानच्या काळात संबंधित जमीन मालकाने मा.उच्च न्यायालय खंडपीठ, औरंगाबाद येथे रिट याचिका क्र.७४४१/२००९ दाखल करुन, भुसंपादनाबाबत सत्वर कार्यवाही होणेबाबत आदेश देण्याकरिता मा.न्यायालयाला विनंती केली होती. तथापि, याचिकाकर्त्यास त्याच्या जमीनीवरील उक्त आरक्षण रद्द करण्याबाबत याचिका दाखल करावयाची असल्याने, सदर दाखल केलेली याचिका मागे घेण्याबाबत त्यांनी मा.न्यायालयास विनंती केली. त्यानुसार मा.उच्च न्यायालयाने दि.२५/०३/२०११ च्या आदेशान्वये, याचिकाकर्त्यास याचिका मागे घेण्याची परवानगी देऊन याचिका खारीज केली होती.

जळगाव महानगरपालिकेने भुसंपादन प्रस्तावाच्या अंदाजित मोबदल्याच्या ५० टक्के आगाऊ मोबदला रक्कमेचा धनादेश विशेष भुसंपादन अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी, जळगाव यांच्याकडे पाठविलेला होता. तद्नंतर विशेष भुसंपादन अधिकारी, जळगाव यांनी महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम १२६ (४) सह भुसंपादन अधिनियम १८९४ चे कलम (६) अन्वयेची अधिसूचना दि.३१/१२/२०१३ रोजी निर्गमित केली होती. दरम्यानच्या काळात जमिनीचे मालक यांनी विहित कालावधीत भुसंपादन न झाल्याने त्यांच्या जागेवरील आरक्षण रद्द झाले अशा प्रकारची रिट याचिका क्र.५१२८/२०११ मा.उच्च न्यायालय खंडपीठ, औरंगाबाद येथे दाखल केली होती. यामध्ये मा.उच्च न्यायालयाने दि.२०/०२/२०१४ अन्वये खालीलप्रमाणे आदेश दिला होता.

10] The competent authority under the Right to Fair Compensation and Transparency in and Acquisition, Rehabilitation and Resettlement Act, 2013, shall take requisite steps and follow up the same.
11] Even if a declaration under Section 6 of the erstwhile Land Acquisition Act 1894 has been issued, we do not see how that carries the case of the Corporation any further. By virtue of Section 24 and subsection (1) and (2) of the Right to Fair Compensation and Transparency in Land Acquisition, Rehabilitation and resettlement Act, 2013, all proceedings under the Land Acquisition Act would lapse in the event an award has not been made under Section 11 thereof.

मा.उच्च न्यायालयाच्या वरील निर्णयानुसार जळगाव महानगरपालिकेने दिनांक १०/०४/२०१४ अन्वये नवीन भुसंपादन कायद्याप्रमाणे विहित नमुन्यात भुसंपादनाचा प्रस्ताव सादर केला होता. त्याअनुषंगाने भुसंपादन अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी, जळगाव यांनी दि.२९/०४/२०१६ अन्वये अंतिम निवाडा घोषित केलेला आहे. त्यामध्ये त्यांनी या भुसंपादन प्रकरणी द्यावयाची उर्वरित रक्कम रु.३,८२,८८,९७८/- ची मागणी महानगरपालिकेकडे केलेली आहे.

तथापि, जळगाव महानगरपालिकेच्या नगररचना विभागाच्या अहवालाप्रमाणे संपादित जागेचे एकूण मुल्य हे रु.१,३८,९५,९७४/- इतके येत असल्याने, भुसंपादन अधिकारी यांनी घोषित केलेल्या निवाड्यानुसार निर्धारित केलेल्या रकमेचे पुर्नमुल्यांकन करणेबाबत महानगरपालिकेमार्फत दि.०८/११/२०१६ अन्वये जिल्हाधिकारी, जळगाव यांना कळविण्यात आले होते. मात्र, जिल्हाधिकारी यांनी दि.०८/११/२०१६ अन्वये महानगरपालिकेने दाखल केलेल्या हरकती फेटाळून निकाली काढल्या. त्यामुळे महानगरपालिकेने विभागीय आयुक्त, नाशिक विभाग, नाशिक यांना दि.२२/११/२०१६ अन्वये उक्त मुल्यांकनाची फेर तपासणी करणेबाबत जिल्हाधिकारी, जळगाव यांना आदेश देण्याची विनंती केली होती. त्यावर विभागीय आयुक्त, नाशिक विभाग यांनी दि.२३/०२/२०१७ अन्वये, "भूमी संपादन पुर्नवसन व पुर्नस्थापना करतांना वाजवी भरपाई मिळण्याचा व पारदर्शकतेचा हक्क अधिनियम २०१३ मधील कलम ३३ नुसार जिल्हाधिकारी हे स्थानिक प्राधिकरण किंवा अन्य प्रभावित व्यक्ती यांनी अर्ज केल्यास घोषित

निवाड्यामध्ये निवाडा घोषित केल्यानंतर सहा महिन्याचे आत दुरुस्ती करण्याचे अधिकार जिल्हाधिकारी यांचे आहेत. त्यानुसार महानगरपालिकेने सदर प्रकरणाची वस्तुस्थिती जिल्हाधिकारी यांच्या निदर्शनास आणून भुसंपादन बाबतची पुढील कार्यवाही करावी," असे महानगरपालिकेस कळविले आहे.

त्याअनुषंगाने आयुक्त, जळगाव महानगरपालिका यांनी दि.१३/०४/२०१७ अन्वये, "सदर जागेचे गुणदोष विचारात घेता, उदा. नाला वगैरे असल्याने सदरची रक्कम ही अवाजवी वाटत आहे. निवाड्यातील रक्कमेवर सविस्तर निर्णय झाल्याशिवाय रक्कम वितरीत करणे उचित होणार नाही असे मत आहे," असे कळविले होते. त्याचप्रमाणे सदर बाब महानगरपालिका प्रशासनाने महासभेसमोर ठेवली असता, महासभेने ठराव क्र.७०३, दि.२०/०६/२०१७ अन्वये, उक्त प्रकरणी निवाडा पुर्व आगाऊ मोबदला म्हणून भुसंपादन अधिकारी यांच्याकडे जमा असलेली मोबदला रक्कम रु.२,०९,४४,४७२/- ही जमीन मालकास वितरीत करु नये, असा ठराव पारित केला.

त्यानंतर जळगाव महानगरपालिका महासभेने ठराव क्र.५१, दि.०७/१२/२०१८ अन्वये, सदर भुसंपादन प्रस्ताव मागे घेण्याबाबत निर्णय घेतलेला आहे. सदर ठरावानुसार महानगरपालिकेने दि.०३/०१/२०१९ अन्वये भूसंपादन प्रस्ताव मागे घेण्याबाबत जिल्हाधिकारी, जळगाव यांना कळविण्यात आले होते. त्याअनुषंगाने समन्वय अधिकारी तथा उपजिल्हाधिकारी, जळगाव यांनी दि.१०/०८/२०२० अन्वये आरक्षण क्र.११२ शासनाकडून रितसर रद्द झाल्यानंतर उक्त भुसंपादन प्रस्ताव रद्द करण्यासाठी फेरसादर करता येईल, असे महानगरपालिकेस कळविले. त्यानुसार महानगरपालिकेमार्फत कार्यवाही करण्यात येत आहे.

दरम्यानच्या कालावधीत जमीनीचे सहमालक सौ.विद्या शैलेंद्र बियाणी यांना कर्करोग झाल्याने त्यांच्या मुलाने भुसंपादन प्रस्तावात जमा असलेल्या आगाऊ मोबदला रकमेची मागणी ही भुसंपादन अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी, जळगाव यांच्याकडे केलेली होती. उक्त मागणीच्या अनुषंगाने, जळगाव महानगरपालिका संपादन संस्था असल्याने जमा असलेली रक्कम हितसंबंधितांना देणेबाबत महानगरपालिकेचा स्वयंस्पष्ट अभिप्राय सादर करण्याबाबत भुसंपादन अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी, जळगाव यांनी दि.०७/०३/२०१८ अन्वये महानगरपालिकेस कळविले होते. तथापि, महानगरपालिकेने यापुर्वीच दि.१३/०४/२०१७ च्या पत्रान्वये, निवाड्यातील रक्कमेवर सविस्तर निर्णय झाल्याशिवाय रक्कम वितरीत करणे उचित होणार नाही, असे जिल्हाधिकारी, जळगाव यांना कळविले होते. तसेच, जळगाव महानगरपालिका महासभेने ठराव क्र.७०३, दि.२०/०६/२०१७ अन्वये, सदर प्रकरणी निवाडा पुर्व आगाऊ मोबदला म्हणून जमा केलेली रक्कम जमीन मालकास वितरीत करु नये, असा ठराव पारित केला आहे. त्यामुळे प्रस्तुत प्रकरणी जमा असलेली आगाऊ मोबदला रक्कम संबंधितांना वितरीत करणेबाबत महानगरपालिकेमार्फत ना-हरकत देण्यात आलेले नाही.

प्रस्तुत प्रकरणी जळगाव पोलीस स्टेशन कडून प्राप्त होणाऱ्या तक्रारी व त्याबाबत पोलिसांकडून वारंवार होणाऱ्या पत्रव्यवहाराबाबत, प्रस्तुत प्रकरणी जळगाव महानगरपालिकेतर्फे वेळोवेळी कायद्यातील तरतुदीनुसार व महासभेने घेतलेल्या धोरणात्मक निर्णयानुसार प्रक्रिया पुर्ण केलेली आहे. याप्रकरणी निरनिराळ्या तक्रारी उल्लेखिलेल्या नुसार संपुर्ण प्रकरणात फौजदारी स्वरुपाची, महानगरपालिकेचे आर्थिक नुकसान करणारी कुठलीही कृती दिसून येत नाही. एकाच विषयाचे अनेक मुद्दे उपस्थित करुन, निरनिराळ्या व्यक्ती तर्फे तक्रारी दाखल झाल्याचे दिसून येत असल्याने, सर्व तक्रारी निकाली काढण्याबाबत तत्कालिन आयुक्त, जळगाव महानगरपालिका यांनी दि.२६/१२/२०१९ च्या पत्रान्वये पोलीस अधिक्षक, जळगाव यांना विनंती करण्यात आली आहे.

***********

लक्षवेधी सूचना क्र. १९१४

महाराष्ट्र विधानसभा

सन २०२३ चे पहिले (अर्थसंकल्पीय) अधिवेशन

**श्री. शिरीष चौधरी, श्री. अबू आजमी, श्री. अनिल पाटील, विधानसभा सदस्य यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अनुसार दिलेली लक्षवेधी सूचना क्र. १९१४ खालीलप्रमाणे आहे:-**

"माहे फेब्रुवारी, २०२३ व त्या सुमारास पालघर जिल्ह्यातील वसई तालुक्या अंतर्गत वसई-विरार महानगरपालिका हद्दीतील मौजे वालीव येथील सर्वे नं. ४७, हिस्सा नं. ७, ७ अ, ७ ब,सर्वे नं. ४८, हिस्सा नं. ६, १०, ११, सर्वे नं. ५०, हिस्सा नं. ३, क्षेत्र २६८१० चौ. मी. जमिनीवर व्यवसायीक व रहिवाशी इमारतीचे बांधकाम करणेकामी आरक्षित तलाव आणि नाल्याच्या जागेवर बेकायदेशीर रित्या भराव करून इमारत बांधकामाची परवानगी मिळविल्याची धक्कादायक बाब निदर्शनास आलेली असणे,वरील नमूद जमिनीत शाहिद अब्दुल हमीद मुस्तफा हुसेन शेख व त्यांच्या कुटूंबियांचे क्षेत्र ४००० चौ. मी. असून हे क्षेत्र दि. २५/११/२००९ रोजीचे कायदेशीर व नोंदणी खरेदीखताने असणे, त्याबाबतचा फेरफार क्र. ५०२९ दि. ०६/१२/२००८ रोजीनुसार सदर क्षेत्र हे. आर. चौ. मी. ४०.००.००, आकार रु. पै. ४००.०० ही जमिन त्यांच्या कुटूंबियांचे बेस्ट बिल्डर्सचे भागीदारांचे नावी वरील नमूद जमिनीच्या ७/१२ चे उता-यात नोंदलेली आहे. सदर ४००० चौ. मी. जमिन ही त्यांचे दि.२५/११/२००८ रोजीचे खरेदीखत त्यावेळेचे प्रस्तावित डेव्हलपमेंट प्लान नुसार बिल्डींग नं. ३ चे एफ विंगचे बांधकाम व बिल्डींग नं. ४ चे डी विंगचे बांधकामाचे डेव्हलपमेंटचे हक्कासहित असणे, उर्वरीत क्षेत्र हे मोना अतुल पटेल यांचे नावी मालक सदरी नोंदलेले असणे,वरील नमूद जमिनींबाबत जिल्हाधिकारी ठाणे यांनी क./महसूल/क -१-टे -९/एस. आर. १३९/२००४ दिलेले बिनशेती परवानगीनुसार (दि. १८/०७/२००५ रोजीची) तत्कालिन सिडको हयांनी बांधकाम परमिशन B. P. ३५६४६,दि. ०२/०९/२००८ रोजीचे क्षेत्र १२७१९.७२ चौ. मी. करीता दिलेली असणे, त्यानुसार डी. पी. रोड क्षेत्र ६४७७.४३ चौ. मी., कॅनल क्षेत्र ८२०६ चौ. मी., तलाव क्षेत्र २९०३.३६ चौ. मी., आर. जी. क्षेत्र २३८४.९५ चौ. मी., सी. एफ. सी. क्षेत्र ७९४.९८ चौ. मी. बांधकाम अनुज्ञेय नाही, असे स्पष्ट आदेशात नमूद केलेले असणे, तसेच महसूल विभागाच्या दिनांक १२/१२/२०२२ रोजीच्या ७/१२ उताऱ्यावर देखील तलाव क्षेत्र २९ गुंठे असल्याची नोंद असणे, मात्र सदर जागेवर तलाव असल्याकारणाने रे. नं. ५४७/२०११ दाव्यात मा. सिव्हील जज्ज (जे. डी.) वसई हया सदर युसुफ कुरेशी मालक मे.निर्माण डेव्हलपर्स विरुध्द बांधकाम मनाई आदेश दिलेले असणे, असे असताना देखील मे.निर्माण या विकासकाने वसई विरार शहर महानगरपालिकेचे नगररचना विभागाचे अधिकारी उपसंचालक वाय. एस. रेड्डी तसेच महसूल विभागातील तहसिलदार, तलाठी, मंडळ अधिकारी यांना हाताशी धरुन नविन रिवाइस प्लान सादर करून तलाव असताना देखील तलाव नसल्याचे खोटेपणाने दाखवून बनावट बांधकाम परमिशन V. P.४२८९/२०२२-२३ अन्वये मंजूर करुन घेणे, त्यासाठी तहसिलदार, तलाठी व मंडळ अधिकारी यांनी विषयांत नमूद जमिनीत तलाव नसलेबाबत खोटा, बंनावट कागदपत्र व पंचनामा तयार केला असणे, यामध्ये संबंधित अधीकारी व

विकासकाने आर्थिक गैरव्यवहार करून सदर ठिकाणी २९ गुंठयाचे तलाव आढळले नसल्याचे अहवालात नमूद करणे,एकीकडे सिडको व मा.जिल्हाधिकारी, ठाणे यांनी आपल्या अहवालात तलाव असल्याचे स्पष्ट नमूद केले असताना देखील संबंधित जबाबदार अधिकारी यांनी आपल्या पदाचा आर्थिक फायद्यासाठी गैरवापर केल्याचे स्पष्ट होणे, यामुळे संबंधित तक्रारदार शाहिद अब्दुल हमीद मुस्तफा हुसेन शेख यांच्यावर अन्याय झाल्याची भावना निर्माण होणे,शासनाची दिशाभूल करून पदाचा गैरवापर केलेल्या वसई तहसिलदार उज्वला भगत, वसई विरार शहर महानगरपालिकेचे नगर रचना अधिकारी वाय. एस. रेड्डी, ज्युनियर इंजिनियर मिताली चंद्रकांत धनगर यांचेविरुध्द आर्थिक गुन्हेगारी, पर्यावरण कायदे व बनावट पंचनामा, अहवाल दाखले, तोतया व्यक्तीसह केलेबाबत फौजदारी गुन्हे नोंदविन्याबाबत शासनाने करावयाची कारवाई ."

## मा. मुख्यमंत्री महोदयांचे निवेदन

वसई विरार शहर महानगरपालिकेने कळविल्यानुसार महानगरपालिका हद्दीतील मौजे वालिव येथील सर्वे नं. ४७ हि.नं. ७, ७ अ, ७ब सर्वे नं. ४८ हि.नं. ६, १०, ११ सर्वे नं. ५० हि.नं. ३ एकूण क्षेत्र २६८१०.०० चौ.मी. संदर्भात तक्रार प्राप्त झाली आहे, ही वस्तुस्थिती आहे. उपरोक्त तक्रारीमध्ये तक्रारकर्त्याने या जमीनी संदर्भात सिडको प्राधिकरणाने यापूर्वी मंजूर केलेल्या बांधकाम परवानग्यामध्ये संमतीशिवाय कोणतेही बदल करु नये, असे कळविले आहे.

सदर प्रकरणी वसई विरार शहर महानगरपालिकेमार्फत कळविण्यात आलेल्या माहिती नुसार उपरोक्त तक्रारीत उल्लेखीत मिळकतीस तत्कालीन नियोजन प्राधिकारी सिडको यांच्यामार्फत दिनांक ०२.०९.२००८ रोजी दिलेल्या बांधकाम परवानगीत एकूण भूखंडाचे क्षेत्र २६८१०.०० चौ.मी. असून निव्वळ भूखंड क्षेत्र १७२९५.९१ चौ.मी. दर्शविण्यात आले आहे. तथापि, तलावाचे क्षेत्र म्हणून २९१७.९६ चौ.मी. समाविष्ट आहे. तथापि, उपरोक्त क्षेत्रापैकी मूळ बांधकाम परवानगी १३२७६.७५ चौ. मी. तर दिनांक ०१.११.२०२२ रोजी महानगरपालिकेकडून प्रदान सुधारीत बांधकाम परवानगी ३५४६१.७८ चौ.मी. आहे.

सदर सुधारीत बांधकाम परवानगी देणे अंतर्गत संबंधित वास्तुविशारद यांच्याकडून दाखल करण्यात आलेल्या प्रस्तावानुसार सदर मिळकतीवर तलाव असल्याचे किंवा महानगरपालिकेच्या विकास आराखड्यात या क्षेत्रावर तलावाचे कोणतेही आरक्षण नमूद करण्यात आलेले नाही. तसेच गाव नमूना १४ मध्ये उपरोक्त मिळकतीवर कोणत्याही तलावाचा उल्लेख नाही. सदर प्रस्तावास अनुसरुन वसई विरार शहर महानगरपालिकेकडून महसूल विभाग, वसई यांच्याशी झालेल्या पत्रव्यवहारामध्ये दिनांक २२.०६.२०२२ रोजीच्या पत्रान्वये उक्त जागा मोकळी असून आज रोजी तलाव किंवा जलप्रणाली दिसून न आल्याबाबत महानगरपालिकेस कळविले आहे. वसई विरार शहर महानगरपालिकेमार्फत दिनांक १२.०९.२०२२ रोजी सदर जागेच्या पंचनाम्यात उक्त मिळकतीवर तलाव नसल्याचे निदर्शनास न आल्याने दिनांक ०१.१२.२०२२ रोजी सदरच्या बांधकाम प्रस्तावास एकत्रिकृत विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावली कलम २.५ अन्वये सुधारीत बांधकाम परवानगी

प्रदान करण्यात आली आहे. दरम्यान सदर मिळकतीवर श्री. मुबारक हुसेन मुस्तफा शेख यांच्याकडून दिनांक १६.०१.२०२३ रोजी बांधकाम परवानगी देण्यास हरकत उपस्थित केली असता संबंधितांची दिनांक १५.०२.२०२३ रोजी सुनावणी देण्यात आली आहे.

प्रस्तुत मिळकतीच्या अनुषंगाने दिनांक २२.०२.२०२३ रोजी सुधारीत बांधकाम परवानगी देण्याबाबतचा प्रस्ताव सादर झाला असून श्री. शेख यांच्याकडून प्राप्त झालेल्या तक्रारीची दखल घेत जमीनीचे एकूण क्षेत्रापैकी ४०००.०० चौ.मी. क्षेत्रफळ व तलावाकरीता दर्शविण्यात आलेले क्षेत्रफळ वगळून सुधारीत बांधकाम परवानगी एकत्रिकृत विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावली कलम २.५ अन्वये प्रदान करण्यात आली आहे. उपरोक्त परवानगीमध्ये निव्वळ भूखंडाचे क्षेत्र १३५१५.०८ चौ.मी. व सुधारीत बांधकाम परवानगीचे क्षेत्र २२४७८.५१ चौ.मी. असल्याचे महानगरपालिकेने कळविले आहे.

****

एच–२९९–२.

नगर विकास विभाग

लक्षवेधी सूचना

## सन २०२३ चे पहिले (अर्थसंकल्पीय) अधिवेशन

**श्री. विनोद निकोले, मा.विधानसभा सदस्य यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अनुसार दिलेली लक्षवेधी सूचना पुढीलप्रमाणे आहे:-**

"राज्यात राज्यात ठाणे जिल्हयातील मिरा रोड येथील सृष्टी सेक्टर दोन अ मध्ये मेसर्स एवर स्माईल प्रायव्हेट लिमिटेड या बांधकाम कंपनीकडून भव्य प्रकल्प बांधण्यात येत असल्याची बाब नुकतीच निदर्शनास येणे हा प्रकल्प सीआरझेड बाधीत जागेत बांधण्यात येत असून त्यासाठी कंपनीने पर्यावरण विभागकडून कोणतीही परवानगी घेतलेली नसणे या विरोधात स्थानिक रहिवाशांनी राष्ट्रीय हरित लवादाकडे याचिका दाखल केली असणे त्या त्यावर त्यावरील सुनावणीत लवादाने त्रिसदस्य समिती स्थापन करुन ते अनधिकृत बांधकाम पाडण्याचा अहवाल सादर करण्याचे आदेश देत या प्रकल्पास लावादाने चांगला धक्का दिलेला असणे लवादाच्या आदेशामुळे यावर स्माईल कंपनीच्या प्रकल्पातील सदनिका खरेदी करणाऱ्या ग्राहकांच्या गुंतवणुकीवर चिंता व्यक्त केली जात असणे या प्रकल्पाच्या बांधकामाचा मार्ग मोकळा करण्यासाठी पालिकेतील तत्कालीन वृक्षप्राधिकरण समिती च्या परवानगी केली प्रशासनाने गृह प्रकल्प आज येणारी सुमारे २५० हुन अधिक झाडावर कुराड चालवली असणे या गृह प्रकल्पाचे काम सुरु करण्यात आले पण हा गृहप्रकल्प सीआरझेड बाधित जागेत असताना ही सागरी किनारा व्यवस्थापन समिती व पर्यावरण विभागाचे अधिसूचना तसेच केंद्र सरकारच्या पर्यावरण विभागाच्या २००६ मधील अधिसूचनेनुसार पर्यावरण विभागाची कोणतीही परवानगी कंपनीकडून घेण्यात आलेली नसणे परवानगी न घेताच कंपनीने केवळ पालिकेचे बांधकाम परवानगी घेत ०३ लाख २३ हजार ६५६ मीटरच्या बांधकामाला परस्पर सुरुवात करणे यामुळे पालिकेने कंपनीला बांधकाम परवानगी देताना पर्यावरण विभागाची परवानगी घेऊनच बांधकाम करायला हवे होते अशी अट घातली असतानाही कंपनीने त्याकडे परस्पर दुर्लक्ष करणे, त्यामुळे मिरा-भाईंदर मधील मौज पेनकरपाडा सर्वे.क्र. २३५ नवा ६८ या भूखंडावरील मेसर्स एवर स्माईल प्रॉपर्टी यांनी आदिवासी समाजातील संरक्षण कोळ जमीन हक्काची व पर्यावरण महसुली भागाची फसवणूक केल्याने जबाबदार अधिकारी वर्गावर कायदेशीर कारवाई करण्यात बाबत हरित लवादाने दिलेल्या आदेशाची अद्याप अंमलबजावणी न केल्याने सर्वसामान्य नागरिक नाराजी व्यक्त करीत असणे यावर शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना..."

## मा. मुख्यमंत्री महोदयांचे निवेदन

मिरा भाईंदर शहराची विकास योजना (वगळलेला भाग सोडून) शासन अधिसूचना, दि.१४.०५.९७ अन्वये मंजूर करण्यात आलेली असून, ती दि.१५.०७.९७ पासून अंमलात आलेली आहे. वगळलेल्या भागाची विकास योजना शासन अधिसूचना, दि.२५.०८.२००० अन्वये मंजूर झालेली असून, ती दि.१५.१०.२००० पासून अंमलात आलेली आहे. मंजूर विकास नियंत्रण नियमावलीत निर्णय, दि.२९.०८.२००९ अन्वये फेरबदल मंजूर झाले आहेत. तसेच, दि.०२.१२.२०२० पासून मिरा भाईंदर महानगरपालिकेसह संपूर्ण राज्यकरीता (शासन आदेशातील नमुद्र भाग वगळून) UDCPR नियमावली लागू झालेली आहे.

मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील मिरारोड (पूर्व) येथील मौजे-पेणकरपाडा, स.क्र. ६३(२३१), ६५(२३२), ६६(२३३), ६७(२३४), ६८(२३५), ६४/२/(२४०/२), ३९(२०७), ४९(२१७), ५०/२१८), ५१(२१९), ५२(२२०), ६०/१, २(२२८/१,२), ६१(२२९), ६२/१,२(२३०/१,२), ४(१७५), ७९(१८७), ७१(२२६), ७४(२३८), ७६(२३९), ७७(२४४), ७८(२५५), ६९(२५६) ७०(२५७), ७५ (२५५) या एकत्रित जागेत विद्यमान "सृष्टी गृहसंकुलल अस्तित्वात असून सदर गृहसंकुलास तत्कालिन ग्रामपंचायत कालावधीतून नकाशे मंजुरी व बांधकाम परवानगी प्राप्त आहे. सदर जागेत जिल्हाधिकारी, ठाणे यांचेकडील दि.२८.०२.१९८५, दि. २०.०३.१९८५ व दि. ०२.०७.१९८५ अन्वये अकृषिक परवानगी प्राप्त आहे.

सदर गृहसंकुलाच्या रेखांकनात तत्कालिन ग्रामपंचायत कालावधी, तत्कालीन नगरपरिषद कालावधीपासून विद्यमान महानगरपालिका कालावधीत वेळोवेळी सुधारीत रेखांकन मंजुरीसह सुधारीत बांधकाम परवानगी, जोत्याचा दाखला, भोगवटा दाखला इ. विविध परवानग्या देण्यात आल्या आहेत. सदर जागेचे विकासक मे. एव्हरस्माईल प्रॉपर्टीज प्रा.लि. हे आहेत.

सदर गृहसंकुलातील सेक्टर IIA मधील सं.क्र. ६६(२३३)पै, ६८(२३५) पै,व ६९(२५६) या जागेतील ३७८८०.४३ चौ.मी. या मोकल्या जागेत विकासक मे. एव्हरस्माईल प्रॉपर्टीज प्रा.लि. द वास्तुविशारद में. दिशा डिझाईन कन्सल्टंट यांस त्यांचेकडील दि.०५.०३.२०२१ व दि.०८.०३.२०२१ रोजीच्या पत्राच्या अनुषंगाने महानगरपालिकेने त्यांस दि.१०.०३.२०२१ अन्य इमारत प्रकार अे ते आय, क्लब हाऊस व MLCP (क) इमारतीकरीता बांधकाम क्षेत्र ६३२१६.९० चौ.मी. करीता इमारतीच्या जोत्यापर्यंत नकाशे मंजुरीसह बांधकाम परवानगी देण्यात आली आहे.

शासनाचे पर्यावरण विभागाकडील सन २०११ सालच्या प्रसिद्ध अधिसूचनेनुसार मंजूर झालेल्या CRZ नकाशानुसार प्रस्तावाखालील जागेपैकी ६८ (२३५) पै. ६९(२५५) हि जागा भागा CRZ ने बाधीत होत असून सदर बाधीत जागेच्या अनुषंगाने संबंधित विकासकाने MOZMA य प्राधिकरणाकडील पत्र क्र. CRZ २०१८ /CR-२७३/TC-४ दि.०७/०६/२०१९ अन्वये नाहरकत दाखला प्रस्तावासोबत सादर केला आहे. सदर ना-हरकत दाखल्यानुसार CRZ-II मध्ये बांधकाम करणेत अनुमती दिलेली आहे.

यानंतर सदर जागेत संबंधित विकासक यांचे नविन सल्लागार अभियंता मे. तेजस कन्सल्टंट यांचे दि.१६.०७.२०२१ व. दि.२४.०३.२०२१ रोजीच्या प्रस्तावाच्या अनुषंगाने महानगरपालिकेने त्यांस दि.२६.०८.२०२१ अन्वये इमारत प्रकार "अ", "बी" (२ बेसमेंट + स्टिल्ट + २ पार्ट पोडियम + १). इमारत प्रकार "सी" (२ बेसमेंट + पार्ट स्टिल्ट + २ पौडीयम), इमारत प्रकार जी (२ बेसमेंट + स्टिल्ट + २. पार्ट पोडीयम), "ए" (२ बेसमेंट + स्टिल्ट +१ पार्ट पोडीयम) व 'अे', 'बी (पोडियम) करीता बांधकाम क्षेत्र ४६०२:४१ चौ.मी. (Gross built up क्षेत्र १९३६५.३२ चौ.मी.) सुधारीत नकाशे मंजुरीसह सुधारीत बांधकाम परवानगी देण्यात आली आहे.

यानंतर सदर जागेत संबंधित विकासक व सल्लागार अभियंता यांचे दि.२५.०३.२०२२ व दि.३०.०३.२०२२ रोजीच्या प्रस्तावाच्या अनुषंगाने त्यांस महानगरपालिकेच्या दि.३१.०३.२०२२ बांधकाम क्षेत्र ८३९१.०५ चौ.मी. (Gross built up क्षेत्र १९९७३.८४ चौ.मी.) करीता सुधारीत बांधकाम परवानगी देण्यात आली आहे.

सदर जागेतील CRZ-II या प्रकाराने बाधीत जागा सद्यस्थितीत मोकळी आहे. सदर जागेत नियोजित बांधकामामध्ये बाधित झाडे काढणे / पुर्नःरोपण करणेकामी Geo Tagging फोटोसह अहवाल मे. एव्हरस्माईल प्रॉपर्टीस प्रा. लि. यांचे दि.१२.०३.२०२१ रोजीचा पत्रान्वये व दि.१०.०३.२०२१ रोजीचे नगररचना विभागाचे, बांधकाम प्रारंभपत्र (नकाशे मंजुरीसह) (फक्त जोत्यापर्यंत) अन्वये बांधकामाच्या आराखड्यामध्ये बाधित १६७ वृक्ष मुळासहित काढणे व ३० वृक्ष पुर्नःरोपण करणे असे एकूण १९७ वृक्ष काढणे / पुर्नःरोपण करणेकामी जाहिर वृत्तपत्रामध्ये प्रसिध्दी देवुन सूचना व हरकती मागविण्यात आलेल्या होत्या. सदर तक्रारीच्या अनुषंगाने वृक्ष प्राधिकरण समिती सभा ठराव क्र. ०१, दि.२७.१२.२०२१ अन्वये १६७ वृक्ष मुळासहित काढणे व ३० वृक्ष पुर्नःरोपण करणे असे एकूण १९७ वृक्ष काढणे पुर्नःरोपण करणेकामी मंजुरी देण्यात आली आहे. त्याकामी प्रती झाडे रु.५,०००/- या प्रमाणे १९७ वृक्षांचे रु.९,८५,०००/- अनामत रक्कम व पाहणी फी प्रती झाड रु.१००/- या प्रमाणे रु.१९,७००/- असे एकूण रु.१०,०४,७००/- रक्कम महानगरपालिका फंडात जमा केल्यानंतर संबंधितास दि.०६.०१.२०२२ अन्वये परवानगी देण्यात आली आहे. सदर प्रकल्पामध्ये २५० हुन अधिक झाडे येत नसुन १६७ वृक्ष मुळासहित काढणे व ३० वृक्ष पुर्नःरोपण करणे असे एकूण १९७ वृक्ष काढणे / पुर्नःरोपण करणेकामी मंजुरी देण्यात आली आहे.

सदर जागेतील प्रस्तावित इमारतीबाबत मंजूर नकाशानुसार एकूण Gross built up Area ३,२३,६५६.१५चौ.मी. असून, सदर प्रकरणी शासनाचे पर्यावरण विभागाकडील राज्य तज्ञ मुल्यांकन समिती- २, (SELAA-II) दि. ३०.०६.२०२२ व दि.०१.०७.२०२२ रोजी झालेल्या बैठकिया इतिवृत्तांतानुसार, सदर प्रस्तावास राज्य तज्ञ मुल्यांकन समिती-२ (State Envirement Impact Assessment Authority - II) यांचेकडून पर्यावरण विभागाकडील नाहरकत दाखला देणेस शिफारस करण्यात आली आहे.

सदर प्रकरणात मिरा भाईंदर महानगरपालिकेने संबंधित विकासकास दि.१०.०३.२०२१. दि.२६.०८.२०२१ व दि.३१.०३.२०२२ रोजी दिलेली बांधकाम परवानगी हि UDCPR नियमावली नुसार योग्य असून अनुज्ञेय चटई क्षेत्र निर्देशांकाच्या मर्यादित आहे. तसेच दिलेली बांधकाम परवानगी हो (MCZMA प्राधिकरण यांचेकडील दि.०७.०६.२०१९ रोजीच्या नाहरकत दाखल्यानंतर राज्य शासनाचे परिपत्रक क्रमांक ENV-२०१३/CR३९/TC-१ दि.२१.०४.२०१५ नुसार Gross built up Area २०,००० चौ.मी. च्या मर्यादेत देण्यात आली आहे.

सदर प्रकरणी संबंधित विकासकाने सद्यस्थितीत मंजूर नकाशानुसार वाढीव बांधकाम किंवा बांधकाम परवानगी मधील अटींचे उल्लंघन केल्याचे दिसून येत नाही. मौजे पेणकरपाडा येथील स.क्र.६८ (२३५) या जागेतील प्रस्तावावरील सादर केलेल्या ७/१२ उताऱ्यावर आदिवासी संरक्षण कुळ योजनेतील नोंद दिसुन येत नाही. सदरची जागा ७/१२ उताऱ्यावर "भोगवटादार-१" या प्रमाणे नोंद दिसून येते.

सदर प्रकरणी राष्ट्रीय हरित लवाद यांचेकडील दाखल दावा क्र. १०७/२०२२ च्या अनुषंगाने राष्ट्रीय हरित लवाद यांनी महानगरपालिकेस सदरचे बांधकाम तोडणेबाबत किंवा बांधकाम परवानगीत स्थगिती देणेबाबत कोणतेही स्वतंत्र आदेश दिलेले नाहीत. प्रस्तुत प्रकरण न्यायप्रविष्ट असून, पुढील सुनावणी दि. ०२.०८.२०२३ रोजी आयोजित करण्यात आलेली आहे.

विकासकाने सद्य:स्थितीत मंजूर नकाशानुसार वाढीव बांधकाम किंवा बांधकाम परवानगी मधील अटींचे उल्लंघन केल्याचे दिसून येत नाही. तसेच, आजमितीस प्रत्यक्षात जागेवर दि.३१.०३.२०२२ रोजीच्या बांधकाम परवानगी नुसार बांधकाम सुरू असून, पुढील बांधकाम बंद आहे.

याप्रकरणी विकासक मे. एव्हरस्माईल प्राम्पर्टीज यांचेवतीने सल्लागार अभियंता मे. तेजस कन्सल्टंट यांनी दि.२१.०४.२०२३ रोजी सुधारित बांधकाम परवानगी संदर्भात प्रस्ताव सादर केलेला असून, त्यास दि.१०.०५.२०२३ अन्वये १७७५७५.१९ चौ. मी. इतक्या क्षेत्रासाठी मंजूरी देण्यात आलेली आहे.

*********

२१७-२.

# महाराष्ट्र विधानसभा

## सन २०२३ चे अर्थसंकल्पीय अधिवेशन

**लक्षवेधी सूचना क्रमांक २४६१**

**कॅप्टन आर. तमिल सेल्वन, ॲड. आशिष शेलार, श्री. अमित साटम, वि.स.स.** यांनी म.वि.स. नियम १०५ अन्वये उपस्थित केलेले लक्षवेधी सूचना पुढीलप्रमाणे आहे :-

"मुंबईतील माटुंगा पश्चिम मनपा प्रभाग क्रमांक १८९ मधील माटुंगा रोड रेल्वे स्थानकाजवळ विश्वेश्वरय्या उड्डाणपुला शेजारी रेल्वेचा भूखंड असणे, सदर भूखंडावर मागील बऱ्याच काळा पासून झोपडपट्टी वसलेली असणे, सदर झोपडपट्टी ही रेल्वेच्या नव्हे तर मुंबई मधील पदपथावर असल्याची खोटी माहिती देऊन तत्कालीन महानगरपालिका सहाय्यक आयुक्त जी/उत्तर विभाग व इतर अधिकारी यांनी संगनमताने सदर भूखंड गैर मार्गाने विकासकास DCPR 2034 33 (12) ब योजने अंतर्गत विकसित करण्यासाठी दिल्याचे निदर्शनास येणे, याबाबत अतिरिक्त आयुक्त (शहरे) यांना माहिती प्राप्त झाली असता त्यांच्या मार्फत या कामास २८ फेब्रुवारी २०२१ मध्ये स्थगिती देण्यात आली असणे, परंतु फेब्रुवारी २०२३ मध्ये विकासकाने पालिका प्रशासनाला सोबत घेऊन गैरमार्गाने सदर योजनेचा फायदा घेतल्याचे निदर्शनास येणे, विकासकाने महानगरपालिका प्रशासनातील अधिकाऱ्यांना हाताशी घेऊन सदर जागी रहात असलेल्या झोपडपट्टी धारकांना नाममात्र रक्कम देऊन त्यांना पुन्हा पदपथावर रहाण्यास भाग पाडले असणे, यामुळे झोपडपट्टी धारकांना त्यांच्या हक्काच्या घरा पासून वंचित रहावे लागत असणे, जेणे करून मुंबई भकास होण्यास मुंबई महानगरपालिका अधिकारीच जबाबदार असल्याचे निदर्शनास येणे, सदरहू झोपड्या या महानगरपालिकेचा प्रस्तावित रस्ता अथवा पदपथावर उभारलेल्या नसणे यामुळे या झोपड्या DPCR २०३४ च्या कलम ३३ (१२) ब प्रमाणे पात्र न नसणे, तरीही महानगरपालिकेने गैरमार्गाने सदर योजनेत विकासकाला फायदा मिळवून देण्यासाठी या झोपड्या DPCR २०३४ च्या कलम ३३ (१२) ब मध्ये समाविष्ट केल्या असणे, सदर बाब म्हणजे प्रचंड मोठा F. S. I. घोटाळा असणे, यामुळे स्थानिक नागरिकांच्या मनात महानगरपालिका प्रशासना बाबत निर्माण झालेले भीतीचे वातावरण व शासनाचे होत असलेले नुकसान लक्षात घेता शासनाने याबाबत करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

### -: मा.मुख्यमंत्री महोदयांचे निवेदन :-

मंजूर विकास आराखडा २०३४ अन्वये टि.एच. कटारिया रस्त्याची रुंदी २४.३८ मी. इतकी असून, पुढे जाणारा टी. एच. कटारिया पुलाची (विश्वेश्वराय) सद्य:स्थितीतील रुंदी १५.२४ मी. इतकी आहे. तसेच टी.एच. कटारिया पुलाशेजारी आवश्यक असणारा पोहोच रस्ता विकसित होणे प्रलंबित आहे.

विश्वेश्वराय पुलाच्या मध्यापासून धारावीच्या दिशेने जाणारा पूल हा धोकादायक वळणाचा असून सदर ठिकाणी अंदुक बिंदू असल्यामुळे यापूर्वी अपघात होऊन जीवित हानी झाल्या आहेत. तसेच विश्वेश्वराय पुलावरील अतिरिक्त भार कमी करण्याकरिता विश्वेश्वराय पुलालगत असलेल्या बाधीत झोपड्यांचे निष्कासन करणे अत्यंत गरजेचे होते.

सदर प्रकरणी स्थगिती देण्याबाबतची कोणतीही कागदपत्रे बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या अभिलेखावर आढळून आलेली नाहीत. स्थानिक लोकप्रतिनिधींनी विश्वेश्वराय (टी.एच.कटारिया) मार्ग येथील बाधीत रहिवाशांचे पुनर्वसन करण्याकरिता दिलेल्या पत्रास अनुसरुन बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत सर्व्हेक्षण करण्यात आले असता, तेथे एकूण १७ झोपड्या आढळून आल्या.

तद्नंतर मध्य रेल्वे विभागाच्या कर्मचाऱ्यांसमवेत दिनांक १७ ऑगस्ट, २०२२ रोजी स्थळपाहणी करण्यात आली असता, रेल्वेची हद्द विश्वेश्वराय (टी.एच.कटारिया) पुल संपल्यानंतर बेस्ट विद्युत खांब क. के.आर.बी. ३५ च्या पूर्वी असल्याचे तसेच, सदर झोपड्यांना रेल्वेमार्फत कोणत्याही प्रकारची नोटीस दिली गेली नाही असे सांगण्यात आले. सदर झोपड्या प्लेन टेबल सर्व्हेनुसार विश्वेश्वराय पुलाच्या हद्दीत असल्याचे समजते.

सदर १७ झोपड्या विश्वेश्वराय (टी.एच.कटारिया) पुलाची डागडुजी करण्यास अडथळा निर्माण करीत होत्या. त्यामुळे सदर झोपड्यांचे निष्कासन करणे गरजेचे होते. त्यानुसार काही इच्छुक विकासकांनी सदर प्रकल्पबाधीत झोपडीधारकांना सदर विकासकांच्या पुनर्वसन प्रकल्पामध्ये समाविष्ट करुन घेण्याकरिता बृहन्मुंबई महानगरपालिकेस विनंती केली होती. बाधीत झोपडीधारकांनी सादर केलेल्या कागदपत्रांची पडताळणी करुन महानगरपालिकेच्या प्रचलित धोरणानुसार / नियमावलीनुसार विकास नियंत्रण प्रोत्साहन नियमावली २०३४ कलम ३३ (१२) अन्वये विकासकांना ना-हरकत प्रमाणपत्र देण्यात आले. सदर १७ झोपड्यांचे निष्कासन करण्यात आले असून, सद्य:स्थितीत तेथे एकही झोपडी अस्तित्वात नाही. ना-हरकत प्रमाणपत्रानुसार विकासकाने सदर झोपडीधारकांचे पुनर्वसन करण्याकरिता प्रस्तावित पुनर्वसन प्रकल्पामध्ये तरतूद केली असून, सदर झोपडीधारकांचे तात्पुरते पुनर्वसन इतरत्र केले आहे.

*******

# महाराष्ट्र विधानसभा

**नगर विकास विभाग** **लक्षवेधी सूचना**

**सन २०२३ चे पहिले (अर्थसंकल्पीय) अधिवेशन**

**श्रीमती सीमा हिरे, मा.विधानसभा सदस्य यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अन्वये दिलेली लक्षवेधी सूचना पुढीलप्रमाणे आहे :-**

"नाशिक महानगरपालिकेने गेल्या काही वर्षांपासून वाचनालय, अभ्यासिका, व्यायामशाळा, समाज मंदिर, ज्येष्ठ नागरिक विरंगुळा केंद्रे यांचे दर वाढवल्यामुळे ते नागरिकांना परवडणार नसणे, त्यामुळे महानगरपालिकेने सदरच्या मिळकती २००८ पासून सील करण्यात आल्या असणे, त्यामुळे नागरिकांची मोठ्या प्रमाणात अडचण होत असणे, रेटीरेकनर प्रमाणे सतत वाढ होत असल्याने या मिळकती तशाच पडून असणे, त्याचा कोणताही फायदा नागरिकांना होत असणे, वापर नसल्यामुळे या मिळकतींची दुरावस्था होत असणे, यावरील केलेला खर्च वाया जात असणे, या मिळकती नागरिकांसाठी तातडीने खुल्या होणे अत्यंत गरजे असणे, त्याकरीता महानगरपालिकेने मिळकतीवर आकारण्यात येणारे दर कपात करणे गरजेचे असणे, नाममात्र दर कायम करून या मिळकती नागरिकांसाठी खुल्या करण्याची आवश्यकता, याकरीता शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

## मा.मुख्यमंत्री महोदयांचे निवेदन

नाशिक महानगरपालिका क्षेत्रातील सर्वेक्षण केलेल्या मिळकतींपैकी कराराची मुदत संपलेल्या, विनामंजूरी ताब्यात असलेल्या, ठरावाने ताब्यात असलेल्या मिळकती अनाधिकृतपणे संस्था/मंडळ/व्यक्ती यांचे ताब्यात असल्याने, सदर मिळकती महानगरपालिकेच्या ताब्यात घेण्याबाबत सन २०१८-२०१९ मध्ये निर्देश देण्यात आले होते. त्याअनुषंगाने, आयुक्त, नाशिक महानगरपालिका यांनी दि.११/०४/२०१९ च्या आदेशान्वये, सहाय्यक संचालक नगररचना यांचे अध्यक्षतेखाली समिती स्थापन करण्यात आली होती. या समितीत क्षेत्रीय स्तरावर कार्यरत असलेले सदस्य यांनी मिळकतींचे सर्वेक्षण करुन, नंतर नियमबाहय वापरात असलेल्या मिळकतींना तात्पुरते सील लावण्याची कार्यवाही करण्यात आली होती.

त्यानंतर यापूर्वी करारनाम्याने दिलेल्या मिळकती ताब्यात असलेले संबंधित संस्था/मंडळ/व्यक्ती हे मिळकतींचे भाडेशुल्क भरावयास तयार असल्यास, सदर मिळकतींचा व्यावसायिक वापर/गैरवापर याबाबत चौकशी करुन, खात्री झाल्यानंतर संबधितांचे हमीपत्र घेऊन, तात्पुरत्या स्वरुपात या मिळकती उघडून देण्याचे दि.१३/०५/२०१९ च्या आदेशानुसार निर्देश देणेत आले होते. तसेच, अभिन्यासातील खुल्या जागेत असलेल्या बांधकामाचा वापर अभिन्यासातील भुखंडधारक हास्यक्लब/विरंगुळा केंद्र/ध्यानधारणा व योगा/ज्येष्ठ नागरीकांकरीता वापर होत असल्यास सदर मिळकतीचा व्यावसायिक वापर होत नसल्याची खात्री करुन सदरच्या मिळकती खुल्या करुन देण्यात याव्यात असे दि.१३/०५/२०१९ च्या आदेशान्वये निर्देश देण्यात आले आहेत.

नाशिक महानगरपालिकेच्या मिळकतीचे संबंधित विभागीय अधिकारी यांचेकडून सर्वेक्षण केले असता, दि. १५ डिसेंबर, २०२२ अखेर करारनामा अस्तित्वात असलेल्या -०५, करारनामा संपलेल्या-२२६, विना करारनामा असलेल्या -१८४, महानगरपालिकेच्या ताब्यात असलेल्या -५१३ व इतर-४९ याप्रमाणे नाशिक महानगरपालिकेच्या एकूण ९७७ मिळकती असल्याचे आढळून आले आहे.

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमचे कलम ७९(क) नुसार, आयुक्तांस, महानगरपालिकेच्या मंजूरीने, महानगरपालिकेच्या मालकीची कोणतीही स्थावर किंवा जंगम मालमता पट्ट्याने देता येईल, विकता येईल, भाड्याने देता येईल किंवा अन्यथा अभिहस्तांतरित करता येईल; परंतु, महानगरपालिकेच्या मालकीची स्थावर मालमत्ता किंवा तिचा कोणताही हक्क, जाहीर लिलावाचा रीतसर कार्यपद्धती अनुसरुन, या कलमाच्या तरतूदीनुसार पट्टयाने देण्यात आला असेल किंवा अन्यथा हस्तांतरित करण्यात आला असेल तर, शासनाने या बाबतीत तयार केलेल्या नियमानुसार स्थावर मालमत्तेच्या उक्त पट्टयाचे तदनंतर नुतनीकरण करणे किंवा हस्तांतरण करणे, महानगरपालिकेसाठी कायदेशीर असेल. तसेच कलम ७९ (ड) नुसार जो मोबदला घेऊन, महानगरपालिकेच्या मालकीची कोणतीही स्थावर मालमत्ता किंवा कोणताही हक्क विकता येईल, पट्टयाने देता येईल, किंवा अन्यथा हस्तांतर करता येईल तो मोबदला, असे अधिमूल्य, भाडे किंवा अन्य मोबदला यांच्या चालू बाजार किमतीपेक्षा कमी असता कामा नये अशी तरतूद आहे.

महाराष्ट्र महानगरपालिका (स्थावर मालमत्ता भाडेपट्टा नुतनीकरण अथवा हस्तांतरण) नियम, २०१९ हे दि.१३/९/२०१९ रोजी प्रसिद्ध करण्यात आले होते. सदर नियमावलीत सुधारणा करण्याचे प्रस्तावित असल्याने, दि.०६/०४/२०२२ च्या पत्रान्वये, या नियमाच्या अंमलबजावणीस स्थगिती देण्यात आली असून, शासनाचे पुढील आदेश होईपर्यंत उक्त नियमावलीनुसार निश्चित दराप्रमाणे भाडेपट्टा वसुलीची कार्यवाही करु नये असे निर्देश देण्यात आले आहेत. तसेच, नुतनीकरण /हस्तांतरण करीत असतांना शासन ज्या दराने भाडेपट्टा निश्चितीकरण करण्याबाबत निर्णय घेऊन सुधारीत आदेश काढेल, तो मान्य असेल व यामुळे येणारा उर्वरीत भाडेपट्टा भरणा त्वरीत करण्यात येईल किंवा अतिरिक्त स्वरुपात वसुली असल्यास सदरची रक्कम पुढील मागणीपत्रात समायोजित करण्यात येईल, अशा स्वरुपाचे हमीपत्र (undertaking) भाडेपट्टा धारकांकडून महानगरपालिकेने घ्यावे, या अनुषंगाने आवश्यक कार्यवाही करावी असे निर्देश देण्यात आले आहेत. शासनाच्या सदर निर्देशानुसार सद्य:स्थितीत नाशिक महापालिकेतील भाडेपट्टा संपलेल्या मालमत्तांचे नुतनीकरण करताना कार्यवाही करण्यात येत आहे.

नाशिक महानगरपालिका महासभा ठराव क्र.२०५, दि.१६.०६.२००६ अन्वये सार्वजनिक वापराच्या मिळकती १० पैसे चौ.फुट या नाममात्र दराने देणेबाबत मंजूरी देण्यात आली आहे. सदर ठरावाच्या अनुषंगाने, नाशिक महानगरपालिकेच्या खुल्या जागा/बांधीव मिळकती बाबत श्री.बाळासाहेब चौधरी यांनी मा.उच्च न्यायालयात जनहित याचिका क्र.२६/२०१२ दाखल केली आहे. सदर याचिकेप्रकरणी मा.उच्च न्यायालयाने दिनांक २१.०४.२०१४ रोजीच्या अंतरिम आदेशान्वये, उक्त ठराव कायद्याच्या विरुध्द असून, सदर ठरावानुसार पुढील आदेश होईपर्यंत कार्यवाही करु नये, असे आदेश दिले आहेत.

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम ७९ मधील मालमत्तेच्या विनियोगाच्या तरतूदी, मा.उच्च न्यायालयाचे दि.२१/०४/२०१४ रोजीचे अंतरीम आदेश या सर्व बाबींचा विचार करता, महानगरपालिकेच्या मिळकती नाममात्र दराने भाडेपट्ट्याने देता येणे सद्य:स्थितीत शक्य नाही. तथापि, महाराष्ट्र महानगरपालिका (स्थावर मालमत्ता भाडेपट्टा नुतनीकरण अथवा हस्तांतरण) नियम २०१९ यामध्ये सुधारणा करुन, भाडेपट्ट्याचे प्रयोजन निहाय दर निश्चित करणे, व्याजाचा दर कमी करणे, भाडेपट्ट्याच्या नुतनीकरणाची मुदत वाढविणे, इत्यादी संदर्भात निर्णय घेण्याची बाब शासनाच्या विचाराधिन आहे.

*************

लक्षवेधी सूचना क्र. २५४९

## महाराष्ट्र विधानसभा
## सन २०२३ चे पहिले (अर्थसंकल्पीय) अधिवेशन

**श्री. अनिल पाटील, विधानसभा सदस्य यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अनुसार दिलेली लक्षवेधी सूचना क्र. २५४९ खालीलप्रमाणे आहे:-**

"वसई-विरार महापालिकेत गेले तीन वर्षांपासून ठेक्याने मनुष्यबळ पुरविण्याचे कंत्राट मे.स्वयंभू ट्रान्सपोर्ट कंपनीला दिल्याचा गंभीर प्रकार दि.२३/१/२०२३ रोजी निदर्शनास येणे, सन २०२२ मध्ये महापालिकेच्या पाणी पुरवठा विभागाला पाणी पुरवठा व्यवस्थापनासाठी नव्याने ४०४ मनुष्यबळ पुरविण्याकरिता ए,सी,बी,ई व डी,एफ,जी,एच,आय या प्रभागासाठी अनुक्रमे तीन ठेके पुढील तीन वर्षासाठी देण्यात येणे, सदरहू ठेके महापालिका आयुक्त अनिलकुमार पवार यांनी सही सह मे.आर.जी.कन्स्ट्रक्शन या नवीन ठेकेदार कंपनीस एक ठेका केवळ ०.९९ टक्के कमी दराने देण्यात चालवित असणे, सदरहू ठेकेदारास सुमारे २० टक्के अतिरिक्त दराने ठेका देण्यात येणे, विशेष म्हणजे तीन पैकी दोन निविदा या एकाच कुटुंबातील असणे, जे स्वत:पती-पत्नी असून त्यांचे सख्खे भाऊ वसई-विरार महापालिकेत सहाय्यक आयुक्त पदावर कार्यरत असणे, एकूण तीन ठिकाणच्या निविदा प्रक्रियेनुसार अदांजपत्रकीय रक्कम ४६ कोटी ५५ लाख १६ हजार ४८० इतकी असून, या २७ ते २८ टक्के जादा दराने असणे, सदर निविदांच्या एकत्रित मंजुरी नंतर ५५ कोटी ८६ लाख १९ हजार ७७६ इतकी स्वीकृती रक्कम असून ज्यामध्ये ठेकेदारास २० टक्क्यांनुसार ९ कोटी ३१ लाख ३ हजार २९६ इतका नफा होणे अपेक्षित असणे, स्वयंभू ट्रान्सपोर्टला ०.९९ नुसार ४६ लाख ८ हजार ६१३ इतका नफा होणे अपेक्षित असताना, महापालिकेने सदरहू ठेकेदार कंपनीस ८ कोटी ८४ लाख ९४ हजार ६८२ रुपयांचा अतिरिक्त फायदा करुन दिल्याचा घडलेला बेकायदा प्रकार, यामुळे महापालिकेचे मोठया प्रमाणात झालेले आर्थिक नुकसान, या संदर्भात या परिसरातील संघटनांनी व लोकप्रतिनिधींनी मा.मुख्यमंत्री महोदयांना दि.२३/१/२०२३ रोजी लेखी निवेदन देऊन सदर कंपनीचा ठेका तात्काळ रद्द करुन त्या कंपनीला काळया यादीत टाकून संबधित अधिकाऱ्यांवर कारवाई करण्याची मागणी करुनही अद्याप यावर शासनाकडून कोणतीच कार्यवाही करण्यात न येणे, याकडे झालेले शासनाचे अक्षम्य दुर्लक्ष, परिणामी येथील जनतेत निर्माण झालेले तीव्र असंतोषाचे व संतापाचे वातावरण, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया"

## मा. मुख्यमंत्री महोदयांचे निवेदन

वसई विरार शहर महानगरपालिकेने कळविल्यानुसार कोविड-१९ महामारीच्या काळात शहराअंतर्गत पाणी वितरण व योजना देखभाल दुरुस्तीसाठी मर्यादित मनुष्यबळ मे. वसुंधरा अर्थ मुव्हर्स प्रा. लि. यांच्याकडून दिनांक २४.०९.२०२० रोजी आदेश देऊन उपलब्ध करुन घेण्यात आले. तद्नंतर माहे सप्टेंबर, २०२२ ते नाव्हेंबर २०२२ अखेर पर्यंत सदर कामी मे. स्वयंभू ट्रान्सपोर्ट या ठेकेदाराकडून पाणीपुरवठा विभागासाठी आवश्यक मनुष्यबळ घेण्यात आले. सदर ठेकेदार हा प्रत्यक्षात महानगरपालिकेच्या आस्थापना विभागाकडील मंजूर ठेकेदार असून त्यांच्यामार्फत अन्य विभागाकडून येणाऱ्या मागणीनुसार आस्थापना विभागामार्फत मनुष्यबळ पुरविण्यात येत होते.

त्यांचा मंजूर निविदेचा दर ०.९९% ज्यादा इतका असला तरी प्रत्यक्षात शहराच्या पाणी पुरवठा वितरण व देखभाल दुरुस्ती कामाकरीता त्यांचा कोणताही थेट संबंध नाही.

उपरोक्त कालावधीत मे. स्वयंभू ट्रान्सपोर्ट यांच्यामार्फत पाणीपुरवठा विभागासाठी केवळ मनुष्यबळ उपलब्ध होत असल्याने, त्यामध्ये जलवाहीन्या देखभाल दुरुस्तीकरीता इतर साहीत्य, यंत्रसामुग्री पुरवठा इत्यादी बाबींचा समावेश नसल्याने त्यामुळे पाणीपुरवठा वितरण व योजना देखभाल दुरुस्तीमध्ये महानगरपालिकेस अनेक अडचणी येत असल्याकारणाने उपरोक्त ठेकेदाराकडून घेण्यात येणारे मनुष्यबळ दिनांक ०१.१२.२०२२ पासून बंद करण्यात आले आहे. तद्नंतर महानगरपालिकेच्या ९ प्रभाग समिती कार्यक्षेत्रा अंतर्गत पाणीपुरवठा वितरण व जलवाहीन्या देखभाल दुरुस्तीसाठी आवश्यक मनुष्यबळ व साहीत्य पुरवठ्यासह ३ झोन करुन निविदा प्रक्रिया राबवून ३ मंजूर ठेकेदारांना कार्यादेश देण्यात आले. सदरची निविदा प्रक्रिया ई-निविदेद्वारे महाटेंडर संकेत स्थळावरुन राबविली असून त्यामध्ये कोणतीही अनियमितता झाली नसल्याचे महानगरपालिकेने कळविले आहे.

सदर ठेका अंतर्गत यापूर्वी महानगरपालिकेद्वारे वापरात असलेली बाह्ययंत्रणेद्वारे व्यवस्थापन कार्यपध्दती पुढील ३ वर्षाकरीता प्रचलित दर सूचीवर आधारीत अनुक्रमे रु. १०.६३ कोटी, रु. १८.१६ कोटी व रु. १७.७६ कोटी किंमतीची अंदाजपत्रके ३ झोनसाठी तयार करण्यात आली. मागील काही वर्षात दुरुस्ती साहीत्य, मजुरीच्या दरात झालेली वाढ तसेच ठेक्याच्या ३ वर्षात प्रत्येक वर्षी होणारी संभाव्य भाववाढ, करापोटी होणाऱ्या वजावट इत्यादी बाबी गृहीत धरल्यास या कामासाठी ३ वर्षासाठी मंजूर केलेले दर ठेकेदारास अनावश्यक जादा दराने मंजूर केले, अतिरिक्त फायदा करुन दिला व त्यामुळे महानगरपालिकेचे आर्थिक नुकसान झाले हे म्हणणे संयुक्तीक होणार नाही, असे महानगरपालिकेने नमूद केले आहे. महानगरपालिकेस शहरा अंतर्गत सद्यस्थितीत पाणी वितरण व योजना देखभाल दुरुस्तीकरीता सध्या लागणारे मनुष्यबळ व भविष्यातील व पाणी व्यवस्थापन कामासाठी लागणारे मनुष्यबळ विचारात घेता ठेक्यावरील मंजूर दरानुसार वार्षिक रु. १२.८६ कोटीचा खर्च मनुष्यबळाकरीता व उर्वरीत खर्च साहित्य, वाहने, अवजारे इत्यादीकरीता गृहीत धरण्यात आला आहे.

सदर प्रक्रियेत व्यवस्थापनकामांतर्गत एकत्रित निविदा काढल्याने, मनुष्यबळ व देखभाल दुरुस्ती याचा समावेश असल्याने महानगरपालिकेच्या खर्चात कपात झाल्याचे महानगरपालिकेने कळविले आहे.

दरम्यान वसई विरार शहर महानगरपालिकेच्या पाणी वितरण व देखभाल दुरुस्ती करीता मनुष्यबळ पुरविण्याच्या ठेक्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधींनी शासनाकडे तक्रार दाखल केली आहे, ही वस्तुस्थिती आहे. उपरोक्त तक्रारीस अनुसरुन वसई विरार शहर महानगरपालिकेकडून सखोल चौकशी करण्यात आली असून सद्यस्थितीत व्यवस्थापन कामांना महानगरपालिकेमार्फत स्थगिती देण्यात आली आहे. तसेच पाणी वितरण व योजना देखभाल दुरुस्तीची कामे सद्यस्थितीत महानगरपालिकेच्या आस्थापना विभागाकडील मंजूर ठेक्याद्वारे करण्यात येत आहेत.

****

महाराष्ट्र विधानसभा

सन २०२३ चे प्रथम (अर्थसंकल्पिय) अधिवेशन

**मा. श्री. अतुल भातखळकर, श्री.छगन भुजबळ मा. विधानसभा सदस्य यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम, १०५ अन्वये उपस्थित केलेली लक्षवेधी सूचना क्र. ११ पुढीलप्रमाणे आहे –**

**"राज्यामध्ये रोज एकूण ८१९ कोटी लिटर सांडपाण्याची निर्मिती होत असताना केवळ २५ टक्के पाण्यावर प्रक्रिया होणे, उर्वरित ७५ टक्के पाणी कोणतीही प्रक्रिया न करताच थेट नद्यांमध्ये सोडण्यात येत असल्याची धक्कादायक बाब माहे जानेवारी २०२३ मध्ये निदर्शनास येणे, त्यामध्ये, जलजीवांसह नागरिकांच्या आरोग्यावरही याचा घातक परिणाम होणे, त्याला प्रतिबंध घालण्यात अपयश येत असल्याचे उपलब्ध आकडेवारीवरून स्पष्ट होणे, तसेच, महापालिका, नगरपरिषदांनी त्यांच्या अंदाजपत्रकातील २५ टक्के निधी हा सांडपाणी प्रक्रिया प्रकल्प उभारण्यासाठी राखीव ठेवण्याचे निर्देश असताना त्याकडे दुर्लक्ष होत असल्याचे निदर्शनास येणे, त्यामुळे, नदी प्रदूषणास कारणीभूत असणाऱ्यांवर कडक कारवाई करण्याची गरज असणे, तसेच, सांडपाणी प्रक्रिया प्रकल्प निर्मितीसाठी शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."**

---

<u>मा. मुख्यमंत्री (पर्यावरण व वातावरणीय बदल) यांचे निवेदन</u>

महाराष्ट्र राज्यात एकुण ४०३ स्थानिक स्वराज्य संस्था असून त्यामध्ये २८ महानगरपालिका आहेत. राज्यामध्ये एकुण एकूण ८१९२ दशलक्ष लिटर सांडपाण्याची निर्मिती होत असून त्यापैकी महानगरपालिका हद्दीमधून ८५% सांडपाणी निर्माण होते व उर्वरित १५% सांडपाणी नगरपालिका, नगरपंचायत, कटकमंडळे यांच्या हद्दीतून निर्माण होते. राज्यामध्ये निर्माण होणाऱ्या एकूण ८१९२ दशलक्ष लिटर सांडपाण्यापैकी एकूण २७२८ दशलक्ष लिटर सांडपाणी नदीकाठावरील स्थानिक स्वराज्य संस्थामधून निर्माण होते. त्यापैकी एकूण २०२४ दशलक्ष लिटर सांडपाण्यावर प्रक्रिया करण्यात येऊन प्रक्रियाकृत व अप्रक्रियाकृत सांडपाणी नजीकच्या नद्यांमध्ये सोडण्यात येते.

देशातील नद्यांच्या प्रदूषित पट्ट्यांबाबत मा. राष्ट्रीय हरित लवाद, दिल्ली यांच्याकडे दाखल मूळ अर्ज क्र. ६७३/२०१८ मध्ये मा. लवादाने दिनांक २०/०९/२०१८ रोजी आदेश पारित करुन संपूर्ण देशामध्ये ३५१ प्रदूषित पट्टे असून त्यामध्ये राज्यातील ५३ प्रदूषित पट्ट्यांचा समावेश करण्यात आला आहे. मा. राष्ट्रीय हरित लवादाच्या आदेशानुसार शासनाने दि.१३/१२/२०१८ रोजी नदी पुनरुत्थान समिती गठीत करण्यात आली आहे. सदर समितीने ५३ प्रदूषित नद्यांचे कृती आराखडे तयार करुन केंद्रीय प्रदूषण नियंत्रण मंडळास सादर केले असून

सदर कृती आराखड्याच्या अंमलबजावणीचे काम विविध विभागामार्फत सुरु आहे. तसेच मा. हरित लवादाच्या निर्देशानूसार प्रदूषित नदी पट्ट्यांमध्ये प्रदूषण रोखण्याकरीता स्वतंत्र पर्यावरण संनियंत्रण दलाची स्थापना प्रदूषित पट्टे असलेल्या सर्व जिल्ह्यांमध्ये करण्यात आलेली आहे. मा. हरित लवादाने दिलेल्या निर्देशानूसार केंद्रिय जलशक्ती मंत्रालयाकडून वेळोवेळी आढावा घेण्यात येऊन त्याबाबतचा त्रैमासिक अहवाल मा. हरित लवादास सादर करण्यात येतो.

राज्यातील नद्यांच्या काठावरील शहरातून निर्मित होणाऱ्या सांडपाण्यावर प्रक्रिया करण्यासाठी बहुतांश ठिकाणी सांडपाणी प्रक्रिया संयंत्रणा उभारण्यात आलेल्या आहेत. महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळामार्फत कोणत्याही उद्योगास विनाप्रकिया सांडपाण्याचा विसर्ग करण्यास परवानगी देण्यात येत नाही. तसेच, राज्यातील महानगरपालिकांना त्यांच्या वार्षिक अंदाजपत्रकात २५ % रकमेची तरतूद सांडपाणी व नागरी घनकचऱ्याच्या व्यवस्थापनासाठी करण्याचे निर्देश महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळामार्फत देण्यात आले आहेत. त्यानुसार राज्यातील एकुण ८५ % सांडपाण्याची निर्मिती करणाऱ्या महानगरपालिकांकडून त्यांच्या वार्षिक अंदाजपत्रकात २५ % रकमेची तरतूद करण्यात येते.

महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळामार्फत घरगुती सांडपाणी प्रक्रिया आणि नागरी घनकचरा स्थापनेसाठी स्थानिक स्वराज्य संस्थांना वेळोवेळी नोटीसा बजावण्यात येतात. तसेच जलप्रदूषण कायद्याअंतर्गत दोषी आढळून आलेल्या स्थानिक स्वराज्य संस्थांवर विविध न्यायालयांमध्ये खटले दाखल केले जातात.

उपसंचालक आरोग्य सेवा, राज्य सार्वजनिक आरोग्य प्रयोगशाळा, पुणे यांच्याकडून प्राप्त अहवालानूसार दुषित आढळून आलेल्या पाणी स्त्रोतांचे योग्य प्रकारे शुध्दीकरण करण्याची जबाबदारी पाणी पुरवठा करणाऱ्या संबंधित संस्थाची असून, दुषित आढळून आलेल्या पाणी स्त्रोतांची पाहणी करुन काही त्रुटी आढळल्यास त्या दुरुस्त्या करुन आणि योग्य प्रकारे शुध्दीकरण करुन सदर नमुने पुनर्तपासणीअंती पिण्यास योग्य असल्याची खात्री करुनच पिण्यास वापरण्याबाबतच्या सूचना संबंधितांना दिल्या गेल्या आहेत. सहआयुक्त पशुसंवर्धन, रोग अन्वेषण विभाग यांच्याकडून प्राप्त अहवालानुसार सांडपाण्यामुळे जनावरांच्या त्वचेवर होणाऱ्या परिणामाबाबत कोणतीही बाब आढळून आली नसल्याबाबत कळविले आहे.

*******

पर्यावरण व वातावरणीय बदल विभाग

लक्षवेधी सूचना क्रमांक - १५३४

महाराष्ट्र विधानसभा

सन २०२३ चे प्रथम (अर्थसंकल्पिय) अधिवेशन

मा. श्री. विनोद निकोले, मा. विधानसभा सदस्य यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम, १०५ अन्वये उपस्थित केलेली लक्षवेधी सूचना क्र. १५३४ पुढीलप्रमाणे आहे -

"राज्यात पालघर जिल्ह्यात तारापूर एम. आय. डी. सी.मधील बजाज हेल्थ केअर कंपनीतील रासायनिक सांडपाणी भूमिगत पाईपलाईनद्वारे चोरीछुपे बाहेरील गटारात सोडण्याच्या प्रकार माहे. डिसेंबर २०२२ च्या दुसऱ्या आठवड्यात निदर्शनास येणे, तसेच याच बजाज हेल्थ केअर या कंपनीच्या प्लॉट क्र.टी ३० आणि प्लॉट क्र. एन २१९ वरील दोन प्लांटमध्ये कंपनीतील घातक रासायनिक सांडपाणी हे कोणतीही प्रक्रिया न करताच चोरी छुपे भूमीगत बंदीस्त पाईपलाईनद्वारे बाहेरील गटारात सोडण्याचा गोरखधंदा गेली अनेक वर्षे बिनबोभाट पणे सुरु असणे, गटारात सोडण्यात येणारे हे घातक सांडपाणी पुढे नाल्यावाटे समुद्राच्या खाडीला जाऊन मिळत असल्याने या परिसरातील जल प्रदूषणाचा स्तर उंचावला असणे, या परिसरातील वाढत्या प्रदूषणाची गंभीर दखल घेत तारापूर महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाचे उपप्रादेशिक अधिकारी प्रशांत गायकवाड यांनी या भागातील कारखान्यांची तपासणी मोहीम हाती घेणे, परंतु, कोणतीही ठोस कार्यवाही न करणे, दि.०६ डिसेंबर रोजी प्लॉट क्र. टी ३० वरील बजाज हेल्थ केअर या कंपनीचे घातक रासायनिक सांडपाणी गटाराच्या चेंबरच्या खालून पाईपलाईनद्वारे सोडण्यात येत असल्याचे उघडकीस येत, या प्रकरणी दोन्ही प्लांट मधील सांडपाण्याचे नमुने गोळा करण्यात आलेले असणे, राष्ट्रीय हरित लवादाने उक्त कंपनीवर प्रदूषणास जबाबदार धरत दंड ठोठावला असणे, त्या नंतर दुसऱ्या दिवशी दि. ०७ डिसेंबर रोजी पुन्हा प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या अधिकाऱ्यांनी प्लॉट क्र. एन २१९ वरील याच बजाज हेल्थ केअर कंपनीच्या दुसऱ्या प्लांटची तपासणी केली असता कंपनीच्या आतून भूमीगत बंदीस्त पाईपलाईनद्वारे घातक रासायनिक सांडपाणी विना प्रक्रिया बाहेरील गटारात सोडत असल्याचे उघडकीस आलेले असणे, त्यामुळे आजूबाजूच्या शेतकरी - बागायतदार यांच्या शेतजमिनी, विहिरी - कूपनलिका या सारख्या पिण्याचे पाण्याचे स्त्रोत प्रदूषित झालेले असणे, त्याच प्रमाणे मत्स्य उत्पादन देखील कमालीची घट होत असणे, तसेच स्थानिक आजूबाजूच्या नागरिकांचे आरोग्य धोक्यात असणे, यावर शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना.."

---

मा. मंत्री (पर्यावरण व वातावरणीय बदल) यांचे निवेदन

मे. बजाज हेल्थकेअर लि., (मे.न्युट्राप्लस इंडिया लि)., प्लॉट क्र. टी-३० हा औषधनिर्मिती प्रकल्प महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ, तारापूर, ता. व जि. पालघर येथे कार्यरत असून याकरिता सदर उद्योगास महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाकडून संमतीपत्र प्रदान करण्यात आले आहे. या कारखान्यातून १० घन मिटर प्रतिदिन औद्योगीक सांडपाणी निर्माण होत असून संमतीपत्रामध्ये नमूद केल्यानुसार उद्योगास शुन्य विर्सग (ZLD) करणे बंधनकारक आहे. महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाकडून दिनांक १५.११.२०२२ रोजी करण्यात आलेल्या

पाहणीदरम्यान उद्योगाकडून सेंट्रीफ्युज या यंत्रणेच्या परिसरामध्ये औद्योगिक सांडपाणी सोडून ते बाहेरील पावसाळी पाण्याचे गटारामध्ये मिसळत असल्याचे तसेच सांडपाणी प्रक्रिया यंत्रणा बंद असल्याचे निदर्शनास आले होते. तसेच कंपनीबाहेर पावसाळी पाणी वाहून नेण्यासाठी असलेल्या गटारामध्ये अल्प प्रमाणात औद्योगिक सांडपाणी साचल्याचे निदर्शनास आले होते. तसेच सदर गटारीमधील सांडपाण्याची गुणवत्ता विहीत मर्यादेच्या बाहेर असल्याचेही निदर्शनास आले होते. त्यामुळे, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळामार्फत दि. ०१/१२/२०२२ रोजी सदर उद्योगास कारखाना बंद का करण्यात येऊ नये? अशा आशयाची नोटीस बजावण्यात येऊन त्यासंबंधी वैयक्तीक सुनावणी आयोजित करण्यात आली होती. तद्नंतर महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळामार्फत सदर उद्योगास दिनांक ०७/०२/२०२३ रोजी अटी व शर्तीसह अंतरित निर्देश पारित करण्यात आले आहेत.

मे. बजाज हेल्थकेअर प्रा. लि. प्लॉट क्र. एन-२१९ म. औ. वि. म. तारापूर, हा उद्योग सदर ठिकाणी उद्योगा मार्फत कच्च्या मालाची साठवणूक, पावडरचे पुनःश्च पॅकींग केले जाते. व प्लॉट क्र. एन-२१६/२१७ या ठिकाणच्या उद्योगांमधून निर्माण होणारे औद्योगिक सांडपाणी प्रक्रिया करणेकरीता सांडपाणी प्रक्रिया यंत्रणा उभारण्यात आलेली आहे. या कारखान्यातून ४.८ घन मिटर प्रतिदिनि औद्योगीक सांडपाणी निर्माण होते. यासाठी संमतीपत्रामध्ये प्रक्रियायुक्त सांडपाणी CETP कडे पुनर्प्रक्रिया व विल्हेवाटीसाठी टँकरद्वारे पाठविण्यात येते. सदर उद्योगास महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाकडून संमतीपत्र प्रदान करण्यात आलेले आहे. महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळामार्फत सदर उद्योगाच्या दिनांक ०७/१२/२०२२ रोजी करण्यात आलेल्या पाहणीदरम्यान उद्योगांमधून निर्माण होणारे सांडपाणी भूमिगत बंदीस्त पाईप लाईनद्वारे उद्योगामध्ये असलेल्या सांडपाणीप्रक्रिया यंत्रणेच्या बाजूने बाहेरील आवारापर्यंत सोडत असल्याचे निदर्शनास आले होते. मे. बजाज हेल्थकेअर प्रा.लि. या उद्योगास छुप्या पद्धतीने असलेल्या पाईप लाईनची दखल घेऊन महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने दिनांक २२/१२/२०२२ रोजी कारखाना का बंद करण्यात येऊ नये? अशा आशयाची नोटीस बजावण्यात आली आहे.

तसेच औद्योगिक कंपन्यांमधून सोडण्यात येणाऱ्या सांडपाण्याच्या अनुषंगाने मा. राष्ट्रीय हरित लवाद यांच्याकडे दाखल मूळ याचिका क्र. ६४/२०१६ या प्रकरणी मा. लवादाने दिलेल्या निर्देशास अनुसरुन एकूण १०३ उद्योगांवर रु. २७९.०८ कोटी एवढा दंड आकारण्यात आलेला आहे. तथापि, सदर १०३ उद्योगांच्या यादीमध्ये मे. बजाज हेल्थकेअर लि., (मे.न्युट्राप्लस इंडिया लि)., प्लॉट क्र. टी-३० व मे. बजाज हेल्थकेअर प्रा. लि. प्लॉट क्र. एन-२१९ या उद्योगांचा समावेश करण्यात आलेला नाही.

जिल्हा आरोग्य अधिकारी, जिल्हा परिषद, पालघर यांच्याकडून प्राप्त अहवालानुसार पालघर जिल्ह्यातील बोईसर - तारापूर औद्योगिक क्षेत्रात ग्रामीण रुग्णालय बोईसर तसेच प्रा.आ.केंद्र दांडी, मुरबे, तारापुर या आरोग्य केंद्रामध्ये जलजन्य आजार असलेल्या रुग्ण संख्येत वाढ झालेली आढळुन आलेली नाही.

तालुका कृषी अधिकारी, पालघर यांच्याकडून प्राप्त अहवालानूसार मे. बजाज हेल्थकेअर कंपनीमधून होणाऱ्या प्रदूषणामुळे परिसरातील पिकांचे नुकसान झाल्याबाबत कोणतीही तक्रार त्यांच्या कार्यालयाकडे प्राप्त झाली नसल्याबाबत कळविले आहे.

*******

लक्षवेधी सूचना २०४३

महाराष्ट्र विधानसभा

सन २०२३ चे पहिले (अर्थसंकल्पिय) अधिवेशन

श्री. विजय वडेट्टीवार, श्री. सुनिल केदार, श्री. अस्लम शेख, ॲड यशोमती ठाकूर (सोनावणे) वि.स.स. यांची लक्षवेधी सूचना क्रमांक २०४३ पुढीलप्रमाणे आहे:-

"चंद्रपूर येथील औष्णीक विद्युत केंद्रात कर्मचाऱ्यांच्या सुरक्षेची काळजी घेण्यात येत नसल्याने वारंवार अपघात घडणे, वीज केंद्रातील ५ क्रमांकाच्या संचाचे देखभाल व दुरुस्तीचे काम सुरू असतांना काल दिनाक २७ फेब्रुवारी २०२३ रोजी दुपारी १२ वाजताच्या दरम्यान २० ते २५ फुटावरून एका अभियतासह टेक्नेशियन असे दोन कर्मचारी खाली पडुन गंभीर जखमी झाल्याची धक्कादायक घटना दिनाक २८ फेब्रुवारी २०२३ ला निर्देशनास येणे, याच औष्णीक केंद्रात वीज केंद्रातील ५ क्रमांकाच्या संचाचे देखभाल व दुरूस्तीचे काम सुरू असतांनाच पंधरा दिवसापुर्वी कंत्राटी कामगार सचिन रमेश गोवर्धन याचा सुध्दा अपघात दिनाक १९ फेब्रुवारी २०२३ रोजी २२ फुट ऊंचिवरून खाली पडून दुर्दवीं मुत्यू झाल्याची घटना उघडकिस येणे, या वीज केंद्रात कर्मचाऱ्यांच्या सुरक्षतेचर काळजी घेण्यात येत नसल्याने वारंवार अपघात होण्याच्या प्रमाणात वाढ होऊन निरपराध कर्मचाऱ्यांच्या मृत्यू होणे, पंधरा दिवसापुर्वी घटना घडून सुध्दा याकडे प्रशासनाने दुर्लक्ष केल्यामुळे काल दिनाक २७ फेब्रुवारी, २०२३ ला दुर्घटना घडून दोन कर्मचारी जखमी होणे, या गंभीर प्रकरणी शासनाचे होत असलेले अक्षम्य दुर्लक्ष त्यामुळे अधिकारी व कर्मचाऱ्यांत पसरलेले तिव्र असंतोष व संतापाचे वातारण, त्यामुळे या अपधातांची सखोल चौकशी करून संबधितावर कार्यवाही होणेबाबत तसेच अपघात होऊ नये याबाबत शासनाने तातडीने करावयायाची कार्यवाही, उपाययोजना व शासनाची प्रतिक्रिया".

मा. उप मुख्यमंत्री तथा मंत्री ( ऊर्जा ) यांचे निवेदन

चंद्रपूर येथील औष्णिक विज केंद्रात सुरक्षेविषयी कर्मचाऱ्यांची काळजी घेण्यात येते. त्याकरिता, प्रथम विद्युत केंद्रात प्रवेश करणाऱ्या अधिकारी, कर्मचारी व कंत्राटी कामगार यांना हेल्मेटशिवाय प्रवेश दिला जात नाही. प्रत्येक विभागामध्ये काम करण्याबाबत सुचना उपलब्ध आहेत. प्रत्येक विभागात सुरक्षा साधने उपलब्ध आहेत. प्रत्येक कर्मचाऱ्यांना प्रशिक्षण विभागामार्फत प्रशिक्षण देण्यात येते. प्रत्येक कंत्राटी कामगारांना कंत्राटदारामार्फत सुरक्षा साधने उपलब्ध करून देण्यात येतात तसेच ते वापरण्याबाबत प्रशिक्षणसुदधा देण्यात येते. प्रत्येक कंत्राटाच्या वर्क ऑर्डरमध्ये सुरक्षेविषयी अटी आणि शर्ती अंर्तभुत केलेल्या आहेत. तसेच, कुठलेही काम सुरु करण्याआधी संबंधीत कंत्राटदार आणि कंत्राटी कामगार यांना त्या कामासंदर्भातील घ्यावयाच्या सुरक्षिततेबद्दल सुचना दिल्या जातात. प्रत्येक काम हे कंत्राटदाराने नेमुन दिलेल्या कंत्राटी पर्यवेक्षकाच्या देखरेखीखाली करण्यात येतात. याची खात्री प्रत्येक विभागामार्फत काम सुरू करण्यापूर्वी करण्यात येते.

दिनाक २७ फेब्रुवारी २०२३ रोजी सी.टि. फॅन ५-बी. मध्ये ब्रेकरचा अचानक आवाज आल्यामुळे तेथील कार्यरत कनिष्ठ अभियंता श्री. पी.एम. जांभुळकर आणि तंत्रज्ञ - ३ श्री. डि.वी. आचेवार यांनी घाई आणि भितीमुळे अंदाजे १२ फुट उंचीवरून उडी मारली त्यामुळे श्री. पी. एम. जांभुळकर यांच्या पायाला दुखापत झाली, व श्री. डि.वी. आचेवार यांना काहीही दुखापत झालेली नाही. त्यांच्या उपचाराचा संपुर्ण खर्च प्रशासनाने केलेला आहे. वास्तविक अपघताच्या ठिकाणी

सुरक्षित मार्गाने खाली उतरण्याकरिता मार्ग/पायऱ्या उपलब्ध असुनसुद्धा त्याचा वापर कर्मचाऱ्यांनी केला नाही. घाई आणि भीतीमुळे असे घडले असावे.

दिंनाक १९ फेब्रुवारी २०२३ रोजी संच क्र. ५ येथे वार्षीक देखभालीचे बाष्पक दुरूस्तीचे कामे वेगवेगळ्या ठिकाणी सुरू होते. एकाचवेळी विविध कंत्राटदारामार्फत कार्य सुरू होते. सदर अपघात ग्रस्त कामगार सचिन रमेश गोवर्धन (वय-३२ वर्ष) - हे कंत्राटदार मे. दिनेश पारधी, दुर्गापूर यांच्या कडे कामाला होते व त्यांनी सकाळी ८:३० वाजता कामाची सुरूवात केली. त्यांच्या ग्रुपला कोल कंर्पाटमेंट असेम्ब्ली बदलविण्याचे काम दिलेले होते. अंदाजे सकाळी १०:३० वाजताच्या सुमारास सचिन रमेश गोवर्धन ९ मिटरच्या प्लॅटफॉर्मवर पडलेले आढळले. त्यांना ताबडतोब उपचाराकरिता दवाखान्यात नेण्यात आले. सर्वात पहिले सरकारी दवाखान्यात नेण्यात आले, त्यांनी डॉ. मानवटकर, चंद्रपूर यांचेकडे पाठविले, त्यानंतर सी.एच.एल. मल्टीस्पेशालीटी दवाखाना, चंद्रपूर येथे उपचार करण्यात आले. तेथे सचिन रमेश गोवर्धन यांचा उपचारा दरम्यान मृत्यु झाला.

कामाच्या वेळी विभागामार्फत सुरक्षिततेबाबत माहिती देण्यात आली होती. कार्य परमीट सुद्धा देण्यात आलेले हाते. सचिन रमेश गोवर्धन यांचेकडे सुरक्षिततेची सर्व साधने उपलब्ध होते परंतु त्यांनी सेफ्टी हारनेस न घातल्यामुळे अपघात घडला.

सदर औद्योगीक अपघाताच्या अनुषंगाने चौकशी समिती मार्फत चौकशी करण्यात आली. चौकशी समितीने सर्व औष्णिक विद्युत केंद्रात ओवर हॉलिंग करते वेळी बरेचसे धोकादायक परिस्थिती उद्भवू शकतात, परंतु सुरक्षेची योग्य काळजी घेऊन असे अपघात टाळता येऊ शकतात. वरील अपघात प्रकरणी असे निदर्शनात आले आहे की, कर्मचाऱ्याने सेफ्टी हारनेस न घातल्यामुळे अपघात घडला असे निष्कर्ष काढले आहेत.

चौकशी समितीने सखोल चौकशी नंतर सुरक्षिततेबाबत सूचनांचे काटेकोर पालन करुन भविष्यात अशा प्रकारचे अपघात घडू नये म्हणून यासाठी संबंधित विभागांना सूचित करण्यात आले आहे.

कंत्राटदारामार्फत अपघातात मृत्यू पावलेल्या सचिन रमेश गोवर्धन यांच्या वारसदारास कंत्राटदारामार्फत नियमाप्रमाणे नोकरी तसेच सानुग्रह अनुदान व नुकसान भरपाई देण्यात आली आहे.

चंद्रपूर येथिल औष्णिक विद्युत केंद्रात कर्मचाऱ्यांना सुरक्षेची काळजी घेण्याबाबत नेहमी अग्रेसर असुन मुख्य कार्यालयाच्या सुरक्षा धोरणाचे काटेकोरपणे पालन करण्यात येते. तरी सुद्धा यापुढे विविध कायद्यात, नियमात कारखाने अधिनियम, सी.ई.ए.च्या सुरक्षिततेविषयी, नोटिफिकेशनच्या सर्व तरतुदीनुसार लागु करण्याबाबत मुख्य कार्यालयाशी समन्वय साधुन त्याची अंमलबजावणी करण्याबाबत काळजी घेण्यात येईल.

*******************

**लक्षवेधी सूचना क्र. ४**

**महाराष्ट्र विधानसभा**
**सन २०२३ चे पहिले (अर्थसंकल्पिय) अधिवेशन**

**श्री. अतुल भातखळकर, ॲड. आशिष बाबाजी शेलार, ॲड. पराग अळवणी, श्रीमती मनिषा अशोक चौधरी, श्री. अमित भास्कर साटम, कॅप्टन आर. तमिल सेल्वन, श्री. किसन शंकर कथोरे, श्री. प्रशांत रामशेठ ठाकूर, श्री. संजय मुकूंद केळकर, श्री. बंटी भांगडिया, श्रीमती यामिनी यशवंत जाधव, श्री. योगेश अमृतलाल सागर, श्री. राम शिवाजी कदम, विधानसभा सदस्य यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अनुसार उपस्थित केलेली लक्षवेधी सूचना पुढीलप्रमाणे आहे :-**

"२९ तरुणांना सरकारी नोकरीचे आमिष दाखवून त्यांच्याकडून १.२ कोटी रक्कम लाटल्याची धक्कादायक बाब माहे फेब्रुवारी २०२३ मध्ये निदर्शनास येणे, त्यामध्ये, सदर टोळी ही कृत्ये संध्याकाळी कार्यालय सुटल्यावर मंत्रालयातील सहाव्या मजल्यावरील केबिन मध्ये मुलाखती घेऊन बनावट नियुक्ती पत्र देत असल्याचे निदर्शनास येणे, त्यामुळे, या संपूर्ण प्रकरणाची सखोल चौकशी करून त्यात दोषी आढळणाऱ्यावर कडक कारवाई करण्याची गरज असणे, तसेच, भविष्यात अशा घटनांना आळा घालण्यासाठी ठोस उपाययोजना करण्याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही, उपाययोजना आणि शासनाची प्रतिक्रिया."

---

**मा. उपमुख्यमंत्री (गृह) यांचे निवेदन**

सन जानेवारी, २०२० ते जुलै, २०२१ दरम्यान मंत्रालयातील एक शिपाई व एक चोपदार असे दोघेजण व बाहेरील इतर सहाजण अशा एकूण आठ आरोपींनी संगनमत करून सरकारी पदाची नोकरी मिळवून देण्याचे आमिष दाखवून फिर्यादी व इतर युवकांची फसवणूक केल्याचे उघड झाले आहे.

याकरीता आरोपींनी फिर्यादी व इतर युवकांच्या मुलाखतीचा बनाव रचून मंत्रालयातील सहाव्या मजल्यावरील केबिनमध्ये मुलाखती घेवून, नियुक्तीची बनावट कागदपत्रे तयार करुन दिल्याचे तपासात निष्पन्न झाले आहे.

याबाबत फिर्यादीने दिलेल्या तक्रारीवरुन गुन्हे प्रकटीकरण शाखा, मुंबई येथे दिनांक १९/१२/२०२२ रोजी गु.र.क्र.३१६/२०२२, भा.दं.वि. कलम ४२०, ४६५, ४६८, ४७१, १७०, १२० ब अन्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. सदर गुन्ह्यातील सात आरोपींना अटक करण्यात आली आहे.

सदर गुन्ह्याच्या तपासात एकूण ३४ बेरोजगार तरुणांची रुपये एक कोटी सत्याऐंशी लाख पन्नास हजार इतकी फसवणूक झाली असल्याचे निष्पन्न झाले आहे. प्रकरणी एकूण आठ आरोपींविरुद्ध न्यायालयात दोषारोपपत्र दाखल करण्यात आले असून सदर प्रकरणाचा पुढील तपास सुरु आहे.

अशा घटनांना आळा घालण्यासाठी मंत्रालयीन कार्यालयाच्या जागेचा दूरूपयोग होवू नये यासाठी शासकीय वेळेनंतर तसेच सुट्टीच्या दिवशी मंत्रालयातील कार्यालये बंद करण्याबाबतच्या सार्वजनिक बांधकाम विभागाच्या मार्गदर्शक सुचनांचे काटेकोरपणे पालन करण्याबाबत सर्व प्रशासकीय विभागांना सूचना देण्याविषयी सामान्य प्रशासन विभागास कळविण्यात आले आहे. कार्यालयीन वेळेनंतर अभ्यागत विनाकाम मंत्रालयात थांबणार नाहीत याबाबत आवश्यक ती खबरदारी घेण्याच्या सुचना मंत्रालय सुरक्षा कक्षाला देण्यात आल्या आहेत.

------------------

लक्षवेधी सूचना. क्र. १९०८ गृह विभाग.

सन २०२३ चे पहिले (अर्थसंकल्पीय) अधिवेशन

सर्वश्री.सुनिल केदार, श्री. विजय वडेट्टीवार, श्री. अस्लाम शेख वि.स.स. यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अन्वये दिलेली लक्षवेधी-

"नागपूर ग्रामीण पोलिस अंतर्गत कन्हान पोलिस स्टेशन अंतर्गत शिवाजी नगर येथील निर्दोष आदिवासी युवक राहुल सलामे याला या पोलिस ठाण्यातील सतीश मेश्राम, राऊत या पोलिस अधिकारी व इतर कर्मचारी यांनी ३/२/२०२३ रोजी त्याने न केलेल्या एका गुन्हयाची विचारपूस करण्यासाठी अटक करणे, या युवकाला पोलिस ठाण्यात मानसिक व शारिरीक छळ करुन मारहाण करणे, त्यात त्याचा दि.१७/२/२०२३ रोजी मेयो या शासकीय रुग्णालयात दुर्दैवी मृत्यू होणे, हा मृत्यू संशयास्पद असल्याचे आढळून येणे, या मृत युवकाला अटक केल्यानंतर मा.न्यायालयात हजर न करणे, त्याची विचारपूस करण्यासाठी पोलिस ठाण्यात आलेल्या त्याच्या पत्नीला बेदम मारहाण करणे, त्याला रुग्णालयात दाखल केल्यानंतर त्याची कोणतीही माहिती त्याच्या नातेवाईकांना देण्यात न येणे, इ. गंभीर बाबी निदर्शनास येणे, त्यामुळे या आदिवासी युवकाच्या संशयास्पद मृत्यूची सखोल चौकशी व्हावी व संबंधित पोलिस अधिकारी व इतर कर्मचारी यांच्यावर सदोष मनुष्यवधाचा गुन्हा दाखल व्हावा व अनुसूचित जाती-जमाती प्रतिबंधक कायद्यान्वये कार्यवाही व्हावी, अशी येथील नागरीक व त्याचे नातेवाईक मागणी करीत असणे व आंदोलने होत असणे, परंतु शासन, प्रशासन याकडे करीत असलेले अक्षम्य दुर्लक्ष, परिणामी येथील जनतेत पसरलेले असंतोषाचे वातावरण व नाराजीची भावना, याबाबत शासनस्तरावरुन करावयाची कार्यवाही व शासनाची भूमिका"

---

## मा. उप मुख्यमंत्री (गृह) महोदयांचे निवेदन

कन्हान पोलीस ठाणे,नागपूर (ग्रामीण) हद्दीत दिनांक ०३/०२/२०२३ रोजी खेलेश सलामे व त्याच्या इतर १० ते १२ साथीदारासह हातात तलवार व काठ्या घेवुन कन्हान येथील बाजारामध्ये दुकानांची तोडफोड, लुटपाट करीत असल्याची माहिती पोलीस स्टेशनला मिळाल्यावर पोलीस तात्काळ घटनास्थळी गेले त्यांना अटकाव करण्याचा प्रयत्न केला असता आरोपी खेलेश सलामे हा हातातील तलवार भिरकावत आपल्या साथीदारासह तेथुन पळुन गेला.

सदर घटनेबाबत तक्रारी वरून पोलीस ठाणे कन्हान येथे १) अप क्रमांक ५३/२०२३ भा.ह. का. कलम ३,४, २५ भा.द.वि. सह कलम १४३, १४७, १४९, २९४, ५०६ म.पो. का सह कलम १३५ २) अप क्रमांक ५४ / २०२३ भा. द. वि. कलम ३९५,४२७, भा. ह. का. सह कलम ३.४.२५ म.पो. का. सह कलम १३५ ३) अप क्रमांक ५५/२०२३ भा. द.वि. कलम ३५३,३२३,१४१, १४३, १४७, १४८, १४९. भा.ह.का. सहकलम ४,२५ प्रमाने गुन्हा दाखल करण्यात आला आहे गुन्हयातील पाच आरोपींना अटक करुन त्यांच्याकडून गुन्ह्यात वापरलेले शस्त्र जप्त करण्यात आली आहेत.

वरील गुन्ह्यातील फरार आरोपी १) खैलेश पंचम सलामे. २) शुभम पंचम सलामे त्यांचे इतर साथीदारांचा शोध घेण्यासाठी पोलीस त्यांचे राहते घरी गेले असता तो मिळुन न आल्याने त्याचा भाऊ राहुल सलामे हा घरी असल्याने व त्याचा गुन्हयात सहभाग आहे किवा कसे ? याची

खात्री करण्याकरीता दिनांक ०४/०२/२०२३ रोजी त्यास पोलीस ठाणे कन्हान येथे आणुन फरार आरोपीच्या अनुषंगाने विचारपूस करीत असताना त्याला अस्वस्थ वाटु लागल्याने वेळीच उपचारकरीता ग्रामीण रुग्णालय कन्हान येथे दाखल करण्यात आले. प्राथमिक उपचार ग्रामीण रुग्णालय कन्हान येथे घेतल्यानंतर वैद्यकीय अधिकारी यांच्या सल्लयाने त्यास मेयो हॉस्पीटल नागपुर येथे दाखल करण्यात आले. व त्याच्या नातेवाईकास बोलावून घेण्यात आले. राहुल सलामे हा उपचार सुरू असता दि. १२/०२/२०२३ रोजी मेयो हॉस्पीटल येथुन वैद्यकिय अधिकारी यांना कोणतीही सुचना न देता औषधोपचाराची कागदपत्रे घेवुन पळुन गेला. त्यानंतर राहुल पंचम सलामे याची पुन्हा प्रकृती खराब झाल्याने त्याच्या नातेवाईकांनी त्यांस दिनांक १५/०२/२३ रोजी मेगो हॉस्पीटल नागपुर येथे दाखल केले. उपचारा दरम्यान कर्तव्यावर असलेल्या डॉक्टर यांनी दिनांक १७/०२/२३ रोजी त्यास रात्री मृत घोषीत केले.

राहुल पंचम सलामे याच्या नातेवाईकांनी मृतकास पोलीसांनी मारहाण केल्याने त्याची प्रकृती खराब होऊन तो मरण पावल्याचा आक्षेप घेतल्याने कार्यकारी दंडाधिकारी तथा नायब तहसिहदार यांनी दि. १९/०२/२०२३ रोजी ईन्क्वेस्ट पंचनामा केला. सदर मृतकाचे तज्ञ वैद्यकीय अधिकारी यांचकडून शवविच्छेदन करण्यात आले आहे. वैद्यकीय अधिकारी यांनी मयताचा व्हिसेराचा सि.ए. अहवाल प्राप्त करण्यात आला असुन हिस्टोपॅथोलॉजी अहवाल प्राप्त झालेला नाही. सदर अहवाल प्राप्त होताच पुढील आवश्यक ती कायदेशीर कार्यवाही करण्यात येणार आहे.

उपरोक्त राहुल सलामेच्या मृत्यूबाबतच्या तक्रार अर्जाची चौकशी उपविभागीय पोलीस अधिकारी, कन्हान विभाग, कन्हान हे करीत असून चौकशी अंती पुढील कायदेशीर कारवाई करण्यात येत आहे.

************************

सन २०२३ चे अर्थसंकल्पीय अधिवेशन गृह विभाग

महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अन्वये लक्षवेधी सूचना क्र. १९५८

डॉ. राजेंद्र शिंगणे, विधानसभा सदस्य यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अनुसार दिलेली लक्षवेधी सूचना पुढीलप्रमाणे आहे :-

"बुलढाणा शहर तसेच शहरालगत (जि.बुलढाणा) ग्रामीण भागामध्ये मोठ्या प्रमाणात कॅफे असणे, सदर कॅफेच्या नावाखाली मुला मुलींचे गैरप्रकार वाढले असून मुलींना मोह पाशात ओढण्यासाठी कॅफेचा वापर होत असल्याचे निदर्शनास येणे, कॅफे मालकच त्यांना अशा प्रकारची सुविधा पुरवित असल्याचे निदर्शनास येत असणे, अशा कॅफे मध्ये मोठ्या प्रमाणात वेगवेगळ्या धर्मीय जोडपी येत असल्याने वेळीच दखल न घेतल्यास धर्मा-धर्मात वाद होण्याची शक्यता निर्माण होणे, याबाबत सकल मराठा समाज, बुलढाणा मार्फत दि.१ मार्च, २०२३ रोजी जिल्हा पोलिस अधिक्षकांना निवेदन देण्यासाठी गेले असता अधिक्षकांकडून निवेदनकर्त्यांना अतिशय अपमानास्पद वागणूक मिळणे, विशेष म्हणजे पत्रकारांसमोरच हा प्रकार घडणे, यावेळी एसपी (श्री.सारंग आव्हाड) यांच्याकडून पत्रकार येथे कशासाठी ? तुम्हाला शो करायचा का ? शक्ती प्रदर्शन करायचे आहे काय, अशा प्रकारचे प्रश्न विचारले जाणे, यासंदर्भात निवेदन देण्यासाठी शिष्टमंडळ गेले असता एसपी सारंग आवाड यांनी नागरिकांच्या, निवेदनकर्त्यांच्या भावना समजून घेण्याऐवजी त्यांना अपमानास्पद वागणूक देण्यात आल्याने निवेदनकर्ते व स्थानिक नागरीकांत पसरलेली संतापाची भावना, बुलढाणा शहरात कॅफेच्या माध्यमातून सुरु असलेले गैरप्रकार रोखून अशा कॅफे मालकांवर तातडीने कारवाई करण्याची होत असलेली मागणी, याबाबत शासनाने केलेली वा करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

मा.उपमुख्यमंत्री (गृह) महोदयांचे निवेदन

बुलढाणा शहर तसेच शहरालगत (जि.बुलढाणा) ग्रामीण भागामध्ये मोठ्या प्रमाणात कॅफे असल्याबाबत दिनांक ०१/०३/२०२३ रोजी सकल मराठा समाज, बुलढाणा यांच्या वतीने पोलिस अधीक्षक, बुलढाणा यांना निवेदन देण्यासाठी निवदनकर्ते मोठ्या संख्येने गेले होते. सदर निवेदनकर्ते यांनी पोलिस अधीक्षक कार्यालयात घुसण्याचा प्रयत्न करत असताना पोलिस अधीक्षक यांनी एकत्र येऊन गर्दी न करता निवेदनकर्त्यांपैकी पाच लोकांचे शिष्टमंडळ आत येऊन रितसर निवेदन देण्याबाबत सांगितले. त्यानुसार ०५ लोकांच्या शिष्टमंडळाने पोलिस अधीक्षक,बुलढाणा यांना निवेदन दिले. यावेळी निवेदनकर्त्यांना कोणतीही अपमानास्पद वागणूक दिलेली नसल्याचे पोलिस अधीक्षक, बुलढाणा यांनी कळविले आहे. प्राप्त निवेदनामध्ये बुलढाणा शहर तसेच शहरालगत ग्रामीण भागामध्ये बरेचसे कॅफे असून सदर कॅफेमध्ये अल्पवयीन मुलींना भुरळ घालून मुले कॅबीनमध्ये घेवून जातात व आतुन दार बंद करतात, कॅफे मालक त्यांना सुविधा पुरविताना त्यासाठी वेगळे चार्जेस आकारले जातात. सदर ठिकाणी वेगवेगळे धर्मीय अल्पवयीन जोडपे येत असल्याने अशा गंभीर बाबींची वेळीच दखल न घेतल्यास धर्मा-धर्मात वाद होण्याची व धर्मीय तेढ निर्माण होण्याची शक्यता नाकारली जाऊ शकत नाही. तसेच कायदा व सुव्यवस्था अबाधीत राखण्यासाठी तसेच शांतताप्रिय शहराची शांतता कायम अबाधीत राहावी यासाठी तात्काळ कार्यवाही होणे गरजेचे असल्याचे निवेदनामध्ये नमूद आहे. सदरहू निवेदनाच्या अनुषंगाने पोलिसांकडून कॅफे हाऊस तपासणी मोहीम राबविण्यात आली असून त्यानुसार कॅफे मालकांजवळ वैध परवाने मिळून न आल्याने १५ कॅफे मालकांना सीआरपीसी कलम १४९ प्रमाणे नोटीस देण्यात आल्या आहेत. तसेच ५१ इसमांविरुध्द कलम ११०, ११७ मपोका प्रमाणे प्रतिबंधक कारवाई करण्यात आली व भादवि कलम २९१ अन्वये ०३ आरोपींविरोधात ०२ गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. यानंतर देखिल सदर कॅफे हाऊस मध्ये गैरप्रकार चालु असल्याच्या तक्रारी नागरीकांकडून प्राप्त झाल्यामुळे जिल्हादंडाधिकारी, बुलढाणा यांचे कार्यालयाकडून दिनांक १०/०३/२०२३ रोजी मुंबई

पोलिस अधिनियम, १९५१ मधील कलम ३३ नुसार आदेश निर्गमित करण्यात आला आहे. सदर आदेशानुसार तात्काळ तपासणी करुन ज्या कॅफे मालकांकडे शॉप ॲक्ट परवाना नाही अशा कॅफे तात्काळ बंद करण्याबाबत सूचना देण्यात आल्या आहेत. कॅफे हाऊस मध्ये स्वतंत्र कॅबिन नसाव्यात आणि कोणतीही आरामदायी सुविधा/ व्यवस्था नसावी, कॅफे हाऊस मध्ये पुर्णपणे विद्युत रोषणी व प्रकाश व्यवस्था असावी. तसेच कॅफे हाऊसमध्ये कोणताही आक्षेपार्ह गैरप्रकार घडणार नाही याची संबंधित कॅफे चालक यांनी दक्षता घ्यावी. संबंधित कॅफे धारक यांनी ठेवण्यात आलेल्या भेट पुस्तीका (ग्राहक नोंदवही) ह्या संबंधित पोलिस स्टेशन कडून वेळोवेळी तपासणी करुन घ्याव्यात. कॅफे हाऊस मध्ये बाहेरच्या बाजूस CCTV कॅमेरे बसविण्याबाबत आणि त्याबाबतचे सूचना फलक आत व बाहेर लावण्यात यावे. कॅफे हाऊस मध्ये अल्पवयीन मुला मुलींना प्रवेश देण्यात येऊ नये, कॅफे हाऊस सकाळी १०.०० ते सायं.६.०० पर्यंतच सुरु राहील. तसेच जिल्हा पोलिस अधीक्षक, बुलढाणा यांच्या स्तरावर पथक गठीत करुन सदर पथकामार्फत कॅफे हाऊसची तपासणी करुन गैरप्रकार व अटी व शर्तीचे पालन होत नसल्याचे निदर्शनास आल्यास तात्काळ कॅफे हाऊस बंद करण्याबाबत देखिल निर्देश देण्यात आले आहेत. कॅफे हाऊसमध्ये प्रवेश देतेवेळी संबंधितांकडून आधार कार्ड तसेच रहिवाशी पुरावा आणि भ्रमणध्वनी क्रमांक यांची अद्ययावत नोंदवह्या पोलिस विभाग, अन्न व औषधी विभाग आणि महसूल विभाग यांना पुरविण्याबाबत व सदर ठिकाणी धुम्रपान होणार नाही याची संपूर्ण जबाबदारी कॅफे हाऊस धारक यांची राहील. कोणतीही संवेदनशील घटना घडणार नाही याची संबंधित कॅफे हाऊस धारक यांनी दक्षता घेण्याबाबत सूचना देण्यात आल्या आहेत.

---

लक्षवेधी सूचना क्र. २०६२

## महाराष्ट्र विधानसभा
## सन २०२३ चे अर्थसंकल्पिय अधिवेशन

श्री. लहू कानडे वि. स.स. यांच्या लक्षवेधी सूचना क्र. २०६२ वरील निवेदन उप मुख्यमंत्री सभागृहासमोर ठेवतील:-

"पालघर जिल्ह्यातील तलासरी तालुक्यात एका ४५ वर्षीय रमेश दुबळा या इसमाचे आपल्या शेजारच्या कुटुंबासोबत बोटीवरून घेतलेल्या पैशावरून आर्थिक आणि घरगुती वाद असणे, या शेजारच्या १० वर्षीय विद्यार्थीनीला तुला शाळेत सोडतो या बहाण्याने तिला आपल्या मोटर सायकल वर बसून तिच्या घरापासून सुमन दहा पंधरा किलोमीटर व गुजरात पासून जवळ असलेल्या भिलाड-सांजण जंगलात घेऊन जाणे, त्या जंगलात गेल्यावर या नराधाम इसमाने त्या दहा वर्षीय मुलीवर बलात्कार करुन तिचा गळा दाबून खून केल्याची घटना दिनांक एक मार्च, २०२३ रोजी वा त्या सुमारास उघडकीस येणे, संबंधित मुलगी रात्री उशिरापर्यंत घरी न आल्यामुळे त्या कुटुंबातील घरच्यांच्या मध्ये भीती निर्माण होणे त्यामुळे या घरच्यांनी तलासरी पोलीस स्टेशनमध्ये तक्रार करणे, पोलिसांनी १२ तासाच्या आत संबंधित आरोपीच्या मुस्क्या आवळणे, या घटनेबाबत समाजात निर्माण झालेली चिड, भीतीची व संतोषची भावना, आशा घटना भविष्यात कुठे घडू नये याबाबत शासनाने करावयाची कारवाई व प्रतिक्रिया."

---

## मा. उप मुख्यमंत्री (गृह) यांचे निवेदन

फिर्यादीने दिलेल्या फिर्यादीवरुन तलासरी पोलीस ठाणे, जि. पालघर येथे गु रजि.नं. ६२/२०२३ भा.दं.वि.स. कलम- ३०२, २०१, ३६३, ३७६ सह लैंगिक अपराधापासून बालकांचे संरक्षण अधिनियम कलम ४, ६, ८, १२ प्रमाणे दि. ०२.०३.२०२३ रोजी गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

सदर घटनेतील आरोपी व पीडीतेचे आजोबा एकाच मच्छिमार बोटीवर कामावर जात असून त्यांच्यात पैशाचे कारणावरून वाद होत होते.या कारणास्तव आरोपी यांने मयत मुलगी ही अल्पवयीन असल्याचे माहित असूनदेखील त्याने शाळेत सोडतो असे सांगून फूस लावून मोटार सायकलवर बसवून डोंगारी येथून ऊंबरगाव पोलीस ठाण्याचे हद्दीत करंमबेली ते तुंब जाणाऱ्या रोडचे पूर्व बाजुस फॉरेस्ट प्लॉटमध्ये नेवून तिचेवर लैंगिक अत्याचार करून तिचा गळा दाबून जिवे ठार मारुन टाकले व पुरावा नष्ट करण्याचे उद्देशाने तिचे प्रेत झाडाझुडपात लपवून ठेवले.

सदर गुन्ह्यातील आरोपीस दि. ०२.०३.२०२३ रोजी अटक करण्यात आली असून मा. न्यायालयात दि. २८.०४.२०२३ रोजी दोषारोपपत्र दाखल करण्यात आले आहे. गुन्ह्याचा तपास सुरू आहे.

गुन्ह्यातील मयत पिडीत मुलीच्या आईवडिलांना मनोधैर्य व अर्थसहाय्य मिळणेसाठी जिल्हा विधी प्राधिकरण, ठाणे यांना प्रस्ताव सादर करण्यात आला आहे.

---

**सन २०२३ चे पहिले (अर्थसंकल्पीय) अधिवेशन**
**महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अन्वये लक्षवेधी सूचना**

श्रीमती प्रतिभा धानोरकर, विधानसभा सदस्य यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अनुसार दिलेली लक्षवेधी सूचना पुढीलप्रमाणे आहे :-

"ऑनलाईन खेळांच्या अनेक जाहिराती प्रसारमाध्यमांवर प्रसिध्दी होत असणे, त्यामुळे अनेक युवक-युवती त्याकडे वळत असणे, शासन त्या जाहिरातच मान्यता देत असणे, यातून युवकांना त्या खेळांचे व्यसन जडत असणे, त्यामुळे आर्थिक नुकसान होत असणे, त्यातून अनेक युवक नैराशाग्रस्त होऊन आत्महत्या करत असणे, याकडे शासनाचे दुर्लक्ष होत असणे, यासर्व प्रकरणात शासनाने करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया"

**मा.उपमुख्यमंत्री (गृह) महोदयांचे निवेदन**

ऑनलाईन गेमसाठी शासनाकडून कोणत्याही प्रकारची परवानगी दिली जात नाही. ऑनलाईन गेमींग या नावाखाली काही कंपन्या प्रचलित कायद्यातील उणीवांचा गैरफायदा घेऊन विकसित करण्यात आलेल्या अॅपद्वारे अशा प्रकारच्या खेळांसाठी जाहिरातीद्वारे समाजातील व्यक्तींना आकर्षित करण्याचे काम करीत आहेत. आर्थिक हव्यासापोटी व जाहिरातबाजीला बळी पडून युवकवर्ग त्याकडे आकर्षित होत आहे. ऑनलाइन गेमींगमध्ये प्रामुख्याने रमी, सापशिडी, लुडो, तीन पत्ती, प्रोबो ऑनलाईन अॅप, ऑनलाईन जुगार, फ्री फायर, क्लॅश रॉयल, क्लॅश क्लॅन, असफाल्ट, रेसिंग, माईन क्राफ्ट अशा प्रकारचे गेम समाविष्ट आहेत. अनधिकृत ऑनलाईन अॅपद्वारे लोकांना जास्त पैशाचे आमीष दाखवून फसवणुक केल्याबद्दल फिर्यादीने दिलेल्या तक्रारीवरुन ऑनलाईन रमी, तीन पत्ती, प्रोबो अॅप, ऑनलाईन मटका जुगार, फ्री फायर, क्लॅश रॉयल, क्लॅश क्लॅन, असफाल्ट, रेसिंग व माईन क्राफ्ट या खेळांबाबत तक्रारी प्राप्त झाल्यानंतर गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. सदर गुन्ह्यांपैकी मुंबई शहर- ०२ (प्रोबो अॅप व ऑनलाईन मटका जुगारासारखा गेम), औरंगाबाद जिल्हा- ०१ (तीन पत्ती) व जालना जिल्हा- ०१ (फ्री फायर, क्लॅश रॉयल, क्लॅश प्लॅन, असफाल्ट, रेसिंग, माईन क्राफ्ट अशा प्रकारचे ऑनलाईन गेम्स लहान मुलाने खेळुन फोन पे द्वारे भरलेले पैसे हरल्याने) गुन्हे दाखल आहेत. यानुसार, आझाद मैदान पोलीस स्टेशन, मुंबई शहर येथे गु.र.नं. २२०/२०२२, भा.दं.वि. कलम ४२०, ३४ सह महाराष्ट्र जुगार प्रतिबंध अधिनियम कलम १२ (अ) सह माहिती तंत्रज्ञान अधिनियम कलम ६६ अन्वये व गु.र.नं. ६४०/२०२२, महाराष्ट्र जुगार प्रतिबंध अधिनियम कलम ४ (अ), ५ सह माहिती तंत्रज्ञान अधिनियम कलम ६६ (ड) अन्वये २ गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. तसेच, सायबर पोलीस ठाणे औरंगाबाद ग्रामीण येथे गु.र.नं. ३१/२०२२, भा.दं.वि. कलम ४२०, सह माहिती तंत्रज्ञान अधिनियम कलम ६६ (डी) अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे. तसेच जालना ग्रामीण येथील पोलिस स्टेशन अंबड येथे गु.र.नं.२३६/२०२१ भादवि कलम ४२० व माहिती तंत्रज्ञान अधिनियम ६६(डी) अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे. मानपाडा पोलिस स्टेशन ठाणे शहर येथे अपमृत्यु रजि.नं.२९/२०२३ सीआरपीसी १७४ अन्वये आकस्मिक मृत्यु नोंदविण्यात आला आहे.

ऑनलाईन गेम सारख्या जुगारांना आळा घालण्यासाठी ऑनलाईन गेमसाठी वापरण्यात येणारी माध्यमे व संगणकीय प्रणाली यांचा अभ्यास करुन त्याबाबतीत सायबर विभागाकडून पाठपुरावा करण्यात येत असून जनजागृती करण्यात येत आहे. ऑनलाईन जुगारातून युवकांची फसवणूक होऊ नये यासाठी जिल्ह्यातील सायबर पोलीस ठाणे तसेच महाराष्ट्र सायबर यांचेमार्फतीने ऑनलाईन गेमिंगच्या संदर्भात मार्गदर्शक सूचना सोशल मिडीयाच्या माध्यमातून वितरीत करण्यात आल्या आहेत. जिल्ह्यातील पोलीस अधिकारी/कर्मचारी यांच्याद्वारे शाळा/महाविद्यालयात नियमितपणे भेटी देऊन ऑनलाईन जुगारातून होणारे दुष्परीणाम, सायबर गुन्हे, सोशल मिडीयाचा योग्य वापर याबाबत जनजागृती करण्यात येत आहे. अशाप्रकारे १५७९ शाळा/महाविद्यालयात भेटी देऊन २३४१०७ शिक्षक, विद्यार्थी, पालक तसेच सामान्य नागरिकांची जनजागृती करण्यात आली आहे.ऑनलाईन गेमवर नियंत्रण ठेवण्याच्या दृष्टीने केंद्र सरकारच्या इलेक्ट्रॉनिक्स व माहिती तंत्रज्ञान विभागामार्फत माहिती व तंत्रज्ञान कायद्यांतर्गत Information Technology (Intermediary Guidelines and Digital Media Ethics Code) Rules, २०२१ मध्ये सुधारणा करण्याची कार्यवाही सुरू आहे.

---

लक्षवेधी सूचना क्र.२४९९

महाराष्ट्र विधान सभा

सन २०२३ चे अर्थसंकल्पीय अधिवेशन

**श्री. असलम शेख, श्री. बाळासाहेब थोरात, श्री. नानाभाऊ पटोले, श्री. विजय वडेट्टीवार, श्री. सुनिल केदार, प्रा. वर्षा गायकवाड, श्री. अमिन पटेल, श्री. झीशान सिद्दिकी, श्री. विकास ठाकरे वि.स.स. यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अनुसार दिलेली लक्षवेधी सूचना क्र. २४९९ पुढीलप्रमाणे आहे :**

"सेंट्रल उर्दू हायस्कूल सावंतवाडी, जि. सिंधुदुर्ग येथे असून त्याठिकाणी १० वीच्या परिक्षेचे केंद्र असणे, दिनांक २८ फेब्रुवारी,२०२३ रोजी १० वीच्या परिक्षा केंद्राची तयारी करीत असणे, केंद्राची तयारी चालू असताना दि.२८.०२.२०२३ रोजी सकाळच्यासुमारास १०.०० वाजता श्री. इम्तियाज खानापूरी व इतर व्यक्ती शाळेत मुख्याध्यापकाच्या खोलीत (कॅबीन) मध्ये अनाधिकृतपणे घुसले असणे, परिणामी १० वीच्या केंद्राची तयार करण्यातस अडथळा निर्माण झाला असणे, पुन्हा दिनांक १७ मार्च, २०२३ रोजी १० वीच्या विज्ञान - २ चा पेपर परिक्षा केंद्राची तयारी करीत असणे, केंद्राची तयारी चालू असताना दि.१७.०३.२०२३ रोजी सकाळच्यासुमारास ०९.४५ वाजता श्री. खलील खान व इतर व्यक्ती शाळेत मुख्याध्यापकाच्या खोलीत (कॅबीन) मध्ये अनाधिकृतपणे घुसले असणे, त्यामुळे शासकीय कामकाजात अडथळा निर्माण केला असणे, आम्ही शाळेचे विश्वस्त असल्याचे मुख्याध्यापकाला सांगितले असणे, सदरच्या व्यक्तीने मुख्याध्यापकाला दमदाटी व गोंधळ केला असणे, मुख्याध्यापक घाबरला असणे, त्यामुळे शाळेत मोठयाप्रमाणावर गोंधळाचे वातावरण निर्माण झाले असणे, यासंदर्भात स्थानिक पोलिसात तक्रार केली, मात्र तक्रार करुनही पोलिसांनी त्याकडे दुर्लक्ष केले असणे, पोलीस दखल घेत नसणे, त्यानंतर शाळेच्या भिंतीवर दोन फलक लावले असणे, परिणामी भितीचे मोठया प्रमाणावर नुकसान झाले असूनही सावंतवाडी पोलिसांनी पंचनामा केला नसणे, पंचनामा करण्याची आवश्यकता असणे, तरीही पोलिसांनी पंचनामा केला नसणे, परिसरात सेंट्रल इंग्लिश स्कूल येथे सी.सी.टी व्ही फुटेज घेतला नसणे, ही बाब गंभीर असणे, या संदर्भात सावंतवाडी मर्कजी जमात, मुंबई यांनी जिल्हाधिकारी - सिंधुदूर्ग, पोलिस अधिक्षंक - सिंधुदूर्ग व सावंतवाडी पोलीस ठाणे, त्यांच्याकडे दि. ३ मार्च, २०२३ रोजी लेखी तक्रार केली असणे, तथापि अद्याप तक्रारीची दखल घेतली नसणे, गुन्हा दाखल करण्याची आवश्यकता निर्माण झाली असणे, याकडे शासनाचे होत असलेले अक्षम्य दुर्लक्ष, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

---

मा. उपमुख्यमंत्री (गृह) यांचे निवेदन

दिनांक २८/०२/२०२३ रोजी सेन्ट्रल ऊर्दु हायस्कुल, सावंतवाडी येथे सकाळच्या सुमाराम १०.०० वाजता श्री. इम्तियाज खानापुरी व इतर व्यक्ती शाळेच्या मुख्याध्यापकाच्या खोलीत (केबीन) मध्ये अनधिकृतपणे घुसलेबाबत फोनद्वारे माहिती मिळाल्याने सावंतवाडी

पोलीस ठाणे येथील पोलीस उपनिरीक्षक व अन्य कर्मचारी हे सेन्ट्रल ऊर्दू हायस्कुल, सावंतवाडी येथे गेले. सदर ठिकाणी श्री. इम्तियाज खानापुरी (अध्यक्ष-सावंतवाडी मर्कझी जमात बॉम्बे, सावंतवाडी) हे हजर होते, तसेच श्री. इक्बाल दस्तगीर मुलाणी, मुख्याध्यापक हे हजर होते.

श्री. इम्तियाज खानापुरी (अध्यक्ष-सावंतवाडी मर्कझी जमात बॉम्बे, सावंतवाडी) व श्री. अश्फाक शेख (अध्यक्ष - सावंतवाडी मर्कझी जमात मुंबई, मुंबई) हे दोघेही सदरची संस्था आपलीच असल्याचे सांगत असल्याने दोघांनाही संस्थेच्या मालकीहक्काच्या अनुषंगाने आवश्यक ती सर्व कागदपत्रे सादर करणेबाबत पोलीस प्रशासनाकडून कळविण्यात आले होते. त्याअनुषंगाने, श्री. इम्तियाज खानापुरी यांनी दिनांक २८.०२.२०२३ रोजी व श्री. अश्फाक शेख यांनी दिनांक ०३.०३.२०२३ रोजीच्या पत्रासोबत कागदपत्रे सादर केली. तसेच, प्रस्तुत प्रकरणी श्री. खानापुरी, श्री. शेख आणि श्री. मुलाणी, संस्थेचे मुख्याध्यापक यांचे जबाब घेण्यात आले आहेत.

सदर घटनेच्या अनुषंगाने दोन पंचांसमक्ष घटनास्थळाच्या करण्यात आलेल्या पंचनाम्यानुसार मुख्याध्यापकांच्या दालनात मर्कझी जमात, सावंतवाडी यांनी विश्वस्थ मंडळ व स्थानिक कमीटी यांच्या नावाचे दोन बोर्ड लावलेले असून इमारत परीसरात कोणतेही सीसीटीव्ही कॅमेरा नसल्याने याबाबतचे फुटेज घेतले नाहीत. तसेच, प्रकरणी करण्यात आलेल्या चौकशीमध्ये मर्कझी जमात, सावंतवाडी यांनी रीतसर पत्र देऊन नमुद दोन्ही बोर्ड लावले असुन शासकीय कामात कोणताही अडथळा आणला नसल्याचे, कोणतीही धमकी, शिवीगाळ किंवा मारहाण केली नसल्याचे तसेच घटना घडली त्यावेळी १० वी किंवा इतर कोणत्याही इयत्तेचा कोणताही पेपर सुरु नसल्याचे शाळेचे मुख्याध्यापक यांनी त्यांच्या जबाबात नमूद केले आहे.

सदरच्या दोन्ही पक्षकारांनी सादर केलेल्या कागदपत्रांवरुन सदर संस्थेचा व संस्थेच्या शाळांचा मालकी हक्क किंवा प्रशासकीय अधिकार, याविषयीच्या नियंत्रणावरून वाद असून त्यांनी एकमेकांविरोधात तक्रारी केल्या आहेत. त्याअनुषंगाने सावंतवाडी दिवाणी न्यायालयात दावा प्रलंबीत आहे. तसेच, धर्मदाय आयुक्त, मुंबई येथे दावे प्रलंबीत आहेत.

*****

महाराष्ट्र विधानसभा

सन २०२३ चे पहिले (अर्थसंकल्पिय) अधिवेशन

श्री.रवि राणा, विधानसभा सदस्य यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अनुसार दिलेली लक्षवेधी सूचना क्रमांक १८२९:-

"मुख्यमंत्री सचिवालय कक्ष अमरावती विभाग विभागीय आयुक्त कार्यालय अमरावती यांचे पत्र दिनांक २१/०२/२०२३ रोजी प्रधान सचिव, वित्त व कोषागारे विभाग, मंत्रालय, मुंबई यांना पत्र प्राप्त झाले असणे, ज्या पत्रातून मुख्यमंत्री सचिवालयाने सहसंचालक हिवताप हत्तीरोग जलजन्य रोग पुणे या सार्वजनिक आरोग्य विभागातील वरिष्ठ वैज्ञानिक अधिकारी प्रयोगशाळा तंत्रज्ञ पदाच्या वेतन तफावमद्ये त सुधारणा करण्याबाबत तसेच या पदाचा पदश्रूखंलेत बदल करण्यासाठी अमरावती जिल्ह्यातील लोकप्रतिनिधी यांनी शासनाकडे शासनाच्या संबंधित विभाग प्रधान सचिव तसेच मुख्य सचिवाकडे मा.आरोग्य मंत्री, उप मुख्यमंत्री, वित्त मंत्री, मुख्यमंत्री यांच्याकडे व माननीय राज्यपाल, महाराष्ट्र राज्य यांच्याकडे वारंवार पाठपुरावा केला असूनही दिनांक १३ फेब्रुवारी, २०२३ रोजी प्रकाशित केलेला अ बक्षी समितीच्या अहवालामध्ये खंड २ मद्ये वरील मागणीचा समावेश नसल्याचे दिसून येत नसणे, म्हणुन वरीलप्रमाणेच मागणी मंजुर करण्याबाबत निर्णय घेण्याबाबत कळविले असणे, यानंतर वारमवार पत्र पाठवून तातडीने निर्णयात्मक आदेश घेण्याबाबत कळविले असणे तसेच विभागीय आयुक्त कार्यालय अमरावती यांनी त्यांचे कार्यालयाचे पत्र माहे जानेवारी व फेब्रुवारी रोजी चे दरम्यान उप मुख्यमंत्री तथा वित्त मंत्री यांचे प्रधान सचिव यांना व वित्त विभाग, मंत्रालय यांनाही पत्र पाठवून वरील लोकप्रतिनिधी यांच्या शिफारशीनुसार प्रस्ताव पाठविला असणे, वरील बाबीचा विचार करून विशेष बाब म्हणून सभागृहाला असलेल्या विशेष अधिकारानुसार वरील विषयात होत असलेला पाठपुरावा तरीही बक्षी समितीचे खंड २ मध्ये मागणी मान्य झाली नसणे, ही बाब बघता विधिमंडळ सभागृहाने वरीलप्रमाणे मागणी मान्य करण्यासाठी तातडीने निर्णयात्मक आदेश व यासंबंधाने शासनाने करावयाची कारवाई व यासंबंधाने शासनाची भूमिका व प्रतिक्रिया"

****************************

मा. उप मुख्यमंत्री तथा मंत्री (वित्त) यांनी करावयाचे निवेदन

केंद्र शासनाने केंद्रीय कर्मचाऱ्यांच्या वेतनश्रेणीत सुधारणा करण्याचा निर्णय घेतल्यानंतर राज्य शासनाच्या धोरणानुसार केंद्र शासनाच्या वेतनश्रेणीचा अभ्यास करुन राज्य शासकीय व पात्र कर्मचाऱ्यांच्या वेतनसुधारणेसंदर्भात शिफारशी करण्यासाठी राज्य शासनाकडून "राज्य वेतन सुधारणा समिती" ची स्थापना करण्यात येते. सदर समितीकडे केंद्रीय वेतन आयोगाच्या शिफारशींवरील केंद्र शासनाचे निर्णय विचारात घेऊन सुधारित वेतनश्रेणीची शिफारस करणे तसेच निवृत्तिवेतनधारकांची निवृत्तिवेतन निश्चिती व अनुषंगिक बाबींसंबंधी शिफारशी करणे या बाबी सोपविण्यात येतात.

सातव्या वेतन आयोगाच्या अनुषंगाने वेतनसुधारणेसंदर्भात शिफारशी करण्यासाठी राज्य शासनाने श्री. के. पी. बक्षी, सेवानिवृत्त अपर मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन यांच्या अध्यक्षतेखाली राज्य वेतन सुधारणा समिती, २०१७ स्थापन केली होती. सदर समितीच्या कार्यकक्षेत सातव्या वेतन आयोगाच्या अनुषंगाने सुधारित वेतनसंरचनेची शिफारस करणे आणि सहाव्या वेतन आयोगाच्या वेतनसंरचनेत त्रुटी असल्यास त्या दूर करण्याबाबत शिफारशी करणे, या दोन बाबी प्रामुख्याने अंतर्भूत होत्या.

त्यानुषंगाने विविध संघटना, अधिकारी-कर्मचारी, तसेच प्रशासकीय विभागांना वेतनत्रुटी/ वेतनवृध्दीविषयक मागण्यासंदर्भातील प्रस्ताव ऑनलाईनरित्या बक्षी समितीच्या विचारार्थ सादर करण्यासाठी स्वतंत्र ऑनलाईन वेबपोर्टल (https://www. mahaseventh pay.in) तयार करण्यात आले होते. त्या अनुषंगाने सदर पोर्टलवर ऑनलाईन विविध संवर्गाच्या एकूण ३७३९ मागण्या समितीस प्राप्त झाल्या होत्या.

बक्षी समितीने सातव्या वेतन आयोगाच्या वेतनश्रेण्यासंबंधीचा आपला अहवाल खंड-१ दिनांक ०५ डिसेंबर, २०१८ रोजी शासनास सादर केला होता. सदर अहवालातील शिफारशींवर मंत्रिमंडळाने निर्णय घेऊन दिनांक ३० जानेवारी, २०१९ रोजीच्या अधिसूचनेन्वये राज्य शासकीय कर्मचाऱ्यांना सातवा वेतन आयोग लागू करण्यात आला आहे. तसेच बक्षी समितीने आपला विविध संवर्गाचा वेतनत्रुटींसंबंधीचा शिफारशींचा अहवाल खंड-२ शासनास दिनांक ८ फेब्रुवारी,२०२१ रोजी सादर केला होता. बक्षी समितीने आपल्या अहवालात प्राप्त एकूण ३७३९ मागण्यापैकी, १०४ संवर्गाच्या वेतनत्रुटीसंदर्भातील मागण्या मान्य केल्या आहेत.

MAHARASHTRA STATE LABORATORY SCIENTIFIC OFFICER CENTRAL UNION (MALARIA & FILARIA) (महाराष्ट्र राज्य प्रयोगशाळा वैज्ञानिक अधिकारी मध्यवर्ती संघटना (मलेरिया आणि फाइलेरिया) व इतर संघटनांनी बक्षी समितीसमोर "प्रयोगशाळा तंत्रज्ञ" या संवर्गाच्या वेतनत्रुटींबाबतचा प्रस्ताव सादर केला होता. परंतु समितीने तिच्या अहवालामध्ये सार्वजनिक आरोग्य विभागातील " प्रयोगशाळा तंत्रज्ञ" या संवर्गाच्या वेतनत्रुटीं निवारणासंदर्भात शिफारस केलेली नाही. बक्षी समितीच्या सदर अहवालातील शिफारशींवर दिनांक १० जानेवारी, २०२३ रोजीच्या मंत्रिमंडळाच्या बैठकीत निर्णय घेण्यात येऊन, त्याबाबतचा शासन निर्णय दिनांक १३ फेब्रुवारी, २०२३ रोजी निर्गमित करण्यात आला आहे.

****************************

# महाराष्ट्र विधानसभा
## सन २०२३ चे पहिले (अर्थसंकल्पिय) अधिवेशन

श्री.रवि राणा, विधानसभा सदस्य यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अनुसार दिलेली लक्षवेधी सूचना क्रमांक १८५६:-

"बक्षी समिती चा खंड-२, दिनांक १३ फेब्रुवारी, २०२३ रोजी प्रकाशित झाला असून त्यामध्ये सहसंचालक हिवताप हत्तीरोग जलजन्य रोग पुणे यांच्या आस्थापनेवरील सार्वजनिक आरोग्य विभागातील प्रयोगशाळा वैज्ञानिक अधिकारी प्रयोगशाळा तंत्रज्ञ या पदाच्या वेतन तफावत सुधारणा करण्याबाबत तसेच या पदाच्या पदशुखलेत बदल करण्यासाठीचे मुख्यमंत्री सचिवालय कक्ष जिल्हाधिकारी कार्यालय अमरावती या कार्यालयाचे पदसिद्ध विशेष कार्यकारी अधिकारी यांनी दिनांक २३ फेब्रुवारी २०२३ रोजी पत्र क्रमांक १६२/२०३३ अन्वये अप्पर मुख्य सचिव मुख्यमंत्री सचिवालय मुंबई यांना वरील मागणी विशेष बाब म्हणून आदेश निर्गमित करण्यासाठी पाठविले असणे. दिनांक १३ फेब्रुवारी २०२३ रोजी प्रकाशित झाला असून अमरावती जिल्ह्यातील स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी सहसंचालक हिवताप हत्तीरोग जलजन्य रोग पुणे यांच्या आस्थापनेवरील सार्वजनिक आरोग्य विभागाचे प्रयोगशाळा वैज्ञानिक अधिकारी प्रयोगशाळा तंत्रज्ञ पदाच्या वेतन तपासणी करण्याबाबत बदल करण्यासाठी वारंवार शासनाकडे तसेच राज्याचे मुख्यमंत्री राज्याचे उपमुख्यमंत्री राज्याचे प्रधान सचिव वित्त व कोषागारे यांना वारंवार पत्र लेखी पत्र देऊन अवगत केले असणे. तरीही वरील बक्षी समिती च्या खंड २ मध्ये वरील मागणीचा समावेश नसल्याने सदर कर्मचारी व अधिकारी त्यांच्या भावना संतप्त झाले असणे कर्मचारी अधिकाऱ्यांची भावना लक्षात घेता पुन्हा लोकप्रतिनिधी यांनी दिनांक २० फेब्रुवारी, २०२३ रोजी माननीय मुख्यमंत्री महाराष्ट्र राज्य., यांना विशेष बाब म्हणून वरील मागण्या मान्य करण्यासाठी शासन निर्णय निर्गमित करण्यासाठी मान्य मुख्यमंत्र्यांनी आदेश संबंधित प्रधान सचिव वित्त लेखा व कोषागार यांना मागणी केली असणे ती मागणी जसे चे तशी शिफारस मुख्यमंत्री सचिवालय कक्ष जिल्हाधिकारी अमरावती यांचे पदसिद्ध विशेष कार्य अधिकारी यांनी वरील मागणी चा समावेश असलेले पत्र दिनांक २३ फेब्रुवारी, २०२३ रोजी माननीय मुख्यमंत्री सचिवालय अपर मुख्य सचिव यांना दिलेले असणे सदरची मागणी अतिशय रास्त असुन ती मागणी शासनाने मंजुर करणे अतावश्यक आहे ही मागणी मान्य करण्यासाठी मुख्यमंत्री कार्यालयाने प्रधान सचिव वित्त व लेखा कोषागार यांना विशेष बाब म्हणून आदेश होण्यासाठी आदेश देण्याची व निर्णय काढण्याची आवश्यकता असणे. त्यासंबंधाने करावयाची कार्यवाही शासनाची भूमिका व शासनाची प्रतिक्रिया."

*****************************

## मा. उप मुख्यमंत्री तथा मंत्री (वित्त) यांनी करावयाचे निवेदन

केंद्र शासनाने केंद्रीय कर्मचाऱ्यांच्या वेतनश्रेणीत सुधारणा करण्याचा निर्णय घेतल्यानंतर राज्य शासनाच्या धोरणानुसार केंद्र शासनाच्या वेतनश्रेणीचा अभ्यास करुन राज्य शासकीय व पात्र कर्मचाऱ्यांच्या वेतनसुधारणेसंदर्भात शिफारशी करण्यासाठी राज्य शासनाकडून "राज्य वेतन सुधारणा

समिती" ची स्थापना करण्यात येते. सदर समितीकडे केंद्रीय वेतन आयोगाच्या शिफारशींवरील केंद्र शासनाचे निर्णय विचारात घेऊन सुधारित वेतनश्रेणीची शिफारस करणे तसेच निवृत्तिवेतनधारकांची निवृत्तिवेतन निश्चिती व अनुषंगिक बाबींसंबंधी शिफारशी करणे या बाबी सोपविण्यात येतात.

सातव्या वेतन आयोगाच्या अनुषंगाने वेतनसुधारणेसंदर्भात शिफारशी करण्यासाठी राज्य शासनाने श्री. के. पी. बक्षी, सेवानिवृत्त अपर मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन यांच्या अध्यक्षतेखाली राज्य वेतन सुधारणा समिती, २०१७ स्थापन केली होती. सदर समितीच्या कार्यकक्षेत सातव्या वेतन आयोगाच्या अनुषंगाने सुधारित वेतनसंरचनेची शिफारस करणे आणि सहाव्या वेतन आयोगाच्या वेतनसंरचनेत त्रुटी असल्यास त्या दूर करण्याबाबत शिफारशी करणे, या दोन बाबी प्रामुख्याने अंतर्भूत होत्या.

त्यानुषंगाने विविध संघटना, अधिकारी-कर्मचारी, तसेच प्रशासकीय विभागांना वेतनत्रुटी/ वेतनवृध्दीविषयक मागण्यासंदर्भातील प्रस्ताव ऑनलाईनरित्या बक्षी समितीच्या विचारार्थ सादर करण्यासाठी स्वतंत्र ऑनलाईन वेबपोर्टल (https://www. mahaseventh pay.in) तयार करण्यात आले होते. त्या अनुषंगाने सदर पोर्टलवर ऑनलाईन विविध संवर्गाच्या एकूण ३७३९ मागण्या समितीस प्राप्त झाल्या होत्या.

बक्षी समितीने सातव्या वेतन आयोगाच्या वेतनश्रेण्यासंबंधीचा आपला अहवाल खंड-१ दिनांक ०५ डिसेंबर, २०१८ रोजी शासनास सादर केला होता. सदर अहवालातील शिफारशींवर मंत्रिमंडळाने निर्णय घेऊन दिनांक ३० जानेवारी, २०१९ रोजीच्या अधिसूचनेन्वये राज्य शासकीय कर्मचाऱ्यांना सातवा वेतन आयोग लागू करण्यात आला आहे. तसेच बक्षी समितीने आपला विविध संवर्गाचा वेतनत्रुटींसंबंधीचा शिफारशींचा अहवाल खंड-२ शासनास दिनांक ८ फेब्रुवारी,२०२१ रोजी सादर केला होता. बक्षी समितीने आपल्या अहवालात प्राप्त एकूण ३७३९ मागण्यापैकी, १०४ संवर्गाच्या वेतनत्रुटीसंदर्भातील मागण्या मान्य केल्या आहेत.

MAHARASHTRA STATE LABORATORY SCIENTIFIC OFFICER CENTRAL UNION (MALARIA & FILARIA) (महाराष्ट्र राज्य प्रयोगशाळा वैज्ञानिक अधिकारी मध्यवर्ती संघटना (मलेरिया आणि फाइलेरिया) व इतर संघटनांनी बक्षी समितीसमोर "प्रयोगशाळा तंत्रज्ञ" या संवर्गाच्या वेतनत्रुटींबाबतचा प्रस्ताव सादर केला होता. परंतु समितीने तिच्या अहवालामध्ये सार्वजनिक आरोग्य विभागातील " प्रयोगशाळा तंत्रज्ञ" या संवर्गाच्या वेतनत्रुटी निवारणासंदर्भात शिफारस केलेली नाही. बक्षी समितीच्या सदर अहवालातील शिफारशींवर दिनांक १० जानेवारी, २०२३ रोजीच्या मंत्रिमंडळाच्या बैठकीत निर्णय घेण्यात येऊन, त्याबाबतचा शासन निर्णय दिनांक १३ फेब्रुवारी, २०२३ रोजी निर्गमित करण्यात आला आहे.

****************************

लक्षवेधी सूचना क्र.७९५

सन २०२३ चे प्रथम (अर्थसंकल्पीय) अधिवेशन

**श्री. रविंद्र वायकर, मा. वि.स.स. यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अनुसार दिलेली लक्षवेधी सूचना क्रमांक ७९५ पुढीलप्रमाणे आहे :-**

"कोकणनगर, मौजे-मजास ता. अंधेरी येथे म्हाडाचा सी.टी.एस. नं १६९ वरील भूखंड मोकळा असल्याने त्यावर सध्यस्थितीत डेब्रीज टाकण्यात येत असल्याचे निदर्शनास येणे, सदर मोकळया भूखंडाचा गैरवापर होत असल्याने त्या भूखंडावर शासकिय कार्यालय (उदा- शिधावाटप कार्यालय, शैक्षणिक कार्यालय, दुयम निबंधक, निवडणूक कार्यालय) आदि उभारण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधीं व स्थानिक नागरिकांकडून होत असलेली सातत्याने मागणी, यासंदर्भात स्थानिक लोकप्रतिनिधींनी दिनांक १६ डिसेंबर, २०२२ मध्ये मा. उपमुख्यमंत्री व गृहनिर्माण मंत्री यांच्याकडे केलेला पत्रव्यवहार, सर्व शासकीय कार्यालय एकाच छताखाली या शासनाच्या धोरणाच्या अनुषंगाने उक्त मोकळया भूखंडावर सर्व शासकीय कार्यालय आणल्यास स्थानिक नागरिकांची गैरसोय दूर होईल याकरीता शासनाने तातडीने लक्ष घालून करावयाची कार्यवाही, याबाबत शासनाची प्रतिक्रिया व भूमिका."

---

**मा. उप मुख्यमंत्री (गृहनिर्माण) यांचे निवेदन**

सर्वोदय नगर, मजासवाडी, मेघवाडी, जोगेश्वरी (पुर्व) येथील म्हाडाचा सी.टी.एस.नं.१६९ या मोकळ्या भूखंडावर टर्न की योजना राबविण्यास म्हाडा, प्राधिकरणाने मंजूरी दिलेली आहे. त्यानुसार उक्त भूखंडावर निवासी सदनिकांचे बांधकाम करण्याकरीता निविदा पध्दतीने ठेकेदाराची नियुक्ती करण्यात आली होती. नियुक्तीनंतर सदरहू ठेकेदाराने सादर केलेल्या इमारत नकाशामध्ये काही सुधारणा सुचित करण्यात आल्या. त्यानुसार ठेकेदाराने सुधारित इमारत प्रस्ताव नकाशे सादर केलेले आहेत. सदरहू नकाशाची छाननी केली असता, विकास नियंत्रण नियमावली व सुधारित विकास आराखडा २०३४ नुसार भूखंडावर आरक्षण बदल झाल्यामुळे योजना कार्यान्वित करणे म्हाडास शक्य झाले नाही. आरक्षण बदल करण्याबाबतचा प्रस्ताव म्हाडाकडून नगर विकास विभागाकडे सादर करण्याची कार्यवाही म्हाडाच्या स्तरावर करण्यात येत आहे. सदर भुखंडावर कोणतेही अतिक्रमण होणार नाही याची दक्षता घेण्याच्या सूचना म्हाडाला देण्यात आलेल्या आहेत.

*-*-*-*-*-*-*-*-*-*

लक्षवेधी सूचना क्र.८१०

सन २०२३ चे प्रथम (अर्थसंकल्पीय) अधिवेशन

श्री. रविंद्र वायकर, मा. वि.स.स. यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अनुसार दिलेली लक्षवेधी सूचना क्रमांक ८१० पुढीलप्रमाणे आहे :-

"पी.एम.जी.पी कॉलनी, पुनम नगर, अंधेरी (पूर्व) या म्हाडा वसाहतीमधील इमारत क्रमांक १ ते १७ इमारतीच्या पुनर्विकासाकरीता विकासकाची नेमणूक करण्यास होत असलेली दिरंगाई, यापुर्वी मे. श्रीपती इन्फ्रास्ट्रक्चर या विकासकांची करण्यात आलेली नेमणूक, म्हाडा व विकासक यांच्यामध्ये दि.२७/८/२०१५ रोजी त्रिपक्षीय करण्यात आलेला करारनामा, सदरहू करारनामानुसार विकासकाने रु.१५.२३ कोटी मुद्रांक शुल्क भरुन दिनांक २६/०४/२०१६ रोजी नोंदणीकृत करणे, सदरहू विकासकाला १७ इमारतीचा एकत्रित पुनर्विकास करण्याकरीता दिनांक १३/११/२०१४, ०८/०७/२०१६ व ०५/०१/२०१८ मध्ये तीन वेळा देकार पत्रे देऊनही कोणतीच आजतागायत उक्त १७ इमारतीच्या पुनर्विकासाबाबत कार्यवाही केलेली नसल्याने इमारतीतील रहिवाशांनी नविन विकासक नेमण्याबाबत केलेली मागणी, यासंदर्भांत स्थानिक लोकप्रतिनिधींनी संबंधित मंत्रीमहोदय, म्हाडाचे संबंधित अधिकारी यांच्याकडे पत्रव्यवहार करुन तसेच विविध आयुधांव्दारे शासनाचे लक्ष वेधून नविन विकासक नेमण्याबाबत मागणी करुन ही आजतागायत शासन स्तरावर कोणती कार्यवाही झालेली नसणे, परिणामी रहिवाश्यांमध्ये प्रचंड असंतोष पसरलेला असून विकास कामांना बसत असलेली खीळ, याकडे शासनाचे जाणीवपूर्वक होत असलेले दुर्लक्ष, याबाबत शासनाने तातडीने लक्ष घालून म्हाडा वसाहतीमधील इमारत क्रमांक १ ते १७ इमारतीच्या पुनर्विकासाकरिता विकासकाची नेमणूक करण्याबाबत करावयाची कार्यवाही व याबाबत शासनाची प्रतिक्रिया व भूमिका."

---

मा. उप मुख्यमंत्री (गृहनिर्माण) यांचे निवेदन

पी.एम.जी.पी कॉलनी, पुनम नगर, जोगेश्वरी, अंधेरी (पूर्व) या म्हाडा वसाहतीमध्ये इ.क्र.१ ते १७ अशा एकूण १७ इमारती आहे. सदरहू इमारतींतील सभासदांनी अंधेरी पी.एम.जी.पी. कॉलनी को.ऑप.हौसिंग सोसायटीज असोसिएशन लि., या नावाने असोसिएशनची स्थापना केलेली आहे.

उक्त असोसिएशनने दि.४/४/२०११ रोजीच्या वार्षिक सर्वसाधारण सभेमध्ये उक्त १७ इमारतींचा एकत्रित पुनर्विकास करण्याबाबतचा ठराव मंजूर केला. असोसिएशनमधील ९८४ सभासदांपैकी ८७६ सभासदांनी पुनर्विकासाकरीता संमतीपत्रे दिली. त्यानुसार संस्थेचा पुनर्विकास करण्याकरीता निविदा काढण्यात आली व मे. श्रीपती इन्फ्रास्ट्रक्चर या विकासकाची नेमणूक करण्यात आली. सदरहू विकासक यांना उक्त १७ इमारतींचा एकत्रित पुनर्विकास करण्याकरीता म्हाडाकडून दि.१३/११/२०१४, दि.८/७/२०१६ व दि.५/१/२०१८ रोजी असे तीन वेळा देकारपत्रे देण्यात येऊनही उक्त इमारतींचा पुनर्विकास सदरहू विकासकाने केला नाही.

तद्नंतर DCPR-२०३४ प्रसिध्द करण्यात आला. सदरहू विकासकास DCPR-२०३४ मधील तरतुदीनुसार आणखी एक (चौथी) संधी देण्याची शिफारस म्हाडाने केली. त्यानुषंगाने सहकार विभागाच्या दि.४/७/२०१९ रोजीच्या शासन निर्णयानुसार पुनर्विकास प्रकल्पाच्या एकूण किंमतीच्या २० टक्के इतकी बँक गॅरन्टी देण्याच्या अधीन राहून, सदरहू १७ इमारतींचा पुनर्विकास करण्यासाठी ४.०० चटई क्षेत्र निर्देशांक शासन पत्र दि.१५/२/२०२० अन्वये मंजूर करण्यात आला.

तथापि, सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभागाच्या दि.०४/०७/२०१९ च्या शासन निर्णयानुसार बँक गॅरन्टी देण्यास उक्त विकासक तयार झाले नाही. रहिवाशांचे हित अबाधित राखण्याच्या दृष्टीने बँक गॅरंटीची उपाययोजना महत्वाची होती. विकासकाची आर्थिकस्थिती व्यवस्थित नसल्याचे स्पष्ट झाल्याने म्हाडाने मे. श्रीपती रियल व्हेंचर्स एल.एल.पी. या विकासकाची नेमणूक रद्द करुन, सदरहू प्रकल्पाचा पुनर्विकास म्हाडाने स्वत: करावा किंवा म्हाडामार्फत अन्य विकासकाची नेमणूक करुन पुनर्विकास प्रकल्प पूर्ण करण्याच्या सूचना म्हाडास दि.१५/१२/२०२० रोजी देण्यात आल्या. त्यानुसार उक्त विकासकाची नियुक्ती रद्द केल्याचे उक्त संस्था व विकासकास म्हाडाने त्यांच्या दि.२८/१/२०२१ रोजीच्या पत्रान्वये कळविले आहे.

दरम्यानच्या काळात सदर पुनर्विकास प्रकल्पाबाबत तत्कालीन मा. मुख्यमंत्री महोदय यांचेकडे दि.२६/५/२०२२ रोजी पार पडलेल्या बैठकीतील निर्देशानुसार विकासक म्हणून केलेली नेमणूक रद्द (टर्मिनेट) करण्यात आली आहे. तसेच सदरहू मोडकळीस आलेल्या इमारतींचे संरचनात्मक परीक्षण / तपासणी (Structural Audit) करण्याकरीता म्हाडाकडून मे.शिल्प कन्सलटींग सर्विसेस लिमिटेड यांची स्ट्रक्चरल ऑडिटर म्हणून नियुक्ती करण्यात आली. सदरहू प्रकल्पातील १७ इमारतींपैकी एका इमारतीमधील (इमारत क्र.१३) येथील रहिवाशांनी विरोध केला, तर १६ इमारतींचे स्ट्रक्चरल ऑडिट करण्यात आले असून या इमारती C-1 Category मध्ये मोडत असल्याबाबतचा अहवाल म्हाडास दि.६/१०/२०२२ रोजी सादर करण्यात आला आहे.

सदरहू प्रकल्पाची आर्थिक व्यवहार्यता, रहिवाशांचे स्थलांतरणाकरीता आवश्यक संक्रमण गाळे व पुनर्विकासाकरीता C & D A बाबत सविस्तर अहवाल तयार करण्यासाठी म्हाडाने Project Management and Consultant ची नियुक्ती केली आहे व त्यांनी त्यांचा अहवाल दि.२०/२/२०२३ रोजी म्हाडास सादर केला असून, त्यानुसार कार्यवाही म्हाडाच्या स्तरावर सुरु आहे.

*-*-*-*-*-*-*-*-*-*

लक्षवेधी सूचना क्र.२२३९

# सन २०२३ पहिले (अर्थसंकल्पीय) अधिवेशन

श्री. सुनील राऊत, श्री. रमेश कोरगांवकर, श्री. संजय पोतनीस, श्री. रविंद्र वायकर, श्री.सुनिल प्रभू, श्री. प्रकाश फातर्पेकर, मा. विधानसभा सदस्य यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अनुसार दिलेली लक्षवेधी सूचना क्रमांक २२३९ पुढीलप्रमाणे आहे :-

"मुंबई उपनगरातील विक्रोळी (पूर्व) कन्नमवार नगर येथील क्रांतीवीर महात्मा ज्योतिबा फुले रुग्णालयाच्या इमारतीचा पुनर्विकासाचा प्रस्ताव म्हाडा प्राधिकरणांकडून ना हरकत प्रमाणपत्र न मिळाल्यामुळे अनेक वर्षांपासून प्रलंबित असणे, विक्रोळी (पूर्व) कन्नमवार नगर व टागोरनगर हा म्हाडा लेआउट असून कामगार वसाहतीत हे रग्णालय असणे, घाटकोपर ते मुलुंड पर्यंतच्या परिसरातील किंबुहना पुर्व द्रुतगती महामार्गालगत असलेले महापालिकेचे एकमेव रुग्णालय असणे, या रग्णालयाचा लाभ विक्रोळी, कन्नमवार, टागोरनगर, कांजूर, भांडुप, सूर्यनगर या परिसरातील रग्णांना होतो तसेच पुर्व द्रुतगती महामार्गावरील अपघात ग्रस्तांना या रुग्णालयात उपचाराअभावी फारच गैरसोय होत असणे, रुग्णालयाच्या पुनर्विकास तातडीने व्हावा याकरिता स्थानिक लोकप्रतिनिधिंनी सातत्याने म्हाडा व महापालिकाच्या संबंधित विभागाशी बैठका घेऊनही कोणतीच कार्यवाही न होणे, स्थानिक नागरिकांनी दिनांक १५ सप्टेंबर, २०२२ रोजी केलेले आंदोलन, सदर आंदोलनाची दखल घेऊन मा. मुख्यमंत्री महोदयानी म्हाडा प्राधिकरणाकडून कोणत्याही प्रकारचे शुल्क किंबुहना मोबदला न घेता तात्काळ "ना हरकत प्रमाणपत्र" देण्यात येईल तसेच पुनर्विकासाचे काम तातडीने पूर्ण करण्यात येईल व पुनर्विकासादरम्यान सदरचे रग्णालय याच परिसरातील बंद अवस्थेत असलेल्या सुश्रुषा रग्णालय स्थलांतरीत करण्यात येईल असे आश्वासन देऊनही अदयाप म्हाडा प्राधिकरणाकडून कोणतीच कार्यवाही झालेली नसणे, परिणामी रग्णालयाचा पुनर्विकास अद्यापही रखडलेला असणे, त्याचबरोबर क्रांतीवीर महात्मा ज्योतिबा फुले रुग्णालयाचे बंद अवस्थेत असलेल्या सुश्रुषा रुग्णालय स्थलांतर झाले नसल्याने प्रचंड गैरसोय होत असल्याने स्थानिक नागरिकांमध्ये तीव्र नाराजी पसरलेली असणे, याकडे शासनाचे जाणीवपूर्वक होत असलेले अक्षम्य दुर्लक्ष, याबाबत शासनाने गांभीर्याने लक्ष घालण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने तातडीने लक्ष घालून रुग्णालयाच्या पुनर्विकासाबाबत करावयाची कार्यवाही व याबाबत शासनाची प्रतिक्रिया व भूमिका."

---

## मा. उप मुख्यमंत्री (गृहनिर्माण) यांचे निवेदन

कन्नमवार नगर, विक्रोळी (पूर्व) या म्हाडाच्या वसाहतीतील ४,८४४.५० चौ.मी. चा भूखंड दि.८/३/१९७८ रोजी मुंबई महानगरपालिकेला हस्तांतरीत करण्यात आला. सदर भूखंड त्यावेळेस म्युनिसिपल मार्केट व शाळेकरीता राखीव होता. मुंबई महानगर पालिकेने सदरचे आरक्षण बदलून त्या भूखंडावर क्रांतीवीर महात्मा ज्योतिबा फुले रुग्णालय बांधलेले आहे. मात्र सद्य:स्थितीत सदरची इमारत मोडकळीस आल्याने त्या ठिकाणी सुरु असलेले रुग्णालय मुंबई महानगर

पालिकेमार्फत बंद करण्यात आलेले आहे. सदर रुग्णालयाचा पुनर्विकास मुंबई महानगर पालिकेस करावयाचा असल्याने सदर भूखंडाशेजारी असलेले म्युनिसिपल हॉस्पिटल व म्युनिसिपल कर्मचारी सेवा निवासस्थानाकरीता विकास आराखडा-२०३४ नुसार राखीव असलेले दोन भूखंड ३,३४५.०२ चौ.मी. व १,३७०.७७ चौ.मी. असे एकुण ४,७१५.७९ चौ.मी. क्षेत्रफळाची जागा विनामोबदला मिळण्याबाबतची मागणी मुंबई महानगरपालिकेने म्हाडाकडे केली.

त्या अनुषंगाने दि.१५/९/२०२२ रोजी मा. मुख्यमंत्री यांचेकडे बैठक पार पडली. सदर बैठकीत मुंबई महानगर पालिकेस सदरचा भूखंड विनामोबदला हस्तांतरीत करुन पुनर्विकासाच्या प्रस्तावास मान्यता / ना हरकत प्रमाणपत्र देण्याबाबत मा. मुख्यमंत्री यांनी निर्देशित केले. सदर निर्देशाच्या अनुषंगाने भूखंड वितरणाबाबत म्हाडा धोरणानुसार मुंबई महानगरपालिकेला हस्तांतरीत करावयाच्या हॉस्पिटल भूखंडासाठी चालू रेडीरेकनर निवासी दराच्या ५० टक्के किंमत आकारावयाची तरतूद असल्याने, सदरहू भूखंड मुंबई महानगरपालिकेस सदरची रक्कम आकारुन हस्तांतरीत करण्याबाबत म्हाडा प्राधिकरणाचा ठराव क्र.७०५९, दि.२३/११/२०२२ अन्वये निर्णय घेण्यात आला. मात्र मा. मुख्यमंत्री यांनी दि.१५/९/२०२२ रोजीच्या बैठकीत सदरचा भूखंड विनामोबदला मुंबई महानगरपालिकेस हस्तांतरीत करावयाच्या निर्देशाच्या अनुषंगाने ५० टक्के किंमत आकारावयाच्या म्हाडा प्राधिकरणाच्या निर्णयावर फेरविचार सुरु असल्याने उपरोक्त नमूद ठरावाच्या निर्णयाच्या अनुषंगाने भूखंडाची अंतिम अधिमुल्य रक्कम मुंबई महानगरपालिकेस कळविण्यात आलेली नाही.

तथापि, कन्नमवार नगर व टागोर नगर येथील म्हाडा वसाहतीतील लोकांची गैरसोय टाळण्यासाठी मुंबई महानगरपालिकेच्या विनंतीनुसार म्हाडा मार्फत उपरोक्त दोन्ही भूखंडाचा आगाऊ ताबा म्हाडाकडून मुंबई महानगर पालिकेस करण्यात आलेला आहे. तसेच, मुंबई महानगरपालिकेच्या पूर्वीपासून ताब्यात असलेला भूखंड व उपरोक्त आगाऊ ताबा दिलेले दोन्ही भूखंड यांचे एकत्रित प्रत्यक्ष जागेवरील क्षेत्रफळ ९,५६०.२९ चौ.मी. यासाठी दि.१०/२/२०२३ रोजी म्हाडामार्फत सिमांकन नकाशा जारी करण्यात आलेला आहे.

त्यानुषंगाने, सदरहू भूखंडावर रुग्णालय व सेवा निवास्थानाकरीता एकूण ४४,३१३.४२ चौ.मी. बांधकाम क्षेत्रफळाचा पुनर्विकासाचा प्रस्ताव मुंबई महानगरपालिकेने दि.९/१/२०२३ रोजी म्हाडास सादर केला आहे. त्यानुसार प्रस्तावाची आवश्यक ती छाननी केल्यानंतर म्हाडाकडून दि.२१/३/२०२३ रोजी मुंबई महानगरपालिकेस देकारपत्र देण्यात आले आहे.

*-*-*-*-*-*

**लक्षवेधी सूचना क्र. ७८१**

**महाराष्ट्र विधानसभा**
**सन २०२३ चे पहिले (अर्थसंकल्पिय) अधिवेशन**

श्री. देवराव होळी,श्री.सुनिल केदार, श्री.विजय वडेट्टीवार, श्री.अस्लम शेख, मा.विधानसभा सदस्य यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम१०५ अन्वये दिलेली लक्षवेधी सूचना क्र. ७८१ पुढीलप्रमाणे आहे :-

" चंद्रपूर जिल्हयातील कुसुंबी, ता.जिवती येथील आनंदराव मेश्राम व इतर २४ आदिवासींची ६३.६२ हे.आर जमिन मानिकगड सिमेंट कंपनीने स्थानिक प्रशासनिक अधिका-यांना हाताशी घेऊन दिनांक १९ मार्च, १९८५ पासून बेकायदेशीरपणे ताब्यात घेणे, स्थानिक महसूल विभागाच्या अधिका-यांच्या संगनमताने कोणताही मोबदला न देता, नियमबाहय व बेकायदेशीररित्या ही जमीन कंपनी व्दारा बळकावण्यात येणे, सदर बाब भूसंपादन उपजिल्हाधिकारी, चंद्रपूर यांच्या लक्षात आणून दिल्यानंतर दिनांक २४ सप्टेंबर, २०१७ व ३ फेब्रुवारी,२०१८ रोजी त्यांनी या जमिनीचा मोबदला व न्याय या आदिवासींना मिळवून देण्याबाबत उपविभागीय अधिकारी, राजुरा यांना पत्र देणे, त्या पत्रावरुन दि.१६ मे, २०१८ रोजी तहसिलदार, जिवती यांनी मानिकगड सिमेंट कंपनीस लाभ मिळवून देण्यासाठी खोटा व बनावट अहवाल तयार करुन शासनाला पाठविणे, त्या खोटया अहवालावरुनच पुढील प्रत्येक अहवाल व रिपोर्ट शासनाला सादर करणे, यामुळे अजूनपर्यंत आनंदराव मेश्राम व इतर २४ आदिवासी याना न्याय न मिळणे, न्यायाच्या प्रतीक्षेत असलेल्या या आदिवासी बांधवाना न्याय मिळवून देण्याची नितांत आवश्यकता याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

---

**श्री.राधाकृष्ण विखे-पाटील, मा.मंत्री, महसूल यांचे निवेदन.**

विषयांकीत प्रकरणात खाणपट्टा मंजूर करण्यात आलेला कालावधी दिनांक १६.०८.२००१ ला संपल्याने कंपनीने वर्ष २००२ मध्ये नूतनीकरण करतांना संबंधितांना मोबदला दिला नसल्याचे कारणास्तव तसा मोबदला मिळण्याकरीता श्री. आनंद मारू मेश्राम यांनी मा. उच्च न्यायालय,खंडपीठ नागपूर येथे रिट याचिका क्र. ९१३/२०१५ दाखल केलेली होती. सदर याचिकेमध्ये दिनांक २७.०६.२०१६ रोजी न्याय निर्णय पारित झाला असून "याचिकाकर्ता आनंद मारू मेश्राम यांनी स्वेच्छेने ताबा दिलेला असून त्यांना नुकसान भरपाई मिळालेली आहे. अनेक दशकांपासून खाणकाम सुरु असल्याची वस्तूस्थिती लक्षात घेता सदर याचिका मा. उच्च न्यायालय,मुंबई, नागपूर खंडपीठ, नागपूर यांनी खारीज केली आहे" तसेच सदर आदेशात मा. उच्च न्यायालयाने " We find that the process of law is being abused" असे मत व्यक्त केलेले आहे. सदर आदेशाविरोधात मा. सर्वोच्च न्यायालयात Case no. S.L.P. (C) No.०३५०६३/२०१६ and S.L.P. (C).CC No. ०२२०१२/२०१६ अन्वये अपील दाखल करण्यात आलेली असून त्याबाबतची सद्य:स्थिती पुढील प्रमाणे आहे - Pending-(Motion Hearing) (After Notice (For Admission)-Civil Cases) IA Allowed. सद्य:स्थितीत प्रकरण न्यायप्रविष्ठ आहे.

मानिकगड कंपनी गडचांदूर यांना चुनखडक उत्खनन करण्याकरीता उदयोग उर्जा व कामगार विभागाचे पत्र दिनांक ३०.४.१९७९ अन्वये ६४३.६२ हे.आर क्षेत्रावर खनिपट्टा मंजूर करण्यात आला आहे. या अनुषंगाने चंद्रपुर

जिल्हयातील जिवती तालुक्यातील कुसुंबी येथील मानिकगड सिमेंट कंपनीकरीता ६३.६२ हे.आर जागेचे म.ज.म.अ. १९६६ अन्वये जिल्हाधिकारी चंद्रपुर यांचे आदेशान्वये भुपृष्ठ हक्काचे संपादन करण्यांत आले होते. भुपृष्ठ हक्क संपादनात घराचा शेतीचा आणि संपादीत इतर मालमत्तेचा मोबदला तत्कालीन उपविभागीय अधिकारी,राजूरा यांचा अहवाल दिनांक २५.१.१९८५ च्या नुसार निश्चित केल्याचे दिसुन येते. तसेच जिल्हाधिकारी चंद्रपुर यांचा संदर्भ दिनांक २६.७.१९८५ अन्वये आणि इतर उपलब्ध दस्ताऐवज यावरुन संबंधीत जमिन धारकांना भुपृष्ठ हक्काचे संपादनाबाबत मोबदला वाटप केल्याचे दिसुन येते. खाण व खनिजे (विकसन व विनियमन) अधिनियम, १९५७ च्या कलम ८ मधील उपकलम (२) महाराष्ट्र शासन, उद्योग उर्जा व कामगार विभाग यांचे आदेशपत्र क्र. एमएमएन.-२२०१/५०/उद्योग-९, दिनांक १५.११.२००२ अन्वये २० वर्षाकरीता प्रथम नुतणीकरण व खाण व खनिजे (विकसन व विनियमन) सुधारीत अधिनियम, २०१५ च्या कलम ८ अ मधील उपकलम (५ व ६) नुसार शासन आदेश उद्योग उर्जा व कामगार विभाग, दिनांक १०.०८.२०१८ अन्वये खाण पट्टयाचा पुढील १० वर्षासाठी कालावधी वाढविण्यात आलेला आहे. सदर खनिपट्टा नुतनीकरण होऊन दिनांक १६.०८.२०३१ पर्यंत कंपनीस मंजूर आहे. सद्य:स्थितीत ४९३.३८ हे.आर जमिनीचे लिज कंपनीकडे असुन त्यापैकी ४२९.७६ हे.आर क्षेत्र वनक्षेत्र असुन ६३.६२ हे.आर महसुल क्षेत्र आहे. त्यामुळे सदर जमिन बेकायदेशीरपणे ताब्यात घेतली आहे, ही बाब खरी नाही.

उपजिल्हाधिकारी (भुसंपादन),चंद्रपुर यांनी दिनांक २४.९.२०१७ व दिनांक ३.२.२०१८ रोजी उपविभागीय अधिकारी,राजूरा यांना पत्र दिले. सदर पत्राचे अनुषंगाने उपविभागीय अधिकारी,राजूरा यांनी दिनांक १७.२.२०१८ रोजी तहसिलदार, जिवती यांना चौकशी करून अहवाल सादर करण्याबाबत कळविण्यात आलेले होते. सदर पत्राचे अनुषंगाने तहसिलदार,जिवती यांनी उपलब्ध दस्ताऐवजानूसार उपविभागीय अधिकारी, राजूरा यांना दिनांक १६ मे २०१८ रोजी माहीती सादर केली. जिल्हाधिकारी, चंद्रपूर कार्यालयाकडून उपलब्ध दस्तऐवज व वस्तूस्थितीला अनूसरून अहवाल शासनास करण्यात आलेले आहेत.

जिल्हाधिकारी, चंद्रपूर यांचा संदर्भ दिनांक २६.०७.१९८५ अन्वये व इतर उपलब्ध दस्ताऐवज यावरुन संबंधीत जमीन धारकांना भुपृष्ठ हक्काचे संपादनाबाबत मोबदला वाटप केल्याचे दिसून येते. तसेच त्यावर संबंधीत जमीन धारकाची संमती होती असे दिसून येते. त्यामुळे सदर २४ आदिवासींना त्यांच्या न्याय व हक्कांपासून वंचित केले असे म्हणता येणार नाही.

तसेच प्रस्तुत प्रकरणाच्या अनुषंगाने प्रसंगवशात: असे निदर्शनास आणण्यात येते की, महाराष्ट्र राज्य मानवाधिकार आयोगाकडेसुध्दा तक्रार दाखल झालेली होती. मा. आयोगाने MAS/Case no.-१६२२/१३/९/२०२० दिनांक ३१.०१.२०२३ मध्ये मानवाधिकाराचे अधिनियम, १९९३ चे कलम १२ चे अंतर्गत कोणत्याही प्रकारचे मानवाधिकारांचे उल्लंघन होत नसल्याने ही तक्रार खारीज केलेली आहे.

*************

# महाराष्ट्र विधानसभा

## सन २०२३ चे पहिले (अर्थसंकल्पीय) अधिवेशन

**लक्षवेधी सूचना क्र. १६५**

**सर्वश्री.दिलीपराव बनकर, छगन भुजबळ, डॉ.जितेंद्र आव्हाड, दिपक चव्हाण, हसन मुश्रीफ,शामराव ऊर्फ बाळासाहेब पाटील, श्रीमती सरोज आहिरे, अजित पवार, जयंत पाटील, दिलीप वळसे-पाटील, धनंजय मुंडे, कुमारी आदिती तटकरे, संजय बनसोडे, दत्तात्रय भरणे, चेतन तुपे, विनोद निकोले, दौलत दरोडा, धर्मरावबाबा आत्राम, विजय वडेट्टीवार, सुनिल केदार, अस्लम शेख, सुभाष धोटे, अमिन पटेल, नानाभाऊ पटोले, प्रा.वर्षा गायकवाड, बाळासाहेब थोरात, संजय जगताप, विश्वजित कदम, सुरेश वरपुडकर, ॲड.यशोमती ठाकूर (सोनावणे), वि.स.स. यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अन्वये उपस्थित केलेली लक्षवेधी सूचना क्र. १६५ पुढीलप्रमाणे आहे:-**

" दिनांक १ जानेवारी,२०२३ रोजी नाशिक येथील गोंदे औद्योगिक वसाहतीतील जिंदाल पॉलिफिल्म्स कंपनीत बॉयलरजवळ स्फोट होऊन लागलेल्या भीषण आगीत दोन महिला कामगारांचा दुर्दैवी मृत्यु झाल्याचे तसेंच अन्य १७ जण गंभीररित्या जखमी झाल्याचे आढळून येणे, त्यानंतर सदर दुर्घटना ठिकाणास मा.मुख्यमंत्री महोदयांनी भेट देऊन पाहणी केल्यानंतर, त्याबाबत उच्चस्तरीय चौकशी करण्याचे आदेश देऊन त्याचवेळी मृतांच्या वारसास पाच लाख रुपये आर्थिक मदत देण्याचे मा.मुख्यमंत्री महोदयांनी घोषित करण्यांत आल्याचे निदर्शनास येणे, शासनाने आदेशित केल्यानुसार, सदर आगडोंबाची उच्चस्तरीय चौकशी करण्यांत येऊन त्याबाबतचा अहवाल शासनास प्राप्त झाला आहे काय व सदर अहवालात काय नमूद करण्यांत आले आहे व त्याप्रकरणी पुढे कोणती कारवाई करण्यांत आली याबाबतची अद्यापही अनभिज्ञता असणे, तसेंच कामगार आयुक्तांच्या पथकाने या कंपनीस दर महिन्यास भेट देऊन पाहणी करणे बंधनकारक असतांना कामगार आयुक्त पथकाने सदर कंपनीस केव्हा भेट दिली होती व त्या पाहणीमध्ये काय आढळून आले याबाबत अद्याप खुलासा झालेला नसल्याचे माहे जानेवारी,२०२३ अखेरीस निदर्शनास येणे,त्यामुळे या दोन्ही बाबींसंबंधात अद्यापही कार्यवाही न झाल्याने जनतेमध्ये व कामगारवर्गामध्ये निर्माण झालेले असंतोषाचे वातावरण व त्याप्रकरणी शासनाने तातडीने मृतांच्या वारसांना आर्थिक मदतीच्या वितरणासह पुढील कार्यवाही करण्याची आवश्यकता व शासनाची प्रतिक्रिया."

**मा.मंत्री (कामगार) यांचे निवेदन**

"जेपीएफएल फिल्म्स प्रा.लि.,मुंढेगाव, ता.इगतपुरी जि.नाशिक (पुर्वीचे नाव-जिंदाल पॉलीफिल्म्स प्रा.लि.,) या कारखान्यात दि.०१.०१.२०२३ रोजी कारखान्याच्या बॅच पॉली प्लान्टच्या तळमजल्यावर गरम थर्मिक फ्ल्युइड ऑईलची गळती होऊन, तिथे जमा झालेल्या ऑईलच्या वाफेचा (Vapour Cloud) स्फोट झाला व नंतर त्यामुळे आग लागली.

स्फोट झालेल्या ठिकाणी अडकलेल्या व्यक्तींना बाहेर काढण्याकरिता व परिस्थितीवर नियंत्रण मिळविण्याकरिता एसडीआरएफ व एनडीआरफ ची तुकडी घटनास्थळी दाखल झालेली होती. बचाव पथकामार्फत अडकलेल्या एकूण २५ व्यक्तींना बाहेर काढण्यात आले असून, त्यांना तात्काळ वैद्यकीय सुविधा पुरविण्यात आल्या आहेत.

कंपनी व्यवस्थापनाने कळविल्यानुसार कंपनीच्या आस्थापनेवर अंदाजे १२०० कामगार कार्यरत असून, घटनेच्या दिवशी कारखाना परिसरात ७७७ कामगार काम करीत होते. त्यापैकी ३ कामगारांचा (दोन महिला व एक पुरूष) मृत्यू झाला असून, २२ कामगार जखमी झाले आहेत. त्यांचेवर वैद्यकीय उपचार करुन,वैद्यकीय उपचारानंतर त्यांना सोडण्यात आले आहे.

सदर दुर्घटनेच्या ठिकाणी मा.मुख्यमंत्री महोदयांनी तसेच मा.मंत्री (कामगार) महोदयांनी भेट देऊन पाहणी केली होती.मा.मुख्यमंत्री महोदयांनी दिलेल्या आदेशास अनुसरुन,अपर जिल्हाधिकारी, नाशिक यांच्या अध्यक्षतेखाली नेमलेल्या चौकशी समितीने चौकशी करून अहवाल जिल्हाधिकारी,नाशिक यांचेमार्फत शासनास सादर केला असून,समितीच्या अहवालात औद्योगिक सुरक्षिततेच्या दृष्टीकोनातून सुचविण्यात आलेल्या शिफारशीच्या अनुषंगाने विभागामार्फत पुढील कार्यवाही सुरू आहे.

सदर दुर्घटनेच्या अनुषंगाने औद्योगिक सुरक्षा व आरोग्य संचालनालयाकडून कारखान्याच्या भोगवटादाराविरूध्द मा.मुख्य न्यायदंडाधिकारी,नाशिक यांचे न्यायालयात खटला दाखल करण्यात आला आहे.

सदर कारखान्याचे औद्योगिक सुरक्षा व आरोग्य संचालनालयाने यापुर्वी दि.२२.१२.२०२०, दि.१७.०६.२०२१ व दि.२०.०४.२०२२ रोजी निरीक्षणे केलेली असून, सुरक्षिततेबाबतच्या उपाययोजना वेळोवेळी सुचविण्यात आल्या आहेत. तसेच, कामगार आयुक्त कार्यालयामार्फत सुद्धा सदर कंपनीस देण्यात आली असून, विविध कामगार कायद्यांतर्गत तपासणी करण्यात आली आहे. आढळून आलेल्या त्रुटींच्या अनुषंगाने वेळोवेळी योग्य ती कायदेशीर कार्यवाही करण्यात आली आहेत.

मा.मुख्यमंत्री सहायता निधीमधून दुर्घटनेत मृत झालेल्या श्रीमती.अंजली राजकुमार यादव व श्रीमती.महिमाकुमारी प्रल्हादसिंग या दोन महिला कामगारांच्या वारसांना तसेच श्री.सुधीर मिश्रा या मृत कामगाराच्या वारसास रुपये पाच लक्ष इतकी आर्थिक मदत अदा करण्यात आली आहे.

दुर्घटनेतील ३ मृत कामगारांपैकी एका कामगाराच्या वारसांस नुकसान भरपाई देण्यासाठी कारखाना व्यवस्थापनाने आयुक्त,नुकसान भरपाई, नाशिक यांचेकडे रू.१५,७४,४००/- इतकी रक्कम जमा केली असून, उर्वरीत दोन मृत कामगार हे राज्य कामगार विमा मंडळाचे सदस्य असल्याने, त्यांच्या वारसास राज्य कामगार विमा मंडळ यांचेकडून पेंशन सुरू झाली आहे.तसेच कारखाना व्यवस्थापनाने ३ मृत कामगारांच्या वारसास प्रत्येकी रूपये ६.०० लक्ष आणि २२ जखमी कामगारांना एकत्रितपणे रूपये ९,४०,०००/- इतकी रक्कम सानुग्रह अनुदानापोटी दिली आहे. कारखाना व्यवस्थापनामार्फत देण्यात आलेल्या नोकरीचा, २ मृत कामगारांच्या वारसांनी स्वीकार केला असून,एका मृत कामगाराच्या वारसाने नोकरी करण्यास कोणीही इच्छुक नसल्याचे कळविले आहे. तसेच व्यवस्थापनाने जखमी कामगारांच्या औषधोपचाराचा रू.२९,९२,१८४/- इतका खर्च केला आहे.

*********************

२५३९

महाराष्ट्र विधानसभा

सन-२०२३ चे प्रथम (अर्थसंकल्पीय ) अधिवेशन

**श्री. रईस शेख, विधानसभा सदस्य यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अनुसार दिलेली लक्षवेधी सूचना क्र. २५३९**

**लक्षवेधी सूचना**

"जि.ठाणे, भिवंडी तालुक्यातील सार्वजनिक बांधकाम विभागातर्फे वडपे- भिणार- निंबवली रा.मा. क्र. ८४ वरील वडपे जंक्शनचे कॉंक्रिटीकरण करणे, भिवंडी पारोळ रस्त्यावर लहान पुलाचे बांधकाम करणे व तुळशी करंजोटी ग्रा.मा क्र. १३६ कुबेरी नदीवर लहान पूलाचे बांधकाम करणे, कामोटी नदीवर नदी नाका येथे नवीन पूल बांधणे, चे काम मे.मयुर कन्स्ट्रक्शन यांनी करणे सदर काम करीत असताना निकृष्ट दर्जाचे साहित्य वापरुन पुलाचे व रस्त्यांचे काम निकृष्ट केले असणे,त्यामुळे स्थानिक नागरिकांनी व स्थानिक लोकप्रतिनिधी यांनीही तक्रारी करूनसुद्धा कार्यकारी अभियंता व भिवंडी उप अभियंता , कनिष्ठ अभियंता, यांनी सदर ठेकेदार यांचे बिले काढली असणे,तसेच स्थानिक लोकप्रतिनिधी यांनीही अनेक वेळा मंत्री.सार्वजनिक बांधकाम विभाग यांच्याकडे तक्रार करणे,सदर विषयी विभागाने मुख्य अभियंता .सार्वजनिक बांधकाम प्रादेशिक विभाग कोकण ,यांच्याकडे चौकशी साठी अहवाल दिनांक. २२ सप्टेंबर २०२२ मध्ये मागविला असणे, मुख्य अभियंता .सार्वजनिक बांधकाम प्रादेशिक विभाग कोकण हे जाणून बुजून वेळ काढू पण करत असणे,बांधकाम करण्यात आलेल्या पुलाचे व रस्त्यांचे बांधकाम ठेकेदाराने अत्यंत निकृष्ट दर्जाचे भिवंडी उपविभागात यापूर्वीच्या कामांमध्ये कार्यकारी अभियंता व उपअभियंता,कनिष्ठ अभियंता, यांनी संगनमताने ४० ते ५० कोटी रुपयाचा भ्रष्टाचार केल्याचा संशय असल्याने यापूर्वी झालेल्या व सध्या चौकशी करण्याची होत असलेली मागणी व मयुर कन्स्ट्रक्शन यांना काळ्या यादीत टाकणे,सबंधित दोषींविरुध्द कारवाई करण्याची आवश्यकता, याकडे झालेले शासनाचे अक्षम्य दुर्लक्ष, यामुळे येथील आदिवासी जनतेत निर्माण झालेला तीव्र असंतोष व चिंतेचे वातावरण, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया."

**मा. श्री. रविंद्र चव्हाण,मंत्री, सार्वजनिक बांधकाम विभाग (सार्वजनिक उपक्रम वगळून) यांचे निवेदन.**

भिवंडी तालुक्यातील चार कामांच्याबाबत दि.०६/०९/२०२२ च्या पत्रान्वये तक्रार अर्ज प्राप्त झाला आहे. सदर तक्रारीबाबत मुख्य अभियंता, सार्वजनिक बांधकाम प्रादेशिक विभाग, कोकण यांनी त्यांच्या दि.२२/०९/२०२२ च्या पत्रान्वये अधिक्षक अभियंता, दक्षता व गुणनियंत्रण मंडळ, कोकण भवन यांचे मार्फत चौकशी आदेशीत केली आहे. चौकशी अहवाल प्राप्त झाल्यानंतर अहवालातील निष्कर्षानुसार पुढील आवश्यक कार्यवाही करण्याचे नियोजन आहे.

******************************

रोटा/एच-२६१[७५०-५-२०२३].

लक्षवेधी सुचना क्र.२४२२

श्री. रोहित पवार, विधानसभा सदस्य यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अन्वये विधान सभेत उपस्थित केलेली लक्षवेधी सुचना क्र.२४२२ पुढील प्रमाणे आहे :-

"आठव्या पंचवार्षिक योजनेच्या काळात महाराष्ट्रात नवीन सहकारी सूतगिरण्यांना मान्यता देण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन होता, त्यानुसार प्रबोधनकार ठाकरे विणकर सहकारी सूतगिरणी मर्यादित सोलापूर जिल्हा सोलापूर या गिरणीस दिनांक १७ मार्च, १९९७ च्या शासन निर्णयान्वये आठव्या पंचवार्षिक योजनेत समावेश करून शासकीय अर्थसहाय्यासाठी निवड करण्यास मान्यता दिलेली असणे, याच काळात आठव्या पंचवार्षिक योजनेत समाविष्ठ असलेल्या बऱ्याच सहकारी सूतगिरणी प्रकल्प उभारणीबाबत कारवाई सुरू केली परंतु प्रबोधनकार ठाकरे विणकर सहकारी सुतगिरणी मर्यादित सोलापूर या सूतगिरणीने नोंदणी कालावधी पासून २१ वर्षांचा कालावधी पूर्ण होऊनही प्रकल्प उभारणी बाबत प्रगती न केल्यामुळे सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम १०२(१) क एक व चार मधील तरतुदीनुसार वस्त्रोद्योग संचालनालय दिनांक २७ मार्च, २०१७ रोजी गिरणी औसायनात काढण्याबाबतचा आदेश निर्गमित करणे, दिनांक २ मे, २०१८ रोजीच्या शासन निर्णयान्वये प्रबोधनकार ठाकरे विणकर सहकारी सूतगिरणी मर्यादित सोलापूर या सुतगिरणीचा आठव्या पंचवार्षिक योजनेत समावेश करून शासकीय अर्थसहाय्यासाठी निवड करण्यात आली होती, संदर्भिय शासन निर्णयानुसार सदरहू सूतगिरणीचे शासकीय अर्थसहाय्य देण्यासाठी नव्याने निवड करण्याबाबत शासनाने मान्यता दिलेली असणे, त्यानंतर शासन पत्र दिनांक ९ सप्टेंबर, २०१९ अन्वये सदर सूतगिरणीच्या तालूका कर्जत जिल्हा अहमदनगर येथे स्थलांतरणास विशेष बाब म्हणून मान्यता देण्यात येणे, दिनांक १३ सप्टेंबर, २०१९ रोजीच्या सहकार व पणन वस्त्रोद्योग विभागाच्या शासन निर्णयान्वये प्रबोधनकार सहकारी सूतगिरणीच्या सुधारीत प्रकल्प अहवालास (किंमत ६१७४.२४ लक्ष)) मान्यता दिलेली असणे, तसेच सदर सूतगिरणीने रूपये १२३ लक्ष इतके सभासद भागभांडवल जमा करणे सदर सूतगिरणी दिनांक १८ सप्टेंबर, २०१९ च्या शासन निर्णयान्वये ९ कोटी रुपये इतके अनुदान वितरित करण्यात आलेले असणे, प्रबोधनकार ठाकरे विणकर सहकारी सूतगिरणीचे कर्जत येथिल स्थलांतरण, प्रकल्प अहवालास मान्यता, अनुदान वितरण ही सर्व कारवाई अवघ्या दिनांक ४ सप्टेंबर, २०१९ ते १८ सप्टेंबर २०१९ या केवळ पंधरा दिवसाच्या कालावधीत अति वेगवान पध्दतीने शासनाने घेतलेला हा निर्णय असणे, सदर सूतगिरणीच्या कामकाजावर व प्रकल्प उभारणीवर लक्ष देऊन प्रगतीचा तिमाही अहवाल आयुक्त वस्त्रोद्योग यांनी वेळोवेळी शासनास सादर करण्याचे व प्रस्तुत सूतगिरणी संदर्भात

शासन निर्णया मधील तरतुदीनुसार वसुली बाबत आयुक्त वस्त्र उद्योग यांनी काटेकोरपणे कारवाई करणे गरजेचे असणे, सदर सूतगिरणीकडे बँकेत जमा असलेल्या निधीचे नियोजन करून विनियोजन योग्य रीतीने होत असल्याची खात्री माननीय आयुक्त वस्त्रोद्योग यांनी वेळोवेळी करण्याची अट बंधनकारक असणे, शासन निर्णयामुळे सूतगिरणीची उभारणी विहित कार्य मर्यादित पूर्ण करणे गरजेचे असतांनाही सद्यस्थितीत प्रकल्प उभारणीचे कुठलेही काम झालेले नसणे, परिणामी शासनाच्या अनुदानात अपहार झालेल्याची शंका निर्माण होणे, संस्थेचे लेखापरीक्षण करून प्रकल्प उभारणीत झालेली दिरंगाई झालेला गैरव्यवहार तसेच शासनाची केलेली दिशाभूल याबाबत शासनाची भूमिका करावयाची कारवाही"

## मा. मंत्री (वस्त्रोद्योग) यांचे निवेदन

प्रबोधनकार ठाकरे विणकर सहकारी सूतगिरणी लि. कर्जत, जि. अहमदनगर या सुतगिरणीची नोंदणी दि.१५.१२.१९९५ रोजी करण्यात आली असून, नोंदणी क्रमांक SQR/ PRG / (A)/ DH-२९ असा आहे. आठव्या पंचवार्षिक योजनेत सूतगिरणीचा शासन निर्णय दि. २७ मार्च १९९७ अन्वये समावेश करून शासकीय अर्थसहाय्यासाठी निवड करण्यात आलेली होती. महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम १०२ अन्वये संचालनालयाचे आदेश दि.२६.८.२०१६ अन्वये सुतगिरणीला अंतरीम अवसायनाचे आदेश देण्यात येऊन दि.२२.३.२०१७ रोजीचे आदेशान्वये सुतगिरणी अंतिमरित्या अवसायनात घेण्यात आली होती. सूतगिरणीने संस्थेच्या अवसायन आदेश विरूध्द महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० कलम १५२ अन्वये अपील अर्ज शासनाकडे दाखल केलेला होता. त्यानुसार शासनाने अपील अर्जावर दि. २१.२.२०१८ रोजी आदेश पारीत करून संचालनालयाने पारीत केलेले संस्था अवसायनाचे अंतिम आदेश रद्द केले. सदर रद्द केलेल्या अंतिम आदेशात संचालक मंडळाची निवडणूक होऊन नवीन संचालक मंडळ पदभार घेईपर्यंत संस्थेचे दैनंदिन कामकाज पाहण्याकरीता हंगामी समिती नेमण्याचे आदेशित करण्यात आले आहेत. त्यानुसार आयुक्तालयाच्या दि.२७.०२.२०१८ च्या पत्रानुसार हंगामी समितीची महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ७७ अ अन्वये नेमणूक करण्यात आली आहे.

२. शासन निर्णय दि. २ मे, २०१८ अन्वये सदर सूतगिरणीची शासकीय अर्थसहाय्य देण्यासाठी नव्याने निवड करण्यास शासनाने मान्यता दिलेली आहे. शासन निर्णय दि. १३ सप्टेंबर, २०१९ अन्वये सूतगिरणीचा प्रकल्प अहवाल किंमत रु. ६१७४.२४ लाख मंजूर करण्यात आलेला आहे. सूतगिरणीने रू.१२५.०० लाख सभासद भागभांडवल जमा केलेले आहे. सुतगिरणीने अद्यापही

जमीन खरेदी केलेली नाही. शासन निर्णय दि. १८ सप्टेंबर, २०१९ अन्वये सूतगिरणीस रू.९००.०० लाख शासकीय भागभांडवल प्राप्त झालेले आहे. शासन निर्णय दि.२०.०७.२०१८ नूसार सूतगिरणीस मंजूर करण्यात येणाऱ्या शासकीय भागभांडवल उचल करणेकरीता सर्वसाधारण प्रवर्गातील सहकारी सुतगिरणीसाठी १० % इतके तारण घेण्यात यावे. संचालक मंडळाचे तारण घेतांना प्रति संचालक कमाल २% इतके वैयक्तीक मालमत्तेच तारण घेण्यात यावे असे नमूद आहे. याप्रमाणे सूतगिरणीने १०% तारण सादर केल्याने शासकीय भागभांडवल उचलीची परवानगी देण्यात आलेली आहे. सूतगिरणीची दि.१०.१२.२०२१ रोजी विनविरोध निवडणूक होऊन सन २०२१-२६ या कालावधीकरीता संचालक मंडळ अस्तित्वात आलेले आहे. सूतगिरणीचे नोंदणी प्रमाणे कार्यक्षेत्र सोलापूर व अहमदनगर जिल्हापूरते मर्यादित होते. सदर कर्यक्षेत्रात कर्जत व जामखेड तालुका व सांगली जिल्हातील कवठेमहांकाळ या तालुक्यांचा वाढीस दि. १८.११.२०२२ रोजी मान्यता देण्यात आली. सदर सूतगिरणीचे दि.३१.३.२०२२ अखेरचे लेखापरीक्षण झालेले आहे. सदर सूतगिरणीचे वस्त्रोद्योग आयुक्तालयाद्वारे माहे एप्रिल, २०२३ मध्ये महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ८९ अ अन्वये दप्तर तपासणी करण्यात येत आहे.

*******

महाराष्ट्र विधानसभा १०५ अन्वये लक्षवेधी सूचना

श्री. लहू कानडे, वि.स.स. यांनी विधानसभा नियम १०५ अन्वये मांडलेली लक्षवेधी सूचना क्र.१७० पुढीलप्रमाणे आहे.

"राज्यात २०१५ नंतर सुमारे १५००० शेतकरी विधवा असून सन २०२२ मध्ये जानेवारी ते ऑगस्ट या दरम्यान सुमारे १८७५ शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्याचे उघडकीस येणे, शेतकरी विधवा महिलांसाठी शासकीय पेन्शन असून या पेन्शन केवळ कागदावरच राहिलेले असने, १५००० अधिक संख्येत असलेल्या ह्या शेतकरी विधवासाठी शासनाची कोणतीही एकत्रीत उपयोजना नसणे, शेतकरी आत्महत्या नंतरचा या विधवा महिलांचा विदारक वास्तव समजून घेण्यासाठी मकाम या संस्थेने केलेल्या संशोधनातून काही धक्कादायक बाबी उघडकीस येणे, एकूण शेतकरी आत्महत्या पैकी केवळ २६ टक्केच महिला या पेन्शनसाठी अर्ज केलेला असने, त्यापैकी ४७ टक्के महिलांनाच पेन्शन मिळणे, पीडितांना स्वतंत्र रेशनकार्डची मुभा असूनही फक्त ३४ टक्के आत्महत्याग्रस्त महिलांचे नाव माहेर अथवा सासरच्याच रेशनकार्डवर असणे, ७ टक्के पीडितांचं नावही रेशनकार्डवर नसणे, ६५ टक्के आत्महत्याग्रस्त पीडितांना पती निधनानंतर घराचा मालकी हक्क नाकारला जाणे, २९ टक्के पीडितांचा पतीच्या संपत्तीतील हक्क डावलला गेला असून ४० टक्के पीडिता शेतजमिनीच्या हक्कापासून वंचित असल्याचे उघडकीस येणे, ग्रामीण भागात ७५ पेक्षा जास्त महिला शेतामध्ये काम करूनही त्यांना शेतकरी म्हणून नाकारले जाणे, त्यामुळे मोठ्या प्रमाणात शेतकरी विधवा या हतबल होऊन ऊसतोडी सारख्या कामात गुंतलेल्या असणे, तिथे त्यांना लैंगिक छळ, अपमान, जीवघेणी मारहाण व कौटुंबिक हिंसाचार इत्यादी अत्याचारांचा सामना करावा लागणे, साखर कारखाना, ग्रामपंचायत, पोलीस यापैकी कोणीही त्यांच्या सुरक्षिते साठी प्रयत्न न करणे, आत्महत्याग्रस्त महिला शेतकऱ्यासंदर्भात १८ जून, २०१९ रोजी झालेल्या शासन निर्णयाची अद्याप पर्यंत अंमलबजावणी न होणे, अशाप्रकारे या विधवा शेतकऱ्यांच्या मनात कायम स्वरूपी असलेली असंतोषाची व असुरक्षितेचे भावना, सबब शासनाने शेतकरी विधवा महिलाना समाजात योग्य स्थान देऊन त्यांच्या उपजीविकेबाबत शासनाने करावयाची धोरणात्मक कार्यवाही व प्रतिक्रिया."

मा.मंत्री, महिला व बालविकास यांचे निवेदन

महिला व बाल विकास विभाग, शासन निर्णय दि.२७.०८.२०२१ अन्वये "मिशन वात्सल्य" या योजनेंतर्गत एकल/ विधवा महिला आणि अनाथ बालके यांना शासनाच्या विविध विभागांमार्फत राबविण्यात येणाऱ्या योजनांचा लाभ उपलब्ध करुन देण्याची जबाबदारी तालुकास्तरीय समितीवर सोपविण्यात आलेली आहे. सदर योजनेंतर्गत संजय गांधी निराधार योजना, राष्ट्रीय कुटुंब लाभ योजना, श्रावण बाळ योजना, इंदिरा गांधी राष्ट्रीय विधवा निवृत्तीवेतन योजना, मालमत्ता विषयक हक्क, शिधापत्रिका, वारस प्रमाणपत्र इ. बाबत सहकार्य करण्यात येते.

कौटुंबीक हिंसाचारग्रस्त पिडीत महिला यांना न्यायालयात दाद मागणेसाठी तालुकास्तरावर कनिष्ठ संरक्षण अधिकारी यांची नियुक्ती करण्यात आलेली आहे. या संरक्षण अधिकाऱ्यांकडे येणाऱ्या प्रत्येक महिलेची तक्रार सदर महिलेच्या संमतीने न्यायालयात दाखल करण्यात येते व न्यायालयाच्या आदेशानुसार पुढील कार्यवाही करण्यात येते.

अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभागामार्फत शेतकरी आत्महत्याग्रस्त जिल्हयांमध्ये शेतकऱ्यांच्या विधवांना प्राधान्याने स्वतंत्र शिधापत्रिका देऊन अन्नधान्याचा लाभ देण्यात येतो. शेतकरी आत्महत्याग्रस्त कुटुंबातील महिलेच्या नावे कुटुंबप्रमुख म्हणून स्वतंत्र शिधापत्रिका वितरित करण्यात येते. सामाजिक न्याय विभागामार्फत राबविण्यात येणाऱ्या संजय गांधी निराधार अनुदान योजना, श्रावणबाळ सेवा राज्य निवृत्तीवेतन योजना या राज्य पुरस्कृत योजनेंतर्गत तसेच, इंदिरा गांधी राष्ट्रीय वृध्दापकाळ निवृत्तीवेतन योजना, इंदिरा गांधी राष्ट्रीय विधवा निवृत्तीवेतन योजना व इंदिरा गांधी राष्ट्रीय अपंग निवृत्ती वेतन योजना या केंद्र पुरस्कृत योजनांतर्गत राज्यातील निराधार विधवा महिलांना अर्थसहाय्य/अनुदान दिले जाते.

कृषी विभागामार्फत १८००२३३४००० या क्रमांकाच्या टोल फ्री सुविधेव्दारे राज्यातील पुरुष व महिला शेतकऱ्यांच्या अडचणीबाबत तांत्रिक मार्गदर्शन केले जाते. महसूल व वन विभाग, शासन निर्णय दि.२३.०१.२००६ अन्वये नापिकी, कर्जबाजारीपणा व कर्जफेडीचा तगादा या तीन कारणांमुळे शेतकरी आत्महत्या घडली असल्यास, आत्महत्याग्रस्त शेतकऱ्यांच्या कुटुंबियांना रु.१.०० लक्ष इतकी मदत देण्यात येते. ग्राम विकास विभागामार्फत राबविण्यात येणाऱ्या प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीण (PMAY-G) या केंद्रपुरस्कृत योजनेच्या मार्गदर्शक सूचनानुसार सदर योजनेमध्ये विधवा महिलांना प्राधान्य देण्यात येते.

*******

**गृह विभाग** **लक्षवेधी सूचना क्रमांक : २४५**

## महाराष्ट्र विधानसभा
## सन २०२३ चे पहिले (अर्थसंकल्पिय) अधिवेशन

श्री.छगन भुजबळ, श्री.जितेंद्र आव्हाड, विधानसभा सदस्य यांनी विधानसभा नियम १०५ अनुसार दिलेली लक्षवेधी सुचना क्र.२४५ पुढीलप्रमाणे आहे :-

"दि. ८ फेब्रुवारी २०२३ रोजी महिला विधानपरिषद सदस्या या कसबे धावंडा ता.कळमनुरी जि.हिंगोली येथे गावकरयांना मार्गदर्शन करीत असताना अनोळखी व्यक्तीने त्यांच्यावर हल्ला करणे, दि. ११ जानेवारी २०२३ रोजी कणेरा-रहाटगाव नाका जि.अमरावती येथे विधानसभा सदस्य यांना दुचाकी वाहनाने उडवल्यामुळे अपघात होवून ते गंभीर जखमी झालेले असणे, सदर अपघात घातपातामुळे झाल्याची लोकप्रतिनिधी यांनी तक्रार केलेली असणे, दि.१४ जानेवारी २०२३ रोजी केंद्रीय रस्ते वाहतूक मंत्री यांना त्यांच्या नागपूर येथील कार्यालयात दूरध्वनीद्वारे जीवे मारण्याची धमकी प्राप्त झालेली असणे, मुंबईत सुद्धा धमक्यांच्या कॉलचे सत्र सुरूच असून मुंबई पोलीस दलातील सहआयुक्तांसह गुगल इंडिया प्रा.लि.कंपनीच्या नंबरवर धमक्यांचे दोन कॉल आलेले असणे, या प्रकरणांची सखोल चौकशी करण्याची तसेच लोकप्रतिनिधींच्या सुरक्षेबाबत शासनाने उपाययोजना करण्याची आवश्यकता असणे, यावर शासनाने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

---

### मा.उप मुख्यमंत्री (गृह) महोदय यांचे निवेदन

श्रीमती प्रज्ञा राजीव सातव, मा.विधान परिषद सदस्या यांच्यावर दिनांक ०८.०२.२०२३ रोजी झालेल्या हल्ल्याच्या अनुषंगाने आखाडा बाळापुर पोलीस ठाणे येथे गु.र.क्र १२७/२०२३ कलम ३५३, ३५२, ३२३ भा.दं.वि. प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला असून एका आरोपीस अटक करण्यात आली आहे. सदरचा गुन्हा हा आरोपीने दारुच्या नशेत केला असून सदर घटना करणेकरिता त्याला कोणीही प्रोत्साहित केलेले नव्हते अथवा पाठविलेले नव्हते. सदर घटना ही पुर्व नियोजित नसुन अचानक पणे घडलेली आहे. नमुद गुन्हा हा तपासावर असुन नमुद गुन्ह्यात विशेष अभियोक्ता यांची नेमणुक करण्यात आली आहे.

श्री.ओमप्रकाश उर्फ बच्चू कडू, मा.विधानसभा सदस्य हे दिनांक ११.०१.२०२३ रोजी आराधना चौक, कठोरा जकात नाक्याजवळी चौकात रोड क्रॉस करीत असताना एका अज्ञात दुचाकी वाहनाने उडविल्यामुळे त्यांचा अपघात होवून ते गंभीर जखमी होऊन त्यांच्या कपाळाला व पायाला इजा झाली. सदर प्रकरणी त्यांचा वाहन चालक यांने दिलेल्या फिर्यादीवरुन गाडगेनगर पोलीस स्टेशन, अमरावती शहर येथे अपराध क्र.६०/२०२३ कलम १७९, ३३७ भा.दं.वि. सह कलम १७७, १८४, १३४ मोटार वाहन कायद्यान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सदर गुन्ह्याचा तपास सुरु आहे.

मा.श्री.नितिन गडकरी, केंद्रिय रस्ते व वाहतुक मंत्री यांचे नागपूर येथील कार्यालयामध्ये एका अज्ञात व्यक्तीने त्यांच्या कार्यालयातील दुरध्वनीवर दिनांक १४.०२.२०२३ रोजी फोन करुन त्यांना १०० कोटीची खंडणीची मागणी केली व न दिल्यास मा.मंत्री महोदयांना व कार्यालयाला बॉम्बने उडविण्याची व जिवानीशी मारण्याची धमकी दिली. सदर प्रकरणी फिर्यादीने दिलेल्या फिर्यादीवरुन गु.र.नं.१४/२०२३ कलम ३८५, ३८७, ५०६(२), ५०० भा.दं.वि. अन्वये गुन्हा नोंदविण्यात आला. सदरचा गुन्ह्याचा तपास सुरु आहे.

पोलीस सह आयुक्त यांना आलेल्या धमकीबाबत गुन्हे प्रकटीकरण शाखा गु.र.नं.२२/२३, कलम १८२(बी), ४१९, ५०५(१)(बी), ५०५(२), ५०६ भा.दं.वि. (गांवदेवी पोलीस ठाणे गु.र.नं. २८/२३) अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला असून सदरचा गुन्हा तपासाधीन आहे. तसेच, गुगल इंडिया प्रा.लि. या कंपनीच्या नंबरवर कंपनीतील कर्मचारी यांना घाबरविण्याच्या उद्देशाने व सार्वजनिक शांतता बिघडविण्याच्या उद्देशाने आलेल्या धमकीच्या अनुषंगाने बी.के.सी. पोलीस ठाणे येथे गु.र.क्र. ६३/२० कलम ५०५(१)(ब), ५०५(२) भा.दं.वि. अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे. सदर गुन्ह्यात एका आरोपीस अटक करण्यात आली. सदरचा गुन्हा तपासाधीन आहे.

---

रोटा/एच-३१५[७५०-३-२०२३]•

## महाराष्ट्र विधानसभा
## सन २०२३ चे पहिले (अर्थसंकल्पिय) अधिवेशन

श्री.राजेंद्र शिंगणे, श्री.अजित पवार, विधानसभा सदस्य यांनी विधानसभा नियम १०५ अन्वये दिलेली लक्षवेधी सूचना क्रमांक १८५० पुढीलप्रमाणे आहे :-

"सोयाबीन व कापसाला दरवाढ मिळावी यासह अनेक सार्वजनिक हिताच्या मागण्यांसाठी श्री.रविकांत तुपकर यांनी दि. 11 फेब्रुवारी, 2023 रोजी बुलढाणा जिल्हाधिकारी कार्यालयासमोर आत्मदहनाचा इशारा दिलेला असणे, अतिवृष्टीची नुकसान भरपाई, पीकविमा रक्कम शेतकऱ्यांना मिळणेबाबत त्यांनी संघटनेमार्फत शांततेत आंदोलन केलेले असणे, दिनांक 11 फेब्रुवारी, 2023 रोजी त्यांचे आत्मदहनाच्या प्रयत्नाचे वेळी अंगावर डिझेल पडलेले असणे, काही प्रमाणात ते प्यायले गेले असणे, अशा परिस्थितीतही त्यांना स्थानबध्द करुन दवाखान्यात घेऊन न जाता, उलट त्यांचेसोबत आलेल्या शेतकऱ्यांवर बेछूटपणे लाठी हल्ला केलेला असणे, त्यामध्ये जेष्ठ नागरीक, महिला, लहान मुले जखमी होणे, वार्ताकन करणाऱ्या पत्रकार बांधवांना पण धक्काबुक्की करीत मारहाण झालेली असणे, एकंदरीत लाठी हल्ला हा पूर्व नियोजित कट असणे, अनेक विद्यमान व माजी विधानसभा सदस्यांना तसेच मंत्री यांनाही श्री.तुपकर यांना भेटू न देणे, लोकशाहीची पूर्णपणे पायमल्ली करणे, त्यांचेवर अनेक गंभीर गुन्हे मुद्दामहून दाखल करणे, सनदशीर मार्गाने होणारी आंदोलने दडपण्याचा प्रयत्न करणे, यामध्ये पोलीस अधिकाऱ्यांना हाताशी धरुन अशी कृत्ये करणे, या संदर्भात चौकशी करुन संबंधित पोलीस अधिकाऱ्यांविरुध्द कारवाई करण्याची होत असलेली मागणी, परिणामी तेथील जनतेत पसरलेले भितीचे वातावरण व त्यांच्यात पसरलेला तीव्र असंतोष, पोलीस निरीक्षक,प्रल्हाद काटकर व सहाय्यक पोलिस निरीक्षक,जयसिंग पाटील हे दारु पिवून लाठी चार्ज करण्यात आघाडीवर असणे, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

---

## मा.उप मुख्यमंत्री (गृह) महोदय यांचे निवेदन

दिनांक ११.०२.२०२३ रोजी बुलढाणा जिल्हाधिकारी कार्यालय तसेच AIC पिकविमा कंपनीचे बॉम्बे स्टॉक एक्सचेंज, मुंबई येथील कार्यालय या ठिकाणी सोयाबीन व कापूस उत्पादक शेतक-यांच्या प्रश्नांबाबत व पिकविम्यासंदर्भात केंद्र व राज्य सरकारच्या उदासीन भूमिकेला कंटाळून आत्मदहन करण्याची परवानगी द्या किंवा आम्हाला गोळया घाला, अशा प्रकारचे आंदोलन करण्यात आले होते. सदर आंदोलनादरम्यान आंदोलनकर्ते श्री.रविकांत तुपकर यांनी अंगावर डिझेल सदृष्य द्रव पदार्थ अंगावर ओतून घेत असतांनाच त्यांना बंदोबस्तावरील पोलीसांनी त्यांचे हातातील बाटली व माचीस काढून घेतली व त्यांना आत्मदहनापासून परावृत्त केले आहे.

श्री.रविकांत तुपकर यांची वैदयकीय तपासणी करण्यात आली असता ते आंदोलनादरम्यान डिझेलसदृष्य द्रव पदार्थ प्यायले असल्याबाबत वैदयकीय तपासणीत आढळून आलेले नाही. श्री.रविकांत तुपकर यांना वैद्यकीय तपासणी करिता घेवुन जाण्यासाठी ताब्यात घेत असताना आंदोलनकर्त्यांनी पोलीसांवर दगडफेक करुन त्यांना जखमी केले. तसेच जिल्हाधिकारी कार्यालयासमोर असलेल्या शासकीय बॅरिकेड्सचे नुकसान केल्यामुळे आरोपींविरुध्द पोलीस स्टेशन बुलढाणा शहर येथे अप क्र.१०५/२०२३ कलम १४३, १४७, १४९, ३५३, ३०९,

३३६, १०९, १८८, १७१, ३३२ भा.दं.वि. सह कलम १३५ मपोका प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सदर गुन्ह्यात एकूण २५ आरोपींना अटक करण्यात आली असून इतर ९ आरोपींना मा. जिल्हा सत्र न्यायालयाने अटकपुर्व जामीन मंजूर केला आहे. सदर आंदोलनकर्त्यांवर कोणतेही हेतुपुरस्सर किंवा मुद्दामहुन गुन्हे दाखल करण्यात आलेले नाहीत व आंदोलन दडपण्याचा प्रयत्न करण्यात आलेला नाही. श्री.तुपकर यांना भेटावयास कोणालाही मज्जाव करण्यात आला नव्हता. तसेच, सर्व लोकप्रतिनिधी यांना पोलीस स्टेशन आवारात श्री.तुपकर यांना भेटण्यास वेळ देण्यात आला होता.

सदर आंदोनाच्यावेळी कोणत्याही लहान मुलांना, महिलांना किंवा वयोवृध्द व्यक्तींना मारहाण झालेली नाही. सदर प्रकरणी कायदा व सुव्यवस्था अबाधित ठेवण्यासाठी आवश्यक तेवढ्याच सौम्य बळाचा वापर करण्यात आला आहे. पोलीस निरीक्षक प्रल्हाद काटकर व सपोनि जयसिंग पाटील हे त्यांचे कर्तव्य करीत असताना दारु प्यायलेले नव्हते. सदर गुन्ह्याचा अधिक तपास सुरु आहे.

-----------------------

गृह विभाग लक्षवेधी सूचना क्र.: २०९०

**महाराष्ट्र विधानसभा**
**सन २०२३ चे पहिले (अर्थसंकल्पिय) अधिवेशन**

श्री.राजेश एकडे, विधानसभा सदस्य यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अनुसार उपस्थित केलेली लक्षवेधी सुचना क्रमांक २०९० पुढीलप्रमाणे आहे:-

"बुलढाणा जिल्ह्यातील मलकापूर विधानसभा मतदारसंघात मागील वर्षभरात सुमारे 50 तरुणांनी आत्महत्येच्या माध्यमातून मृत्यूला कवटाळलेले असणे, प्रत्येक महिन्याला सरासरी 4 ते 5 युवकांनी आत्महत्या करणे ही बाब केवळ मृत युवकांच्या आई-वडिलांनाच चटका लावणारी असून समाजातील विचारवंत व व्यवस्थेची निगराणी करणाऱ्या प्रशासनासाठी अत्यंत भयावह व गांभीर्याने विचार करावयास भाग पाडणारी बाब असणे, जानेवारी 2022 ते जानेवारी 2023 दरम्यान मलकापूर शहर पोलीस स्टेशन अंतर्गत 24 ग्रामीण पोलीस स्टेशन अंतर्गत 21, दसरखेड एमआयडीसी पोलीस स्टेशन हद्दीत 5 अशा एकूण 50 आत्महत्येच्या घटना घडलेल्या असणे, यापैकी 21 आत्महत्यांची प्रकरणे ही 32 वयोगटाच्या आतील असणे, हा सुशिक्षित बेरोजगार युवक वर्ग खाजगी सावकारी, फायनान्स कंपन्यांच्या सापळ्यात ओढल्या जात असणे, तथापि पाच-दहा टक्के नव्हे तर 20 टक्क्यापर्यंत व्याज आकारणी करून धाकदपटशाही, समाजात, कामाच्या ठिकाणी, मित्रमंडळी समोर, घरापर्यंत येऊन कुटुंबियांसमोर अपमानजनक पद्धतीने कर्जवसुलीचा तगादा, शिविगाळ प्रसंगी मारहाण करणे या कार्यपद्धतीमुळे कर्जदार युवक प्रचंड नैराश्याने ग्रस्त होत असणे, परिणामी आत्महत्येस प्रवृत्त होणे, सोशल मीडिया व इंटरनेटच्या आहारी गेलेला बहुसंख्य युवा वर्ग कष्टाविना शॉर्टकट झटपट श्रीमंत होण्यासाठी ऑनलाईन सट्टा, जुगार, गेमिंग तसेच अश्लील उद्योगाशी निगडित व्यावसायिक तरुणींच्या हनी ट्रॅप मध्ये ओढल्या जात असणे, परिणामी पैशांची मागणी व न दिल्यास सामाजिक बदनामीची धमकी, ब्लॅकमेलिंग अशा सापळ्यात हा युवावर्ग अडकला असणे, या सापळ्यातून बाहेर पडू न शकल्याने देखील हा युवा वर्ग आत्महत्येचा मार्ग धरत असणे, माझ्या मतदारसंघात गेल्या वर्षभरात झालेल्या युवकांच्या आत्महत्या प्रकरणी मी स्थानिक पोलीस निरीक्षक, जिल्हा पोलीस अधीक्षक यांच्याशी प्रत्यक्ष चर्चा करून देखील सखोल तपास व उपाययोजना न झाल्याने तसेच सायबर क्राईमचे अपयश यामुळे यासंबंधी नागपूर हिवाळी अधिवेशनात दि.28 डिसेंबर 2022 रोजी मी नियम 293 च्या प्रस्तावावर चर्चा करत असताना पोटतिडकीने या विषयाचे गांभीर्य मांडून सुद्धा आजतागायत विधिमंडळाने देखील या विषयाची दखल घेतलेली नसणे, त्यामुळे पालकांमध्ये व समाजामध्ये पोलीस प्रशासना विषयी तीव्र रोष असणे, परिणामी या लक्षवेधीच्या माध्यमातून मी माझे मतदारसंघात गेल्या वर्षभरात सुमारे 50 हून अधिक युवकांनी केलेल्या आत्महत्या प्रकरणाची एक विशेष पथक ज्यामध्ये क्राइम ब्रांच, सीआयडीच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांचा समावेश असेल, असे पथक नेमून विहित कालावधीमध्ये या सर्व आत्महत्या प्रकरणामागच्या कारणांची तातडीने उकल करण्याची आवश्यकता, या गंभीर विषयाकडे शासनाचे झालेले दुर्लक्ष आणि शासनाने करावयाच्या उपायोजना व शासनाची प्रतिक्रिया."

---

**<u>मा.उप मुख्यमंत्री महोदय यांचे निवेदन</u>**

जानेवारी २०२२ ते जानेवारी २०२३ दरम्यान बुलढाणा जिल्हयातील १) पो.स्टे. मलकापुर शहर, २) पो. स्टे मलकापुर ग्रामिण, ३) पोस्टे. **MIDC** मलकापुर व ४) पो.स्टे. नांदुरा हददीत ७० इसमांनी आत्महत्या केली आहे. आत्महत्या केलेले इसम हे ११ ते २० वयोगटातील ०५, २१ ते ३० वयोगटातील २५, ३१ ते ४० वयोगटातील १५, ४१ ते ५० वयोगटातील ०९ व ५० वर्षांचे वरील १६ या वयोगटातील आहेत. सदर आत्महत्या ह्या नापिकी कर्जामुळे दारुचे नशेमध्ये, आजाराला कंटाळून, कौटुंबिक नैराश्यातून, रागाचे भरात, प्रेमसंबंधातून, मानसिक स्थिती ठिक नसणे तसेच इतर किरकोळ कारणासाठी करण्यात आलेल्या आहेत.

नमुद आत्महत्यामध्ये फायनान्स कंपन्यांनी सापळ्यामध्ये ओढणे, अपमानजनक पद्धतीने कर्ज साठी तगादा लावण्यासाठी, झटपट श्रीमंत होण्यासाठी ऑनलाईन सट्टा, जुगार, गेमिंग तसेच अश्लील उद्योगाशी निगडीत व्यावसायिक तरुणीच्या हनी ट्रॅप मध्ये ओढल्या जात असणे इ. प्रकाराने झालेल्या असल्याचे उघडकीस आलेले नाही.

**महाराष्ट्र राज्य येथे होणाऱ्या सायबर गुन्ह्यांना आळा घालण्यासाठी करण्यात येणाऱ्या उपाययोजना :-**

१) CCPWC. (Cyber Crime Prevention Against Women & Children) प्रकल्प महिला व बालकांचे सायबर गुन्हयापासून प्रतिबंध करण्याकरीता केंद्र शासनाने ठरवून दिलेल्या उद्दीष्टानुसार सायबर गुन्हे विश्लेपन व प्रकटीकरण याकरीता प्रशिक्षण केंद्र आणि न्याय सहायक प्रयोगशाळा" यांची निर्मीती "महिला व बालकांवर होणारे सायबर गुन्हे प्रतिबंध" या प्रकल्पान्वये करण्यात आलेली आहे.

२) भारत सरकार, गृह मंत्रालयाने ठरवून दिलेल्या उद्दिष्टानुसार प्रशिक्षण केंद्रामध्ये पोलीस अभियोक्ता व न्यायविषयक अधिकारी यांना प्रशिक्षण देण्यात आलेले आहे.

३) ऑक्टोबर २०१२ पासून महाराष्ट्र सायबर कार्यालयात सायबर गुन्हे अन्वेषण या विषयावर २७० पोलीस अधिकारी/अंमलदार व ३० सरकारी अभियोक्ता यांना असे एकूण ३०० जणांना प्रशिक्षण देण्यात आलेले आहे. महाराष्ट्र सायबर कार्यालयात सायबर हेल्पलाईन १९३० चालु करण्यात आलेली आहे.

४) महाराष्ट्र सायबर सुरक्षा प्रकल्पा अंतर्गत प्रस्तावित प्रकल्प नवी मुंबई, म्हापे, मिलेनियम पार्कमधील येथील इमारत अद्ययावत करणे, तेथे नोडल सायबर पोलीस स्टेशन, प्रशासकीय कार्यालय व सायबर सुरक्षाविषयक प्रकल्प स्थलांतरीत करण्याच अनुषंगाने आवश्यक कार्यवाही सुरु आहे.

**पिडीताचे समुपदेशन करण्यासाठी करण्यात आलेल्या उपाययोजना :-**

१) सोशल मिडीयाचा वापर करताना वैयक्तीक माहिती प्रसारीत करू नये.

२) महिला पोलीस निर्भया पथक तसेच महिला सदस्य यांचे करवी पीडितांचे समुपदेशन करण्यात आले आहे. महिला व बाल विकास समिती समोर हजर करून समुपदेशन केले जाते.

३) महिला स्वतंत्र कक्ष स्थापन करण्यात आलेले आहे. तसेच महिलाना समुपदेश केंद्रात पाठिवण्यात येते. पोलीस स्टेशनला बोलावून त्यांची समजूत काढण्यात येते.

४) अनोळखी फ्रेंड रिक्वेट एक्सेप्ट करू नये आणि व्हिडीओ कॉल उचलू नये असे सांगण्यात आले.

५) पीडित व्यक्तीस सायबर गुन्हेगारी बाबत माहिती देऊन त्याबाबत योग्य खबरदारी कशी घ्यावी याबाबत समुपदेशन केले जाते.

६) तक्रादार तसेच पीडित यांना वेळोवेळी सायबर क्राईमबद्दल वेगवेगळे कार्यक्रम करून जनजागृती करण्यात येते. शाळा कॉलेज तसेच महिला दक्षता कमिटीच्या मिटिंग घेऊन होणाऱ्या फसवणुकीबाबत वेळोवेळी सूचना दिल्या जातात.

७) एहसास जनजागृती कार्यक्रम घेण्यात येतात. तसेच जनजागृती कार्यक्रमाचे आयोजन करण्यात येते.

---

महाराष्ट्र विधानसभा
सन २०२३ चे पहिले (अर्थसंकल्पिय) अधिवेशन

लक्षवेधी सूचना क्र.१७६९

**श्रीमती सरोज आहिरे, वि.स.स. यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अन्वये दिलेली लक्षवेधी सूचना पुढीलप्रमाणे आहे.**

" वालदेवी नदीवरील जलसंपदा विभागाचे अखत्यारीतील सिंचनासाठी बांधलेल्या बंधाऱ्यांच्या यांत्रिकीद्वारे दारांची उघडझाप दुरुस्ती होणेसाठी स्थानिकांची वारंवार मागणी असणे, त्या मागणीनुसार स्थानिक लोकप्रतिनिधी म्हणून स्थानिक लोकप्रतिनिधींनी विभागाकडे पाठपुरावा करणे, त्यानुसार मा.मंत्री जलसंपदा यांचेकडे दि.६/४/२०२१ रोजी बैठक होऊन तात्काळ दुरुस्ती करणेच्या सुचना देण्यांत येणे, दरम्यान कार्यकारी संचालक, गोदावरी पाटबंधारे विकास महामंडळ,औरंगाबाद यांनी सदरचे काम तात्काळ मंजूर करणेसाठी मुख्य अभियंता यांनाही सुचना देणे, कार्यकारी संचालक, गोदावरी पाटबंधारे विकास महामंडळ औरंगाबाद यांनी क्षेत्रिय कार्यालयाद्वारे सदरचे काम कृती आराखडयात होणेच्या सुचना देणे, त्यानुसार दि.१२/५/२०२२ रोजीच्या तत्कालीन अधिक्षक अभियंता यांच्या पत्रानुसार वालदेवी नदीवरील बंधारे दुरुस्तीकरिता रु.१.४१ कोटी निधी उपलब्ध होणे, तात्कालीन अधिक्षक अभियंता व प्रशासक लाभक्षेत्र विकास प्राधिकरण नाशिक यांनी वालदेवी बंधाऱ्यांचे काम देखभाल दुरुस्ती अंतर्गत मंजूर असतानाही स्थगितीच्या यादीखाली शासनास कळविणे, या कामाची निविदा प्रक्रिया अंतिम टप्प्यात असताना व अधिक्षक अभियंता यांनी निधी अनुपलब्धेबाबत कुठलाही पत्रव्यवहार झालेला नसताना दि.१४/१२/२०२२ च्या पत्रान्वये सन २०२२-२०२३ करीता वालदेवी बंधाऱ्यांचे देखभाल दुरुस्तीचे काम रद्द करणे, वास्तविक देवळाली नाशिक मतदार संघातील हे विकास काम राजकीय आकसापोटी तत्कालीन अधिक्षक अभियंता, नाशिक यांनी रद्द केलेले असणे, नाशिक डावा कालव्याचे प्रशासकीय मान्यता दिलेले विशेष दुरुस्तीचे रु.२.२० कोटीचे काम देखील जाणीवपूर्वक सहा महिने प्रलंबित ठेवलेले असणे, तत्कालीन अधिक्षक अभियंता लाभक्षेत्र विकास, नाशिक यांनी हेतु:पुरस्सर निधी व्यापगत केलेला असणे, राजकीयदृष्टीने प्रेरित होऊन विकास कामात अडथळा आणलेला असणे, एकंदरीत जलसंपदा विभागाच्या या विकास कामात हलगर्जीपणा करणाऱ्या या तत्कालीन अधिकाऱ्यांवर त्वरित कारवाई होणेची गरज, निधी उपलब्धेबाबत हलगर्जीपणा केलेला असणे, याप्रकरणी विभागीय चौकशी करुन शिस्तभंगाची कारवाई होणेची आवश्यकता, याबाबत शासनाने केलेली वा करावयाची कार्यवाही व त्याबाबत शासनाची भूमिका."

मा.उपमुख्यमंत्री (जलसंपदा) यांचे निवेदन

१. **वालदेवी नदीवरील बंधारे दुरुस्ती करणे :-**

वालदेवी बृहत ल.पा. प्रकल्प ता. नाशिक या प्रकल्पाचा एकुण पाणीसाठा ३४.०१ दलघमी असुन उपयुक्त साठा ३२.०९ दलघमी इतका आहे. सदर प्रकल्पाच्या अधोबाजूस वालदेवी नदीवर नाशिक तालुक्यात सिंचनासाठी एकुण १० बंधारे बांधलेले असुन या बंधा-यांचे सिंचन क्षेत्र १४८१ हे. इतके आहे.

वालदेवी नदीवरील सदर बंधा-यांना स्लुईस टाईप द्वारे बसविलेली असुन बंधा-यात गाळ साठल्याने द्वारांची उघडझाप होत नसुन द्वारे गंजलेली आहेत. सदर द्वारे उघडझाप होत नसल्याने पावसाळा कालावधीत लगतच्या शेतात पाणी शिरत असल्याने सदर द्वारांची दुरुस्ती करुन देण्याची मागणी स्थानिक

लोकप्रतिनिधींनी दि. १९.०३.२०२१ रोजी नाशिक पाटबंधारे विभागात झालेल्या बैठकीत केली. तसेच मा. मंत्री जलसंपदा यांचे अध्यक्षतेखाली मंत्रालय मुंबई येथे झालेल्या दि. ०६.०४.२०२१ रोजीच्या बैठकीत सदर कामाचा विशेष दुरुस्ती कामाचा प्रस्ताव शासनांस सादर करण्याच्या सुचना मा. मंत्री जलसंपदा यांनी दिल्या.

त्यास अनुसरुन सदर बंधा-यांचे द्वारांचे विशेष दुरुस्तीचे अंदाजपत्रक तयार करुन ते कार्यकारी संचालक, गोदावरी मराठवाडा पाटबंधारे विकास महामंडळ कार्यालय, छत्रपती संभाजीनगर यांना दि.११.०३.२०२२ रोजी मुख्य अभियंता जलसंपदा विभाग उत्तर महाराष्ट्र प्रदेश नाशिक यांचेमार्फत सादर करण्यात आले.

स्थानिक लोकप्रतिनिधींनी दि. ०१.०४.२०२२ रोजीच्या पत्रान्वये सदरचे कामास महामंडळ स्तरावरील निधी उपलब्ध करुन देण्याबाबत केलेल्या विनंतीच्या अनुषंगाने कार्यकारी संचालक गोदावरी मराठवाडा पाटबंधारे विकास महामंडळ कार्यालय, छत्रपती संभाजीनगर यांनी सदरचे काम हे सिंचन कृती आराखड्यातुन प्रस्तावित करावे अशा सुचना दि. ०६.०४.२०२२ चे पत्रान्वये दिल्या . तदनंतर सदरचे कामाचे रु. १४४ लक्ष किमतीचे अंदाजपत्रक सन २०२२चे पावसाळोत्तर देखभाल दुरुस्तीच्या आराखड्यात समाविष्ठ करुन त्यास अधीक्षक अभियंता व प्राशासक लाभक्षेत्र विकास प्राधिकरण नाशिक यांनी दि. १२.०५.२०२२ अन्वये मंजुरी देऊन दि. २१.०६.२०२२ रोजीच्या पत्रान्वये सदरचे काम सन २०२२-२३ मध्ये पूर्ण करण्यात येईल असे स्थानिक लोकप्रतिनिधींना कळविले.

शासन पत्र क्र.संकीर्ण — ०७२२ / प्र. क्रं. २५३ / २२ / मोप्र -१ दि.२५.०७.२०२२ अन्वये दि.०१/०४/२०२१ पासून आतापर्यंत (दि.२५/०७/२०२२) ज्या कामांना निधी मंजुर करण्यात आला असुन निविदा काढलेल्या नाहीत तसेच, ज्या कामांना निविदा मागविण्यात आहेत मात्र कार्यादेश दिलेले नाहीत किंवा कार्यादेश देऊनही कामे सुरु झाली नाहीत अशा कामांना शासनाने पुढील आदेश होईपर्यंत स्थगिती कळविली होती. सदर पत्रास अनुसरुन अधीक्षक अभियंता व प्राशासक लाभक्षेत्र विकास प्राधिकरण, नाशिक यांनी त्यांचे पत्र क्र. लाक्षेविप्राना / प्रशा २ / धा M& R / ३४६५ / सन २०२२ दि.०४.०८.२०२२ अन्वये सदर कामास स्थगिती कळविण्यात आली होती. तदनंतर शासनाने पत्र संकिर्ण -०७२२/प्र.क्र.२५३ /२२/मोप्र-१ दि.०२/०९/२०२२ अन्वये उपरोक्त स्थगीती उठविल्यानंतर कार्यकारी अभियंता नाशिक पाटबंधारे विभाग नाशिक यांनी सदर कामाचे स्थापत्य कामाचे रु. ५४.९० लक्ष व यांत्रिकी विभागाने रु. ८९.१० लक्ष किमतीचे यांत्रिकी कामाचे अंदाजपत्रक तयार करुन स्थापत्य कामाची निविदा विभागीय स्तरावरुन सुरु करण्यात येत असल्याचे विभागाचे पत्र दि २८.०९.२०२२ रोजी मा. अधीक्षक अभियंता व प्रशासक, लाभक्षेत्र विकास प्राधिकरण, नाशिक यांना कळविण्यात आले. तसेच यांत्रिकी विभागास निधी उपलब्ध करुन देणेबाबत कळविण्यात आले.

विभागीय कार्यालयाकडील दि.०१.११.२०२२ रोजीच्या पत्रान्वये ई निविदा प्रसिद्ध करुन निविदा प्रक्रीया राबविण्यात आली. तसेच यांत्रिकी विभागामार्फतही निविदा प्रक्रीया हाती घेणेबाबत विभागामार्फत कळविण्यात आले .

दरम्यान सन २०२२-२३ करीता देखभाल दुरुस्ती अंतर्गत कमी निधी मंजुर असल्याने वालदेवी नदीवरील स्थापत्य व यांत्रिकी काम रद्द करण्यात येत असल्याचे प्राधिकरण कार्यालयाने दि.१४.१२.२०२२ अन्वये विभागांस कळविले.

सदर कामाऐवजी नाशिक पाटबंधारे विभागाकडील मोठे व मध्यम प्रकल्पाच्या कालव्याची कामे प्रस्तावित करुन आराखडा करावा व वालदेवी नदीवरील धरणाच्या खालील बाजुस असलेल्या बंधा-यांची स्थापत्य व यांत्रिकी कामांची दुरुस्तीचे कामाचे विशेष दुरुस्ती अंदाजपत्रक सादर करावे अशा सुचना प्राधिकरण कार्यालयाचे पत्र दि. २०.१२.२०२२ अन्वये देण्यात आल्या.

सदरील कामाची निविदा प्रसिध्दीसाठी जिल्हा माहिती अधिकारी, नाशिक यांचेकडे विभागाचे पत्र दि.०६.०३.२०२३ अन्वये सादर केली असून महामंडळाच्या सिंचन कृती आराखडयातंर्गत सन २०२२-२३ व सन २०२३-२४ मध्ये उपलब्ध होत असलेल्या निधीतून सदरचे काम सन २०२३-२४ च्या पावसाळयापुर्वी पूर्ण करण्याचे नियोजन आहे.

**२. गंगापुर प्रकल्पाच्या नाशिक डावा तट कालव्याचे नुतनीकरण करणे :-**

गंगापूर प्रकल्प सन १९६४ साली पुर्ण झाला असून प्रकल्पास नाशिक डावा तट कालवा व नाशिक उजवा तट कालवा असे दोन कालवे आहेत. नाशिक उजवा तट कालवा शहरीकरणामुळे बंद झालेला आहे. नाशिक डावा तट कालव्याची सद्यस्थितीत एकूण लांबी ५१.५४ कि.मी. असून कालव्याचे एकूण भिजू शकणारे लाभक्षेत्र ( I.C.A.) १२१९० हे. इतके आहे. कालवा मुखाशी संकल्पित वहन क्षमता ३१५ क्युसेक्स इतकी आहे.

गंगापुर प्रकल्पाच्या नाशिक डावा तट कालव्याचे नुतनीकरण करणेबाबत स्थानिक लोकप्रतिनिधींनी दि.१४.०१.२०२० अन्वये मागणी केली होती. त्यास अनुसरुन नाशिक डावा तट कालव्याच्या दुरुस्तीचे महामंडळाने सादर केलेल्या अंदाजपत्रकास शासनाने दि.३१.५.२०२२ रोजीच्या शासन निर्णयान्वये रु.२.०६ कोटी किंमतीस प्रशासकिय मान्यता प्रदान केली आहे.

शासनाकडून प्राप्त प्रशासकीय मान्यतेच्या अनुषंगाने विभागाने सर्वप्रथम दि. ०५.०७.२०२२ रोजीच्या पत्रान्वये तांत्रिक मान्यतेचे अंदाजपत्रक प्राधिकरण कार्यालयास मंजुरीसाठी सादर केले होते. तद्नंतर प्राधिकरण कार्यालयाने वेळोवेळी शेरे उपस्थित करून शेरे पूर्ततेस्तव तांत्रिक मान्यता अंदाजपत्रक विभागास परत करून फेर सादर करण्याच्या सूचना दिल्या होत्या. अंतीमत: विभागाने दि.२६/१२/२०२२ अन्वये शेरे पूर्ततेसह सादर केलेल्या तांत्रिक मान्यता अंदाजपत्रकास प्राधिकरण कार्यालयाने दि.२७/१२/२०२२ अन्वये तांत्रिक मान्यता प्रदान केली आहे.

सदर कामास शासनाने पावसाळी अधिवेशन २०२२ मध्ये रुपये १०००/- इतकी लाक्षणिक तरतूद मंजूर करून सदर काम मा.विधानमंडळाच्या निदर्शनास आणलेले आहे. सद्यस्थितीत या कामाची ई-निविदा दिनांक २२.०२.२०२३ रोजी प्रसिद्ध करण्यात आली असून निविदा तपासणी व स्वीकृती कार्यवाही क्षेत्रिय स्तरावर प्रगतीत आहे.

----------------

# महाराष्ट्र विधानसभा

## सन-२०२३ चे (अर्थसंकल्पिय) अधिवेशन

**श्री. विनोद निकोले, मा.विधानसभा सदस्य यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अन्वये दिलेली लक्षवेधी सूचना पुढीलप्रमाणे आहे :-**

" महाराष्ट्र-गुजरात सीमेवरील पालघर जिल्हयातील तलासरी तालुक्यातील वेवजी ग्रामपंचायती नंतर शेजारच्या झाई गावाच्या जमिनीवर गुजरात राज्याने अतिक्रमण केल्याचा मुद्दा स्थानिकांनी उपस्थित केला. या प्रकरणी पालघरचे मा. जिल्हाधिकारी यांनी सीमा भागातील दोन्ही गावांना नुकतीच भेट देणे, तलासरी तालुक्यातील ग्रामस्थांना गुजरात राज्यातील उंबरगाव तालुक्यातील गोवाडा ग्रामपंचायतीने आपल्या जागेवर घरे बांधण्याचे सांगून सन २०२० साली घरे रिकामे करण्याची नोटीस झाई ता. तलासरी, जि. पालघर या महाराष्ट्र राज्यातील नागरीकांना देणे, त्यामुळे सीमाभागातील नागरीकांना संघर्ष करावा लागत असणे, महाराष्ट्र कर्नाटक सीमा वादाचा मुद्दा चर्चिला जात असतानाच आता महाराष्ट्र- गुजरात सीमा वाद निर्माण होत असणे, त्यामुळे या संदर्भात मा. जिल्हाधिकाऱ्यांनी महसूल व भूमि अभिलेख या विभागाला जमिनीची पूर्वीची कागद पत्रे व नकाशा गोळा करण्याच्या सुचना दिल्या असणे, तसेच वेवजी गावातील जमिनीवर गुजरातच्या सोलसुंभा ग्रामपंचायतीने केलेल्या अतिक्रमण भागात ही त्यांनी भेट दिली, त्यावेळी गावातील सरपंच, उपसरपंच, ग्रामविकास अधिकारी आणि ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित असणे, त्यामुळे राज्याराज्यात संघर्ष तीव्र होऊन सीमा वाद वाढण्याची शक्यता निर्माण होत असणे, त्यामुळे दि.०१ मे, १९६० रोजी अस्तित्वात आलेल्या महाराष्ट्राच्या सीमे प्रमाणे कायम करण्यासाठी गरज निर्माण होणे, तसेच, राज्य शासनाने राज्यात संपूर्ण सीमा भागात चेक पोस्ट सतत कार्यरत ठेवण्याची आवश्यकता असणे, यावर शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

---

### श्री. राधाकृष्ण विखे-पाटील, मा. मंत्री (महसूल) यांचे निवेदन

दैनिक लोकसत्ता या वर्तमानपत्रामध्ये दि.१४.१२.२०२२ रोजी महाराष्ट्र सीमेवर गुजरातची घुसखोरी या मथळ्याखाली बातमी प्रसिध्द झाली होती. त्याअनुषंगाने खात्री करण्यासाठी जिल्हाधिकारी, पालघर यांनी दि.१५.१२.२०२२ रोजी मौजे झाई ता. तलासरी, जि. पालघर येथे समक्ष भेट देऊन पाहणी केलेली आहे. सदर पाहणी दरम्यान मौजे झाई, ता. तलासरी, जि. पालघर येथील सीमेवरील रहीवासी व ग्रामपंचायत गोवाडा, ता. उंबरगांव, जि.वलसाड, राज्य गुजरात येथील सीमेवरील रहीवासी यांचे एकमेकांसोबत सलोख्याचे संबंध असुन याबाबत कुठल्याही प्रकारची तक्रार / त्रास नसल्याचे ग्रामस्थांचे म्हणणे आहे.

महाराष्ट्राच्या सिमेलगत असलेल्या गुजरातमधील सोलसुंभा ग्रामपंचायतीने ४० हून अधिक पथदिव्यांचे खांब पालघर जिल्ह्यातील वेवजी गावात बसवलेबाबत तसेच गुजरात मधील नागरीकांना वेवजी गावात घुसखोरी केल्याचा आणि सीमेवरील महाराष्ट्राची हद्द दर्शविणारे चिन्याचे चिन्हही तोडण्यात आले असलेबाबत दैनिक लोकसत्ता वृत्तपत्रात दि.२८.१०.२०२० रोजी बातमी आलेली होती.

ग्रामपंचायत वेवजी यांचेकडील दिनांक १६.०१.२०१९ रोजीच्या ना-हरकत दाखल्यानुसार ग्रामपंचायत व तीन रस्ता ते पोलीस चौकी वेवजी पर्यंत स्ट्रीट लाईट बसविणेकामी ग्रामपंचायत सोलसुंभा, ता.उंबरगांव जि.वलसाड गुजरात राज्य यांना परवानगी देण्यात आली होती. सदर ठिकाणी गुजरात व महाराष्ट्र राज्यातील हद्द निश्चित नसल्याने व हद्दिचा प्रश्न निर्माण झाल्याने ग्रामपंचायत वेवजी यांचेकडील दि.२२.०५.२०२० रोजीच्या पत्रान्वये सदर स्ट्रीट लाईट बसविणेकामी देण्यात आलेली परवानगी रद्द करून सदर स्ट्रीट लाईट काढून घेणेबाबत

कळविणेत आलेले होते. तथापि, ग्रामपंचायत सोलसुंभा, ता.उंबरगांव, जि. वलसाड यांनी सदर स्ट्रीट लाईट अद्यापपर्यंत काढलेले नाहीत.

उपअभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, तलासरी यांच्या अहवालानुसार, बोर्डी फाटा बोरीगाव नारायण ठाणे ते रा.मा. ७३ रस्ता प्र.जि.मा. ३ कि.मी ०/०० ते १४/३०० या लांबीत सा.क्र. ९/८६० ते १०/२९० अशी ४३.०० मी.लांबी ही गुजरात हद्दीमध्ये येत असून, सदर रस्त्याच्या साखळी क्रमांकात सार्वजनिक बांधकाम विभाग, तलासरी यांचेमार्फत कोणत्याही प्रकारची दुरुस्ती करणेत येत नाही. परंतु, स्थानिक ग्रामस्थांचे म्हणण्यानुसार सदर रस्ता हा महाराष्ट्र राज्याच्या हद्दीत आहे व सार्वजनिक विभाग, तलासरी यांचेमार्फत हद्द दर्शविणारे फलक वेळोवेळी स्थलांतरीत करणेत आले आहेत. त्यामुळे या प्रकरणी महाराष्ट्र-गुजरात राज्य यांचेतील सीमेची हद्द निशानी निश्चीत होणेकामी जिल्हाधिकारी, पालघर कार्यालयाकडील दिनांक ०७.०१.२०२१ रोजीच्या पत्रान्वये जिल्हाधिकारी वलसाड, गुजरात राज्य यांना मौजे-वेवजी, ता. तलासरी, जि. पालघर महाराष्ट्र राज्य व सोलसुंभा, ता. उंबरगांव, जि. वलसाड, गुजरात राज्य यांचेतील सिमेची हद्द निशानी निश्चीत होणेकामी संयुक्त मोजणी करणेकामी कळविणेत आलेले होते.

त्यानुसार, मौजे-वेवजी ता.तलासरी व मौजे- सोलसुंभा, ता. उंबरगांव येथील महाराष्ट्र व गुजरात राज्य यांचेतील सीमे लगतचे सर्व्हे नंबर २०३,२०४,२०५,२०६,२०७,२७९ व २८० स्थानिक उपसरपंच, स्थानिक नागरीक, ग्रामसेवक, तलाठी व सार्वजनिक बांधकाम विभागाचे प्रतिनिधी यांनी दाखविलेल्या कब्जेवहीवाटीप्रमाणे ई.टी.एस.मशिनच्या साह्याने उप अधीक्षक भूमी अभिलेख, तलासरी यांनी दि.३.३.२०२२ ते ४.३.२०२२ रोजी मोजणी काम केले आहे. मोजणीअंती गाव नकाशा, गट बुक पोटहीस्सा मोजणी आलेख व यापुर्वी झालेल्या मोजण्यांच्या आधारे उप अधीक्षक भूमी अभिलेख, तलासरी यांनी नकाशा तयार केला आहे.

मौजे-वेवजी ता.तलासरी व मौजे- सोलसुंभा, ता.उंबरगांव येथील महाराष्ट्र व गुजरात राज्य यांचेतील सीमेची हद्द निश्चित करणेकरीता उप अधिक्षक भूमी अभिलेख तलासरी, तलाठी व इतर कर्मचारी दि.२६.५.२०२२ रोजी जागेवर गेले असता गुजरात राज्यातील उंबरगांव तालुक्याचे तहसिलदार, तालुका विकास अधिकारी, उंबरगांव, सरपंच सोलसुंभा व गुजरात राज्यातील असंख्य स्थानिक नागरीक यांनी महाराष्ट्र व गुजरात राज्य यांचेतील सीमा हद्द निश्चिती करण्यास तिव्र विरोध केला. तसेच, हद्द निश्चित करू नये याबाबत लेखी निवेदन सादर केले आहे. गुजरात राज्यातील अधिकारी व स्थानिक नागरीकांनी हद्द निश्चितीसाठी महाराष्ट्र व गुजरात दोन्ही राज्यांच्या विधीमंडळात ठराव पास होऊन वरीष्ठ पातळीवर निर्णय झाल्यानंतर हद्द निश्चित करावी, याबाबत कोणत्याही प्रकारची कार्यवाही करू नये असा पंचनामा लिहून दिला आहे. गुजरात राज्यातील उंबरगांव तालुक्याचे अधिकारी वर्ग, सरपंच, तलाठी व स्थानिक नागरीकांनी हद्द निश्चित करण्यासाठी विरोध केलेला आहे. याबाबत पुन्हा जिल्हाधिकारी, पालघर यांनी जिल्हाधिकारी, वलसाड यांचेशी चर्चा करून समन्वय साधण्याबाबत कळविण्यात येत आहे.

**********

## महाराष्ट्र विधानसभा

## सन-२०२३ चे (अर्थसंकल्पिय) अधिवेशन

**श्री. शिरीष चौधरी, श्री. नानाभाऊ पटोले, श्री. बाळासाहेब थोरात, मा.विधानसभा सदस्य यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अन्वये दिलेली लक्षवेधी सूचना पुढीलप्रमाणे आहे :-**

"जळगाव जिल्ह्यातील रावेर तालुक्यामधील गारबर्डीच्या धरणाजवळील २२० लोकवस्तींच्या गावाला महसुली दर्जा देण्यात आलेला असून या गावाला वनदावा मंजूर होऊन १ वर्षे झाले व ४१ घरकुले व इतर योजना मंजुर झालेल्या असणे, परंतू भूमिलेख विभागाकडून गावासाठी मंजूर असलेल्या दोन हेक्टर वन दावा जमिनीचे दोन हेक्टर वन दावा जमिनीचे मोजमाप न झाल्याने शासकीय यंत्रणेच्या दुर्लक्षामुळे आदिवासींना आजही शासकीय योजनांपासून वंचित रहावे लागत असल्याचे माहे फेब्रुवारी, २०२३ रोजी वा त्या दरम्यान निदर्शनास येणे, त्यामुळे तेथील ग्रामस्थांमध्ये पसरलेली तीव्र असंतोषाची भावना, गारबर्डीच्या धरणाजवळील आदिवासींची होणारी गैरसोय दूर करण्याकरिता शासन आवश्यक कार्यवाही करण्याची गरज व याबाबत करावयाची प्रतिक्रिया."

---

## श्री. राधाकृष्ण विखे-पाटील, मा. मंत्री (महसूल) यांचे निवेदन

जळगांव जिल्हयातील रावेर तालुक्यातील गारबर्डीच्या धरणाजवळील सुकीधरण पाडा ग्रुप ग्राम पंचायत निमडया ता. रावेर येथील क.नं. ३९ क्षेत्र २.०० हे. आर क्षेत्राच्या सामुहिक वन संसाधनाचे हक्क दिनांक १.२.२०२१ अन्वये मंजूर करण्यात आले आहेत. सामुहिक वनहक्क दावा जिल्हास्तरीय वनहक्क समितीने मंजूर केल्यानंतर सदर सामुहिक दाव्याचा वनपट्टा प्रचलित कार्यपध्दतीनुसार संबंधित दावेदार, उपविभागीय अधिकारी, अधिक्षक, भूमी अभिलेख, उप अधिक्षक, भूमी अभिलेख, उप वनसंरक्षक, प्रकल्प अधिकारी यांचेकडे पाठविण्यात येतो.

सुकीधरणपाडा येथील सामुहिक वनहक्क दाव्याचे क्षेत्रात मंजूर ४८ घरकुले व इतर योजनांसाठी मोजणी करणे आवश्यक असल्याने स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी सदर दाव्याचे क्षेत्राची मोजणी झाली नसल्याची बाब निदर्शनास आणली. त्यानुसार जिल्हाधिकारी, जळगांव यांनी दिनांक ३.३.२०२३ रोजीच्या पत्रान्वये, अधिक्षक, भूमी अभिलेख, जळगांव यांना तात्काळ मोजणी करून "क" प्रतीसह अहवाल सादर करण्याबाबत सुचीत केले आहे.

सदर सामुहिक वन संसाधनांचे दिनांक १.२.२०२१ चे हक्क पत्र यापूर्वी अधिक्षक, भूमी अभिलेख, जळगांव तसेच उप अधिक्षक, भूमी अभिलेख, रावेर यांना प्राप्त झाले नसल्याने सदरच्या दाव्यांची मोजणी करता आली नसल्याचे अधिक्षक, भूमी अभिलेख, जळगांव यांनी कळविले आहे. जळगांव जिल्हयातील रावेर तालुक्यातील गारबर्डीच्या धरणाजवळील सुकीधरण पाडा ग्रुप ग्राम पंचायत निमडया ता. रावेर येथील सामुहिक वन संसाधनाचे हक्क दिनांक १.२.२०२१ च्या मंजूर हक्क पत्रानुसार क.नं. ३९ क्षेत्र २.०० हे.आर क्षेत्राची दिनांक २७.३.२०२३ रोजी मोजणी करण्यात येवून मोजणी नकाशा "क" प्रतीसह जिल्हाधिकारी, जळगांव यांना दिनांक २८.३.२०२३ रोजी सादर करण्याची दक्षता घेण्यात येत आहे.

रोमुमु/एच-३१७[ ७५०-६-२०२३]•

**********

उच्च व तंत्र शिक्षण विभाग/विशि-१
लक्षवेधी सूचना क्र.६८८

महाराष्ट्र विधानसभा
सन-२०२३ चे प्रथम (अर्थसंकल्प) अधिवेशन

मा. विधानसभा सदस्य श्री. अजित पवार, श्री. जयंत पाटील, श्री. छगन भुजबळ, श्री. संजय बनसोडे, श्री. दत्तात्रय भरणे, श्री. चेतन तुपे, श्री. विनोद निकोले, श्री. दौलत दरोडा यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम, १०५ अनुसार उपस्थित केलेली लक्षवेधी सूचना क्र.६८८ पुढीलप्रमाणे आहे :-

"मुंबई विद्यापीठाच्या कुलसचिव पदावर एका डाटा एन्ट्री ऑपरेटरची नियुक्ती तर मुंबई विद्यापीठात उप कुलसचिव पदावर अहर्ता नसलेला उमेदवार थेट पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर, सोलापूर विद्यापीठात कुलसचिव पदावर नियुक्त झाल्याची धक्कादायक बाब नुकतीच उघडकीला येणे, विविध परिक्षांमध्ये गुणपत्रिका, प्रश्नपत्रिका, उत्तरपत्रिका गहाळ होणे इत्यादी बाबींमुळे जगप्रसिध्द अशा मुंबई विद्यापीठाची प्रतिमा मलीन होत असतानां मुंबई विद्यापीठाने १८ उपकुलसचिव पदी सर्व नियम धाब्यावर बसून अनेक टंकलेखक, लघुलेखक, खाजगी कंपनीतील लिपीक, अधिव्याख्याता, मुख्याध्यापक, मानधन तत्वावरील जिल्हा प्रकल्पाधिकारी, समन्वयक, लेखा सहाय्यक, असा अनुभव असलेल्या लोकांना नियुक्त करण्यात येणे, यासंदर्भातील अहवाल उच्च व तंत्र शिक्षण विभाग आणि मुंबई विद्यापीठाकडे उपलब्ध असताना विद्यापीठ प्रशासन आणि राज्य शासनाचा उच्च व तंत्र शिक्षण विभाग अर्थपुर्ण रित्या मौन बाळगून असणे, परिणामी मुंबई विद्यापीठाच्या क्षेत्रातील सर्व विद्यार्थी, अभ्यासक, संशोधक, प्राध्यापक व पालक यांच्या मध्ये राज्य शासनाच्या बाबतीत पसरलेली तीव्र नाराजी याबाबत तातडीने करावयाची कार्यवाही तथा उपाययोजना"

---

मा. मंत्री, उच्च व तंत्र शिक्षण यांचे निवेदन.

मुंबई विद्यापीठाने सन २००९, २०१० व २०१३ मध्ये विद्यापीठातील उप कुलसचिव व सहायक कुलसचिव या संवर्गाची पदे भरण्यासाठी जाहिराती प्रसिध्द केल्या होत्या. सदरहू जाहिरातीनुसार विद्यापीठाने भरतीप्रक्रिया पूर्ण करून निवड झालेल्या उमेदवारांना संबंधित पदांवर नियुक्त्या दिलेल्या आहेत. तथापि, सदर पदांवर नियुक्त करण्यात आलेले कर्मचारी नियुक्तीच्या वेळी जाहिरातीमध्ये नमूद केलेली संबंधित पदासाठी आवश्यक असलेली शैक्षणिक अर्हता, पात्रता व अनुभव इ. बाबींची पूर्तता करीत नसल्याची तक्रार शासनाकडे प्राप्त झाली होती. सदर तक्रारीच्या अनुषंगाने प्रस्तुत प्रकरणाची सखोल चौकशी करून वस्तुस्थितीदर्शक अहवाल शासनास सादर करण्याबाबत संचालक, उच्च शिक्षण यांना कळविण्यात आले होते. त्यानुषंगाने संचालक, उच्च शिक्षण यांच्याकडून सविस्तर अहवाल शासनास प्राप्त झाला आहे. संचालकांनी सादर केलेल्या अहवालाच्या अनुषंगाने कुलगुरू, मुंबई विद्यापीठ, मुंबई यांचे अभिप्राय मागविण्यात आले होते. सदर अभिप्राय मुंबई विद्यापीठाकडून प्राप्त झाले आहेत. तद्नंतर प्रकरणाच्या अनुषंगाने आणखी आवश्यक असलेली माहिती व कागदपत्रे संचालक, उच्च शिक्षण व मुंबई विद्यापीठाकडून मागविण्यात आली आहेत. सदर माहिती प्राप्त होताच प्रकरणी पुढील कार्यवाही करण्यात येईल.

******************

उच्च व तंत्र शिक्षण विभाग/विशि-१
लक्षवेधी सूचना क्र.७०९

महाराष्ट्र विधानसभा
सन-२०२३ चे प्रथम (अर्थसंकल्प) अधिवेशन

मा. विधानसभा सदस्य श्री. सुनिल प्रभू यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम, १०५ अनुसार उपस्थित केलेली लक्षवेधी सूचना क्र.७०९ पुढीलप्रमाणे आहे :-

"राज्यातील महाविद्यालयातील सुमारे ४०००० शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी विविध प्रलंबित मागण्यांसाठी परिक्षेच्या कामकाजावर बहिष्कार टाकून संप पुकारण्यात आल्याची घटना दि. २.२.२०२३ रोजीच्या सुमारास निदर्शनास येणे, यामुळे राज्य शासनाने दि.३.२.२०२३ पासून सुरु होणाऱ्या सर्व विद्यापीठांच्या पुढील परिक्षांना स्थगिती दिल्याचा घडलेला प्रकार, सदरहु कर्मचाऱ्यांनी अचानक पुकारलेल्या संपाचा लाखो विद्यार्थ्यांना फटका बसून त्यांच्या परिक्षा पुढे ढकलण्यात येणे, यामुळे विद्यार्थ्यांच्या मोठ्या प्रमाणात झालेले शैक्षणिक नुकसान, सेवा अंतर्गत आश्वासित प्रगती योजनेचे रद्द केलेला शासन निर्णय पुन्हा लागू करणे, सातवा वेतन आयोगातील तरतूदीनुसार १०,२०,३० वर्षानंतरच्या लाभाची योजना विद्यापीठ कॉलेजच्या शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना लागू करणे, १ जानेवारी, २०२६ ते प्रत्यक्ष सातवा वेतन लागू झालेच्या कालावधीतील वेतनाच्या फरकाची थकबाकी देणे, रिक्त असलेली पदे भरण्यास मान्यता देणे, सन २००५ नंतर सेवेत रुजु झालेल्या कर्मचाऱ्यांना जुनी पेन्शन योजना लागू करणे, आदि न्याय मागण्यासांसाठी सदरहू राज्यातील महाविद्यालयातील शिक्षकेतर कर्मचारी यांनी परिक्षेवर बहिष्कार टाकून आंदोलन करण्यात येणे, महाराष्ट्र राज्य विद्यापीठीय व महाविद्यालयील सेवक कृती समितीने कृती समितीने शासनाकडून बैठक होऊनही यावर ठेस निर्णय न झाल्याने तसेच मागण्या मान्य न झाल्याने सर्वच प्रकारचे कामकाज बंद करण्याचा राज्य शासनास दिलेला गंभीर इशारा, याकडे झालेले शासनाचे अक्षम्य दुर्लक्ष, परिणामी राज्यातील महाविद्यालयातील शिक्षकेतर कर्मचाऱ्यांमध्ये निर्माण झालेले असंतोषाचे व संतापाचे वातावरण, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया"

---

मा. मंत्री, उच्च व तंत्र शिक्षण यांचे निवेदन.

महाराष्ट्र राज्य विद्यापीठ व महाविद्यालयीन सेवक संयुक्त कृती समिती यांनी दि.१३.०१.२०२३ रोजी शासनाला दिलेल्या निवेदनामध्ये विविध मागण्यासंदर्भात दि.२०.०२.२०२३ पासून बेमुदत आंदोलन करण्यात येणार असल्याचे कळविले होते. सदर निवेदनाच्या अनुषंगाने कोल्हापूर व मुंबई विद्यापीठाने परीक्षा पुढे ढकलण्याचा निर्णय घेतला. महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ, अधिनियम, २०१६ मधील तरतुदींनुसार विहित वेळेत परीक्षा पार पाडण्याची जबाबदारी विद्यापीठांची आहे. त्यादृष्टीने विद्यापीठाने आवश्यक ती उपाययोजना करून परीक्षा विहित वेळेवर पार पडतील याची दक्षता घेण्याच्या सूचना सर्व अकृषि विद्यापीठांना दि.०३.०२.२०२३ च्या पत्रान्वये देण्यात आल्या होत्या. तसेच सदर बाबीमुळे कोणत्याही विद्यार्थ्याचे शैक्षणिक नुकसान झाले नाही.

उपरोक्त निवेदनात नमूद करण्यात आलेल्या शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या मागण्यांसदर्भात मा. उपमुख्यमंत्री महोदयांच्या अध्यक्षतेखाली दि.१५.०२.२०२३ रोजी बैठक आयोजित करण्यात आली होती. सदर बैठकीचे इतिवृत्त दि.२१.०२.२०२३ रोजी निर्गमित करण्यात आले आहे. मा. उपमुख्यमंत्री महोदयांनी दिलेल्या निर्देशानुसार अकृषि विद्यापीठातील शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना सातव्या वेतन आयोगाची थकबाकी अदा करण्याचा निर्णय मंत्रिमंडळाच्या मान्यतेने घेण्यात आला आहे. तसेच सुधारित सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजना पूर्ववत लागू करणे, अकृषि विद्यापीठातील उर्वरित शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना सातवा वेतन आयोग लागू करणे, रिक्त पदे भरणे इत्यादी बाबत निर्णय घेण्याची कार्यवाही सुरू आहे.

******************

# महाराष्ट्र विधानसभा
## सन २०२३ चे प्रथम अधिवेशन

**लक्षवेधी सुचना क्रमांक. २१७०**

कुमारी आदिती तटकरे, श्री. प्रशांत ठाकूर, श्री. समीर कुणावार, श्री. रमेश बालदी व श्रीम. मनिषा चौधरी विधानसभा सदस्य यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम -१०५ अनुसार दिलेली लक्षवेधी सुचना क्रमांक २१७० पुढील प्रमाणे आहे:-

"शासनाने बक्षी समिती खंड २ च्या तरतुदी संदर्भात काढलेल्या शासन निर्णयात संचालनालय वैद्यकीय व संशोधन, अंतर्गत समाजसेवा अधिक्षक वैद्यकीय आणि मनोविकृती या पदांची शैक्षणिक पात्रता नियुक्ती पासून समाजकार्य पदव्युत्तर पदवी ही उच्चतम शैक्षणिक अर्हता असून ही पदे शासन सेवेत एकाकी स्वरुपाची आहे. ही पदे शासकीय वैद्यकीय महाविद्यालय आणि संलग्नित रुग्णालयामध्ये रुग्णसेवा मदत निधी, समुपदेशन आणि शासकीय आरोग्य योजना अंमलबजावणी मध्ये अत्यंत महत्वाची असून सुध्दा या पदांना पुर्ण सेवा काळात कोणतीही पदोन्नत्ती नाही. तसेच ७ व्या वेतन आयोगाच्या १०,२० आणि ३० वर्षे सेवेनंतर मिळणारी वेतनवाढ फक्त एकच बरीलश्रेणी लागु आहे. परंतु सहाव्या वेतन आयोगात या पदांना १२ आणि २४ वर्षे सेवेनंतर दोन स्तर वरिष्ठ श्रेणी वेतनवाढ म्हणजेच एस-१६ लागु करणे अपेक्षित होते. त्यांच्या शैक्षणिक अर्हतामध्ये सगळयात कमी वेतन मिळणारे पद हेच आहे. कोरोना सारख्या महामारीच्या काळात रुग्णांना त्यांच्या अंत्यविधीपासून तर औषधापर्यंत सर्वतोपरी मदत हया समाजसेवा अधिक्षकांनी केली त्यामुळे त्यांना न्याय देण्यात यावा. तरीही बक्षी समितीच्या खंड २ अहवालात तसेच शासननिर्णयात या पदांना वेतनवाढीसाठी कोणतीही मागणी मान्य केलेली नाही. त्यामुळे सदरील दोनही पदांना ७ व्या वेतन आयोगातील पे-मेट्रीक्स मधील एस-१६ या वाढीव वेतनश्रेणीचा लाभ द्यावा ही आग्रहाची मागणी आहे. मात्र त्याकडे शासनाचे होत असलेले अक्षम्य दुर्लक्ष परिणामी सदर पदांच्या कर्मचाऱ्यांत पसरलेले असंताषाचे वातावरण व नाराजीची भावना, त्यामुळे शासनाने याबाबत करावयाची कार्यवाही व राज्य शासनाची प्रतिक्रिया."

---

मा.मंत्री (वै.शि.) यांचे निवेदन

वैद्यकीय शिक्षण व संशोधन संचालनालयाच्या अधिपत्याखालील संस्थेमध्ये समाजसेवा अधिक्षक वैद्यकीय आणि मनोविकृती या पदांची शैक्षणिक अर्हता सेवाप्रवेश नियमानुसार A Masters degree in Social Science अशी आहे. समाजसेवा अधिक्षक या पदाला पदोन्नत्ती साखळी नसल्याने सदरील पद हे एकाकी आहे. समाजसेवा अधिक्षक वैद्यकीय आणि मनोविकृती या पदाची ६ व्या व ७ व्या वेतन आयोगाप्रमाणे खालील प्रमाणे वेतनश्रेणी मंजूर आहे.

| पदनाम | ६ वा वेतन आयोग | ७ वा वेतन आयोग |
|---|---|---|
| समाजसेवा अधिक्षक (वैद्यकीय) | ९३०० -३४८०० ग्रेड पे ४३०० | एस-१४ (३८६००-१२२८००) |
| समाजसेवा अधिक्षक (मनोविकृती) | ९३०० -३४८०० ग्रेड पे ४३०० | एस-१४ (३८६००-१२२८००) |

सदरील पदाला ६ व्या वेतन आयोगामध्ये १२ व २४ वर्षाचा लाभ अनुज्ञेय करण्यात येत होता. वित्त विभागाच्या दिनांक ६ सप्टेंबर, २०१४ रोजीच्या शासन निर्णयानुसार पदोन्नत्तीची संधी नसलेल्या म्हणजेच एकाकी पदावरील पदांना सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजनेतंर्गत अनुज्ञेय असलेल्या समुचित ग्रेड वेतनामध्ये सुधारणा केली होती.

वित्त विभागाच्या दिनांक २ मार्च, २०१९ रोजीच्या शासन निर्णयानुसार ७ व्या वेतन आयोगामध्ये तीन लाभांच्या (१०,२० व ३०) सुधारित सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजनेतंर्गत ज्या अधिकारी कर्मचारी यांच्यासाठी सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजनेमध्ये विभागीय पदोन्नत्तीची वेतनश्रेणी नसलेल्या एकाकी पदावरील विद्यमान वेतनस्तर विचारात घेऊन नजिकच्या वेतन स्तरामध्ये यथास्थिती पहिला, दुसरा व तिसरा लाभ, हे पात्रतेनुसार अनुज्ञेय ठरवले आहे. त्या नुसार सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजनेचे लाभ अनुज्ञेय करण्यात येतात. समाजसेवा अधिक्षक (वैद्यकीय) आणि समाजसेवा अधिक्षक (मनोविकृती) या पदाची एस-१४ ही वेतनश्रेणी विचारात घेता, सदर पदास १०,२०,३० वर्षानंतर अनुक्रमे एस-१५, एस-१६ व एस-१७ ही वेतनश्रेणी अनुज्ञेय राहिल.

सातव्या वेतन आयोगाच्या अनुषंगाने वेतनसुधारणेसंदर्भात शिफारशी करण्यासाठी राज्य शासनाने श्री. के.पी. बक्षी, सेवानिवृत्त अपर मुख्य सचिव, यांच्या अध्यक्षतेखाली राज्य वेतन सुधारणा समिती, २०१७ मध्ये स्थापन केली होती. बक्षी समितीने आपला विविध संवर्गाचा वेतनत्रुटींसंबंधीचा शिफारशींचा अहवाल खंड-२ शासनास दिनांक ८ फेब्रुवारी, २०२१ रोजी सादर केला होता. बक्षी समितीने आपल्या अहवालात प्राप्त एकूण ३७३९ मागण्यापैकी, १०४ संवर्गाच्या वेतनत्रुटीसंदर्भात मागण्या मान्य केल्या आहेत. परंतु सदर अहवालात वैद्यकीय शिक्षण व औषधीद्रव्ये विभागातील समाजसेवा अधीक्षक वैद्यकीय व मनोविकृती या संवर्गाबाबत समितीने वेतनत्रुटींसंदर्भात शिफारस केलेली नाही.

----------***-----------